महाभूमि DIGITAL
LIKE
COMMENT
SHARE
SUBSCRIBE
अपडेटेड राहा, अपडेटेड दाखवा.
ताज्या घडामोडींसाठी खालील लिंकला सबस्क्राईब करा व शेअर करा
https://www.youtube.com/@MAHABHOOMIDIGITAL

दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष
https://dainikmahabhoomi.com | https://epaper.dainikmahabhoomi.com

### षटकारांचा अभिषेक!

*नागपूर : पहिल्या टी-२० सामन्यात अभिषेक शर्मा न्यूझीलंडविरुद्ध षटकारांची बरसात करताना दिसला. त्याने गुरु युवराज सिंगचा विक्रमही मोडीत काढल्याचे पाहायला मिळाले. पॉवर प्लेमध्ये १५ चेंडू खेळताना त्याने २०० च्या स्ट्राइक रेटने धावा करताना चार षटकार मारले. त्याने २२ चेंडूत अर्धशतकही पूर्ण केले. तो षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ८४ धावांवर बाद झाला आणि १६ धावांनी शतक हुकले. त्याच षटकात अभिषेकने त्याच्या टी-२० कारकिर्दीत ५ हजार धावाही पूर्ण केल्या.*



## न्यूज ब्रीफ

### ठाकरे गटाची पहिली नगरसेविका फुटली

**मुंबई :** एकीकडे कल्याण डोंबिवलीतील चार नगरसेवकांनी निवडून आल्यानंतर लगेच साथ सोडल्यानंतर आता ठाकरेंच्या शिवसेनेला मुंबईत पहिला धक्का बसला आहे. प्रभाग १५७ मधून निवडून आलेल्या डॉ.सरिता म्हस्के शिंदे यांनी ठाकरेंची साथ सोडल्याची माहिती आहे. सरिता म्हस्के या शिंदे गटाच्या गळाला लागल्या आहे. सेना भवनातील नगरसेवकांच्या बैठकीला डॉ. सरिता म्हस्के गैरहजर असल्याची माहिती आहे. ठाकरे गटाच्या सरिता म्हस्के यांनी प्रभाग क्रमांक १५७ मधून भाजपच्या आशा तायडे यांचा पराभव केला आहे.

### ट्रम्प यांच्या विमानात तांत्रिक बिघाड

**जीनिव्हा:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विमान दावोसला जात असताना, टेकऑफच्या काही वेळानंतर वॉशिंग्टनला परतले. व्हाइट हाऊसच्या माहितीनुसार, विमानात तांत्रिक बिघाड झाला होता. प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लिव्हिट यांनी सांगितले की, टेकऑफ नंतर क्रूला विमानात किरकोळ इलेक्ट्रिक बिघाड आढळला. त्यानंतर खबरदारी म्हणून विमान परत आणण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, ट्रम्प थोड्याच वेळात दुसऱ्या विमानाने रवाना झाले.

## तंत्रज्ञान, विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठी दावोस दौरा : मुख्यमंत्री

# तिसऱ्या मुंबईतील पहिल्या शहराची घोषणा

**दावोस, वृत्तसंस्था :**

स्वित्झर्लंडमध्ये वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठीचा महत्वाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २१ जानेवारी रोजी येथे सांगितले. दुसऱ्या दिवशी तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली.

आज प्रामुख्याने धोरणात्मक असे सामंजस्य करार करण्यात आले. ज्यामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ कॅलीफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह -लंडन, आयसीसीआय-इटली, अँलॉग ट्युनिंग इन्स्टिट्यूट, नॉर्वे जीयन जीओ टेक्निकल इन्स्टिट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना जुरॉंग सिंगापूर यांच्यासोबत टेक्निकल सामंजस्य करार केले आहेत. यातून एक प्रकारे केवळ गुंतवणूक नाही, तर ज्ञान आणि तंत्रज्ञानातून मोठ्या प्रमाणात उद्योग आणता येतील, वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्यारितीने काम करता येईल.



एक लाख कोटींची गुंतवणूक येणार

### रायगड-पेण ग्रोथ सेंटर उभारणार

■ नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. त्याबाबत दावोसमध्ये घोषणा करण्यात आली. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळविण्यात येत होत्या. त्या मिळाल्यानंतर आज या तिसऱ्या मुंबईतील पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियनच 'मॅग्नेटिक'

■ दावोसमध्ये साकारण्यात आलेले मॅग्नेटिक महाराष्ट्राचे पॅव्हेलियन आकर्षणाचे केंद्र राहिल्याचे चित्र होते. या पॅव्हेलियनला विविध क्षेत्रातील उद्योजक, गुंतवणूकदारांसह, भारतातील मान्यवरांनी आवर्जून भेट दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्राच्या प्रतिनिधी मंडळाने सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

### शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहचविण्यासाठी मेडटेक सहकार्य

■ राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सुविधा पोहचविण्याचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने यंदा दावोसमध्ये मेडीकल-टेक्नॉलॉजीबाबत एका सत्रात चांगली आणि सकारात्मक चर्चा केल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यातून राज्यातील आरोग्य सुविधांसाठीचा रोडमॅप निश्चित करण्यात आला. यातून आपल्याला राज्यात मेड-टेक स्टार्टअपची चांगली इकोसिस्टिम निर्माण करण्याचा प्रयत्न. त्यासाठी जगातील अशी सुविधा उभ्या करणाऱ्या सर्वोत्तम कंपनीशी करार करण्यात आला आहे.

# शिवसेना नाव, चिन्हाचा निर्णय आणखी लांबणीवर

## सुप्रीम कोर्टाने पुन्हा एकदा दिली पुढची तारीख

**नवी दिल्ली,वृत्तसंस्था :**

प्रदीर्घ काळापासून कोर्टात प्रलंबित असलेला शिवसेना नाव आणि चिन्हाचा खटला पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. २० जानेवारी रोजी सुप्रीम कोर्टात शिवसेना नाव आणि धनुष्यबाणावर अंतिम सुनावणी होणार होती. मात्र सुनावणीआधीच कोर्टाने या खटल्याला पुढची तारीख दिली. त्यामुळे आता या खटल्याची सुनावणी पुढील शुक्रवारी होणार आहे.

राज्यात महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर बुधवारी होणाऱ्या सुनावणीकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. कारण या निकालाचे परिणाम महापालिकेतील सत्ता समीकरणावर होणार होते. परंतु ही अंतिम सुनावणी पुढे ढकलल्याने उद्धव ठाकरे यांना पुन्हा झटका बसला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या नाव आणि चिन्हाबाबतच्या मागील सुनावणीत कोर्टाने २१ जानेवारीला ही सुनावणी घेऊ असे ठरवले होते. यात अंतिम सुनावणी घेऊन आज किंवा उद्या निकाल येणे अपेक्षित होते. मात्र आज पुन्हा एकदा सुनावणी लांबणीवर पडली. २१ जानेवारीला सकाळी ११ वाजता ही सुनावणी घेण्याचे गेल्यावेळी कोर्टाने सांगितले होते.





### शिवसेना चिन्ह गोठवले जाण्याचीही शक्यता : सरोदे



■ वकील असीम सरोदे म्हणाले की, आज सुप्रीम कोर्टाकडून निकाल येण्याची अपेक्षा होती. मात्र या प्रकरणाला तब्बल साडेतीन वर्षे उलटून गेली असतानाही अजूनही केवळ तारीखच दिली जात आहे. पुढील सुनावणीसाठी २३ तारीख देण्यात आली असून त्या दिवशी निकाल येण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे पक्ष फोडण्याची प्रक्रिया भविष्यात भाजपसाठी धोकादायक ठरू शकते, कारण पुढे काहीही घडू शकते. त्यामुळे या प्रकरणावर स्पष्टता येणे अत्यंत गरजेचे असून हा निकाल खूपच महत्त्वाचा आहे. धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला दिले जाऊ शकते किंवा ते गोठवले जाण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. आतापर्यंत या चिन्हावर निवडून आलेले खासदार, आमदार किंवा नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकांतील नगरसेवकांवर या निकालाचा कोणताही परिणाम होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

अंतिम सुनावणीत साधारण ५ तासांचा वेळ ठाकरे आणि शिंदे यांच्या वकिलांना देण्यात येणार होता.

मात्र आज सॉलिसिटर जनरल यांनी कोर्टात एका दुसऱ्या प्रकरणात त्यांना सुनावणीसाठी जावे लागत आहे, असे सांगितले. त्यावर दोन्ही पक्षकारांची मते जाणून ही सुनावणी शुक्रवारी सकाळी ११ वाजता घेण्याचे ठरवले. बुधवारी सकाळीच वकिल असीम सरोदे यांनी ही सुनावणी आज होण्याची शक्यता कमी असल्याची माहिती दिली होती.

## कर्नाटकच्या राज्यपालांचा अधिवेशनाला संबोधित करण्यास नकार

**बंगळुरू, वृत्तसंस्था :**

कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी २२ जानेवारी रोजी राज्य विधिमंडळाच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करण्यास नकार दिला आहे.

कायदा आणि संसदीय कामकाज मंत्री एच.के. पाटील यांच्या नेतृत्वाखालील एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ या संदर्भात राज्यपालांना भेटण्यासाठी लोक भवनाला भेट देईल. कायदा मंत्र्यांच्या कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, काल संयुक्त अधिवेशनाला संबोधित करण्यास राज्यपालांनी नकार दिल्यानंतर, कायदामंत्र्यांच्या नेतृत्वाखालील एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ राजभवन (लोक भवन) ला भेट देईल.

राज्यपालांच्या नकाराची कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. कर्नाटक विधानसभेचे संयुक्त अधिवेशन २२ जानेवारी रोजी सुरू होणार आहे. हे अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे, केंद्र सरकारकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) रद्द करण्याच्या मुद्द्यांसह अनेक मुद्द्यांवरून सत्ताधारी कॉंग्रेस आणि विरोधी भाजप-जेडी(एस) आघाडीमध्ये संघर्ष होण्याची शक्यता आहे.

२२ ते ३१ जानेवारी दरम्यान चालणारे हे अधिवेशन गुरुवारी राज्यपाल गेहलोत यांच्या नेहमीच्या अभिभाषणाने सुरू होणार होते.

## प्रयागराजमध्ये हवाई दलाचे विमान कोसळले

**प्रयागराज, वृत्तसंस्था :**

इंजिनमधील तांत्रिक समस्येमुळे बुधवारी उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये हवाई दलाचे एक अल्ट्रा-लाइट, दोन आसनी विमान कोसळले. विमानातील दोन्ही वैमानिक सुरक्षित आहेत.

भारतीय हवाई दलाने म्हटले आहे की अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी चौकशीचे आदेश दिले आहेत. अशा अल्ट्रा-लाइट (मायक्रोलाइट) विमानांचा वापर सामान्यतः प्रशिक्षण, पक्षी सर्वेक्षण आणि जमिनीच्या सर्वेक्षणासाठी केला जातो. विमान नियमित उड्डाणावर असताना हा अपघात झाला. अपघातादरम्यान विमानाची पॅराशूट रिकव्हरी सिस्टम सक्रिय करण्यात आली होती आणि दोन्ही वैमानिक सुरक्षित आहेत.



दोन्ही वैमानिक सुरक्षित

प्रयागराज जवळील बामरौली हवाई दल स्थानकावरून नियमित उड्डाणादरम्यान, एका हवाई दलाच्या मायक्रोलाईट विमानात तांत्रिक बिघाड झाला आणि ते एका निर्जन भागात सुरक्षितपणे उतरले, यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघाताचे कारण शोधण्यासाठी हवाई दलाने चौकशीचे आदेश दिले आहेत. प्रयागराजमधील अधिकाऱ्यांनी अपघातस्थळाला घेराव घातला आहे आणि चौकशी सुरू करण्यात आली आहे.

## ठाकरे गटाच्या गटनेतेपदी पेडणेकर



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई महापालिकेतील पक्षाच्या गटनेतेपदी किशोरी पेडणेकर यांची नियुक्ती केली आहे. किशोरी पेडणेकरांनी यापूर्वी मुंबईच्या महापौर म्हणून काम केले आहे. त्यानंतर आता पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

मुंबई महापालिकेची १५ जानेवारीला निवडणूक झाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी झालेल्या मतमोजणीत भाजपला सर्वाधिक ८९ जागा मिळाल्या, तर ठाकरे बंधूंच्या युतीला अवघ्या ७१ जागांवर समाधान मानावे लागले.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहणाऱ्या आदिवासींना नोटीस

### घरे रिकामी करण्यास सांगितल्याचा आरोप

**मुंबई :** बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी रहिवाशांनी वन विभागाच्या नोटीस विरोधात उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वारावर नुकतेच तीव्र आंदोलन छेडले. प्रशासनाकडून घरे रिकामी करण्याबाबत दबाव टाकला जात असल्याचा आणि बस सेवा अचानक बंद केल्याचा गंभीर आरोप या आंदोलकांनी केला आहे. मात्र, उद्यान प्रशासनाने हे सर्व आरोप फेटाळून लावत कोणालाही वैयक्तिकरीत्या थेट नोटीस बजावली नसल्याचे स्पष्ट केले आहे. केवळ उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परिसरात सार्वजनिक सूचना फलक लावण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

येऊर एन्व्हायर्नमेंटल सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष रोहित मनोहर जोशी यांनी ३१ डिसेंबर २०२५ रोजीचा वादग्रस्त शासन निर्णय रद्द करण्यासाठी महसूल मंत्र्यांकडे हस्तक्षेप अर्ज दाखल केला आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिसूचित क्षेत्रातील तब्बल १०५३ एकर वनजमिनीवर खासगी व्यक्तींचे मालकी हक्क प्रविष्ट करण्यास या आदेशाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. या संवेदनशील प्रकरणाची सुनावणी २२ जानेवारी रोजी कोकण विभागीय आयुक्तांसमोर होणार असून, राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीवर खासगी हक्क देण्याच्या या प्रयत्नामुळे पर्यावरण वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

## अमेरिकेविरुद्ध २७ देश एकवटले

# डोनाल्ड ट्रम्प यांना बसणार दुहेरी धक्का!

**वॉशिंग्टन, वृत्तसंस्था :**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दुहेरी धक्का बसणार आहे. युरोपियन युनियन(ईयू) भारतासोबत मुक्त व्यापार करार (एफटीए) जाहीर करणार आहे, तर अमेरिका-ईयू व्यापार करार स्थगित होऊ शकतो. फ्रान्समधील स्ट्रासबर्गमधील युरोपियन संसद अमेरिकेसोबत व्यापार करार स्थगित करण्याची घोषणा करू शकते. अमेरिकेविरुद्ध २७ देश एकवटल्याचे दिसत आहे.

युरोपियन देश आणि अमेरिकेतील हा व्यापार करार गेल्या जुलैमध्ये स्कॉटलंडमध्ये झाला होता. त्यावेळी अमेरिकेने युरोपियन वस्तूंवरील शुल्क ३० टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत कमी केले होते आणि त्या बदल्यात या देशांनी अमेरिकेत गुंतवणूक आणि अमेरिकेची निर्यात वाढविण्यास सहमती दर्शविली होती. मात्र, ट्रम्प आता ग्रीनलँडबाबत वेगळ्या मूडमध्ये असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी ग्रीनलँड मुद्द्यावर युरोपियन देशांना पाठिंबा देण्यासाठी दबाव आणण्यासाठी पुढील महिन्यापासून १० टक्के शुल्क वाढ जाहीर केली आहे. ट्रम्प यांनी आठ युरोपियन देशांवर टॅरिफ जाहीर केले आहेत. १ फेब्रुवारीपासून अमेरिका या देशांमधून येणाऱ्या वस्तूंवर १० टक्के कर लादणार आहे. ग्रीनलँडवर अमेरिकेचे नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या ट्रम्पच्या निर्णयाला उघडपणे विरोध करणारे हे तेच देश आहेत. १८ जानेवारी रोजी ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये म्हटले होते की, डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड किंग्डम, नेदरलँड्स आणि फिनलंडमधील वस्तूंवर १० टक्के कर लावला जाईल आणि हा कर वाढू शकतो.



### युरोपियन युनियन भारतासोबत एफटीएची घोषणा करणार

■ ब्रिटन आणि फ्रान्ससारख्या देशांनी ग्रीनलँडबाबत ट्रम्पच्या निर्णयाला उघडपणे विरोध केला आहे. फ्रेंच परराष्ट्रमंत्र्यांनी या टॅरिफला ब्लॅकमेलिंग म्हटले आहे. दरम्यान, २७ जानेवारी रोजी भारत आणि युरोपियन युनियनमधील एफटीएची घोषणा होणार आहे. या कराराअंतर्गत, दोन्ही देश एकमेकांच्या बाजारपेठांमध्ये प्रवेश सुलभ करतात. एफटीएनंतर, भारतीय वस्तूंना २७ युरोपियन युनियन देशांच्या बाजारपेठांमध्ये कमी किंवा कोणतेही टॅरिफ न देता प्रवेश मिळेल. युरोपियन युनियनच्या वस्तूंनाही भारतीय बाजारपेठांमध्ये समान प्रवेश मिळेल. अमेरिकेनेही भारतावर शुल्क लादले आहे आणि ट्रम्प रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारतीय वस्तूंवर ५० टक्के टॅरिफ लादत आहेत.

### ट्रम्प यांना ग्रीनलँड का हवा?

■ ट्रम्प यांचा असा विश्वास आहे की, या प्रदेशात वाढलेल्या चिनी आणि रशियन हालचाली अमेरिकेसाठी धोका निर्माण करू शकतात, म्हणून त्यांना ग्रीनलँडवर अमेरिकेचे नियंत्रण लवकर मिळवायचे आहे. ग्रीनलँड हे जगातील सर्वात मोठ्या बेटांपैकी एक आहे आणि जवळजवळ तीनशे वर्षांपासून डेन्मार्कचा भाग आहे.

# वायू प्रदूषण प्रकरणात कृती योजना सादर करावी

## केंद्र आणि दिल्ली सरकारला सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश



**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केंद्र सरकार आणि दिल्ली सरकारला, इतर भागधारकांसह, दिल्ली-राष्ट्रीय राजधानी प्रदेशमध्ये बिघडत चाललेला हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) सुधारण्यासाठी केंद्रीय प्रदूषण देखरेख संस्थेने शिफारस केलेल्या दीर्घकालीन उपाययोजनांवर चार आठवड्यांच्या आत त्यांच्या कृती योजना सादर करण्याचे निर्देश दिले.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोग (सीएक्यूएम) कडून उपस्थित असलेल्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी सादर केलेल्या स्थिती अहवालाची दखल घेतली. खंडपीठाने नमूद केले की सीएक्यूएमने १५ दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस केली आहे आणि या दीर्घकालीन उपाययोजना अंमलात आणण्यास सक्षम असलेल्या संबंधित एजन्सींची ओळख देखील केली आहे.

खंडपीठाने म्हटले आहे की, सीएक्यूएमने शिफारस केलेल्यांव्यतिरिक्त काही अतिरिक्त दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता असू शकते. सीएक्यूएमने शिफारस केलेल्या या दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी विलंब न करता करणे आवश्यक आहे यात शंका नाही. म्हणून आम्ही भागधारकांना या उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी त्यांचे कृती आराखडे सादर करण्याचे आवाहन करतो.

■ सुनावणी सुरू होताच, भाटी यांनी सर्वोच्च न्यायालयाला माहिती दिली की सीएक्यूएमने दिल्ली-एनसीआरमधून प्रदूषणकारी वाहने टप्प्याटप्प्याने बंद करणे, प्रदूषण नियंत्रण व्यवस्था मजबूत करणे, रेल्वे वाहतूक आणि मेट्रो सेवांचा विस्तार करणे आणि सुधारित इलेक्ट्रिक वाहन धोरण यासह सविस्तर दीर्घकालीन उपाययोजना सादर केल्या आहेत. या प्रकरणातील ॲमिकस क्युरी असलेल्या वरिष्ठ वकील अपराजिता सिंह यांनी सांगितले की, पूर्वीच्या योजनांमध्ये असेच उपाय सुचवण्यात आले आहेत आणि न्यायालयाने प्रस्तावित शिफारशींसाठी एक विशिष्ट वेळ निश्चित करणे आवश्यक आहे.

### पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली राज्य शासनाची भूमिका

# नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाचे केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसमोर सादरीकरण

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पुढाकार घेत 'राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन यासंदर्भातील प्रस्तावाचे सादरीकरण केले. या प्राधिकरणास मंजुरी मिळाल्यास ते देशातील पहिले प्राधिकरण ठरणार असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

या विशेष बैठकीत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी राज्यातील जल आणि



पर्यावरण प्रकल्पांच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या मदतीसोबतच राज्याची स्वतःची एक स्वतंत्र यंत्रणा आणि नियोजन असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. देशातील अनेक नद्या विविध राज्यांतून प्रवाहित होतात. जर प्रत्येक राज्याने आपल्या भौगोलिक सीमेतील नदीपात्राच्या स्वच्छतेसाठी आणि पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी व सुनियोजित योजनांची अंमलबजावणी केली, तर नद्यांचे पूर्णतः प्रदूषणमुक्त करण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल असे मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले. या प्रक्रियेमुळे भविष्यात नद्यांचे पावित्र्य आणि त्यांची नैसर्गिक प्राकृतिकता टिकवून ठेवण्यात देशाला मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### महाराष्ट्राने घेतलेल्या पुढाकाराबद्दल विशेष कौतुक

या प्रस्तावावर केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्राने याबाबत घेतलेल्या पुढाकाराबद्दल विशेष कौतुक केले आणि यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीस राष्ट्रीय नदी संरक्षण संचलनालयाचे (एनआरसीडी) संचालक राजेश कुमार, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांसह केंद्र व राज्यातील इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# "हिंद दी चादर" शहीदी समागमनिमित्त सेवाभावी संस्था व नागरिकांना आवाहन

### सेवा स्टॉलच्या माध्यमातून सेवेची सुवर्णसंधी

**नांदेड / वृत्तसंस्था**

येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हिंद दी चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून तसेच राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक नांदेड येथे उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर, कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी शहरातील विविध ठिकाणी सेवा स्टॉल्सची उभारणी करण्यात येत आहे. या सेवा स्टॉल्सवर भाविकांसाठी चहा, पाणी, नाश्ता, फलाहार आदी सुविधा निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या सेवाकार्यासाठी विविध सेवाभावी संस्था, व्यापारी व व्यावसायिक आस्थापना, उद्योजक, शासकीय



कार्यालये, बँकिंग क्षेत्र तसेच सेवा देण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी नोंदणी केली आहे. अधिकाधिक भाविकांना उत्तम सेवा देता यावी यासाठी आणखी जास्तीत जास्त संस्था व नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

सेवा हीच खरी श्रद्धांजली असून, सेवा स्टॉलच्या माध्यमातून समाजसेवेची संधी सर्वांनी साधावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

सेवा स्टॉल्सच्या नोंदणीसाठी इच्छुकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे तहसीलदार (महसूल) यांचेशी संपर्क साधावा, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले त्यांनी कळविले आहे.

# दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त अभियानासाठी शिक्षण मंडळ सज्ज

**मुंबई / वृत्तसंस्था**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी आणि मार्च २०२६ दरम्यान उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) आणि माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) लेखी परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत. या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळ सज्ज असल्याचे मंडळाच्या मुंबई विभागीय सचिवांनी कळविले आहे.

इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षांमध्ये कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण




मंडळामार्फत सर्व प्राचार्य व मुख्याध्यापक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक करण्यात आले आहेत. परीक्षेकरिता दक्षता समिती गठीत करण्यात आली असून भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा कशी द्यावी तसेच परीक्षा देताना काय करावे आणि काय करू नये, याबाबतही सूचना देण्यात आल्या असल्याचे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

# सोलापूरमध्ये सावंत कुटुंबात उघड फूट

**सोलापूर :** जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांच्या कुटुंबात मोठी राजकीय दरी निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सावंत कुटुंबातील दोन महत्त्वाच्या व्यक्ती आमदार तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत आणि पुतणे धनंजय सावंत यांनी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केल्याने जिल्ह्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे. हा प्रवेश केवळ पक्षांतरापुरता मर्यादित न राहता, सावंत कुटुंबातील अंतर्गत मतभेद उघड करणारा ठरला आहे. विशेषतः जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर हा राजकीय भूकंप झाल्याने शिंदे गटासाठी ही बाब चिंतेची ठरू शकते.

# कोल्हापूरचा महापौर शिवसेनेचाच होणार: आ. राजेश क्षीरसागर

**कोल्हापूर :** महापालिका निवडणुका पार पडल्या आणि आता महापौर पदासाठी महायुतीच्या घटक पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे दिसत आहे. मुंबईत मोठा वाद सुरू असतानाच आता कोल्हापुरात महापौर शिवसेनेचाच होईल, असा विश्वास शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश क्षीरसागर यांनी म्हटले की, कोल्हापुरात महापालिकेत महायुती म्हणून निवडणुका व्हाव्यात असा माझा प्रामाणिक हेतू होता. युतीमध्ये कोणताही मिठाचा खडा पडू नये यासाठी माझ्या प्रयत्न आहे. या निवडणुकीत शिवसेनेने मोठा त्याग केला आहे.

विधानसभेत कोल्हापूर उत्तरची प्रत्येक पेठ शिवसेनेसोबत होती, याची पुनरावृत्ती महापालिका निवडणुकीतही झाली. या निवडणुकीत भाजपला २६, शिवसेनेला १४, राष्ट्रवादीला ४ आणि जन सुराज्यला १ अशा ४६ जागा आल्यामुळे नैसर्गिक हक्काने कोल्हापूरचा महापौर हा शिवसेनेचाच होईल, असे क्षीरसागर म्हणाले.

पुढे बोलताना राजेश क्षीरसागर म्हणाले, निगेटिव्ह नरेटीव्ह सेट करणाऱ्या बादशहांनी पुन्हा एकदा शिवसेना आणि काँग्रेस एकत्र येणार असा नरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, याबाबत शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोल्हापूर महापालिकेत महायुती म्हणूनच सत्ता स्थापन करू. २३ जानेवारीला शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शंभरावी जयंती आहे. बाळासाहेब ठाकरे यांची कोल्हापूर महापालिकेवर भगवा फडकवण्याची इच्छा आज पूर्ण होत आहे.

## पाककला

– रुपाली गायकवाड

सुप्रसिद्ध कुक तथा सहाय्यक कृषी अधिकारी, बुलढाणा मो. ९४२२९४३६०५ (वेळ: सायं. ७ ते ९)



### हुरड्याचे वडे

**साहित्य :-** ज्वारीचा हुरडा २५० ग्रॅम, हिरवी मिरची ५ ते ६, लसूण पाकळी ५ ते ६, आलं एक इंच, कोथिंबीर मुठभर, जिरे एक छोटा चमचा, हळद पाव चमचा, मीठ चवीप्रमाणे, कॉर्नफ्लोर पावडर ३ टेबलस्पून आणि तळण्यासाठी तेल.

**कृती :-** एका छोट्या मिक्सरच्या भांड्यात हिरवी मिरची, लसूण, आलं जिरं, कोथिंबीर घालून याचं वाटण तयार करून घ्या. एका बाऊलमध्ये काढून त्याच मिक्सरच्या भांड्यात हुरडा जाडसर वाटून बाऊलमध्ये काढून घ्या आता यामध्ये चवीपुरतं मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर आणि या मिश्रणाला बाइंडिंग येण्यासाठी कॉर्नफ्लोर पावडर किंवा तांदळाचे पीठ किंवा बेसन यापैकी कोणतेही एक घटक पदार्थ तीन चमचे घाला .आता हाताने सर्व मिश्रण पाणी न घालता चांगलं असं एकजीव करून घ्या. या मिश्रणाचे हातावरच वडे थापून



मध्यम गरम तेलात ब्राऊन रंगावर तळून घ्या टेस्टी वरून कुरकुरीत आणि आतून नरम असे हुरड्याचे वडे कढी भातासोबत किंवा नुसती तशी खायला सुद्धा खूप छान लागतात.

**वरील पाककृतीचे व्हिडीओ Rupalis Food Culture या यूट्यूब चॅनलवर पाहू शकता.**




### राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात उत्तम लाभ होईल. नोकरीत बदलासाठी अनुकूलता राहील. जुने विकार पुन्हा उद्भवतील.
- **वृषभ** : अपेक्षित वार्ता कानी येईल. छोट्या–मोठ्या प्रवासाचे योग आहेत. उपजत गुणांचा विकास होईल.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं रखडतील. नव्या योजनांना प्रतिकूलता राहील. उधार व्यवहार टाळायला हवेत.
- **कर्क** : अकारण गैरसमज निर्माण होतील. पित्ताच्या विकाराबाबत काळजी घ्यावी. प्रवास शक्यतो टाळावा.
- **सिंह** : अर्थार्जनाचे नवे मार्ग दृष्टीपथात येतील. स्थावर बाबतीत अनुकूलता राहील. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **कन्या** : यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील. आश्वासनं विचारपूर्वक द्यावीत. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **तूळ** : व्यवसायात आत्मपरिक्षण गरजेचं ठरेल. धार्मिक कार्याकडे ओढा राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृश्चिक** : महत्त्वाच्या कामांकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक ओढाताण तात्पुरती राहील. चिंता करू नये.
- **धनु** : ठरलेलं उद्दिष्ट साध्य करू शकाल. वरिष्ठांकडून कामाचं कौतुक होईल. सरकारी कामं नीट होतील.
- **मकर** : घराच्या प्रश्नांबाबत मार्ग निघेल. प्रियजनांचा सहवास लाभेल. ज्येष्ठांनी प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **कुंभ** : प्रतिकूलतेमुळे निराश होऊ नका. पुढील उत्तम संधींसाठी तयार रहा. जोडीदाराची काळजी घ्या.
- **मीन** : महत्त्वाच्या निर्णयात धरसोडपणा टाळावा. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. प्रकृती उत्तम राहील.

### स्किल डेव्हलपमेंट — नव्याने करा सुरुवात

कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा मुलांच्या संगोपनासाठी महिलांना करीअरमधून ब्रेक घ्यावा लागतो. पण काही वर्षांनंतर पुन्हा करीअर सुरू करावंसं वाटतं. मात्र नव्याने कामाला सुरुवात करणं वाटतं तितकं सोपं नसतं. काही कारणांमुळे मागे राहिलेल्या महिलांना पुन्हा संधी मिळवून देण्यासाठी बऱ्याच संस्था कार्यरत आहेत.

✻ 'जॉब फॉर हर' ही बंगळूरू स्थित संस्था महिलांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करते. पूर्णवेळ नोकरीसह वर्क फ्रॉम होम तसंच स्वतःचा उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीनेही इथे महिलांना मार्गदर्शन मिळू शकतं. ✻ कॉर्पोरेट क्षेत्रातलं करीअर पुन्हा सुरू करण्यासाठी महिलांना मदत करणारी संस्था म्हणजे 'अवतार : आय विन'. या संस्थेने आजवर आठ हजारांपेक्षा अधिक महिलांना ब्रेकनंतर नोकरी मिळवून दिली आहे. ✻ घर आणि मुलांची जबाबदारी सांभाळून अर्थार्जन करण्याची इच्छा असणाऱ्या महिलांसाठी 'शीरोज' ही संस्था वर्क फ्रॉम होमचे पर्याय उपलब्ध करून देते. ✻ ब्रेकनंतर करीअर सुरू करताना नवी कौशल्यं विकसित करावी लागतात. या कामात 'हर सेकंड इनिंग्ज' मदत करते.

### दिनविशेष — २२ जानेवारी

- **१९२०** : संत साहित्याचे गाढे अभ्यासक ह. श्री. शेणोलीकर यांचा जन्म.
- **२००४** : 'आकाश' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.
- **२०१३** : शिक्षक भरतीप्रकरणी हरियाणाचे माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौताला आणि त्यांचा मुलगा अजय यांना दहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा.
- **२०१४** : केंद्रीय मंत्री शशी थरूर यांच्या पत्नी सुनंदा पुष्कर यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा तपास दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सोपवला गेला.

### व्हॉट्स न्यू? — स्मार्ट मिरर

एखादी हेअरस्टाईल आपल्याला शोभून दिसत नसल्याचं केस कापल्यानंतर लक्षात येतं. केस पुन्हा वाढेपर्यंत काहीच करता येत नाही. पण आता 'केअर ओएस' नावाच्या कंपनीने तयार केलेला स्मार्ट मिरर तुमचा हा प्रश्न सोडवणार आहे. या आरशासमोर उभं राहिल्यावर तुमच्या डोक्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या हेअरस्टाईल्स दिसू लागतील. यापैकी चांगली दिसणारी हेअरस्टाईल कोणती, हे ठरलं की झालं काम. तुम्ही ती स्टाईल करू शकता.

गंमत म्हणजे या आरशामुळे केस व्हर्च्युअली रंगवताही येतील. हा आरसा तुमच्या हालचाली टिपतो. म्हणजे फक्त डोकं हलवलं तरी आरशातली हेअरस्टाईल बदलेल. 'गुगल असिस्टंट'च्या मदतीनेही हा आरसा वापरता येईल. यातल्या 'स्मार्ट जेश्चर इंटरफेस'मुळे तुम्ही वेगवेगळ्या हेअरस्टाईल्स पाहू शकता. नव्या हेअरस्टाईलचा व्हिडिओही रेकॉर्ड करता येईल. तो दाखवून आवडीची हेअरस्टाईल करू शकता. अमेरिकेतल्या लास वेगासमध्ये 'कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक शो'चं (सीईएस) आयोजन करण्यात आलं होतं. त्यात अशा हटके तंत्रज्ञान असलेल्या वस्तू सादर करण्यात आल्या. पण या स्मार्ट मिररची चर्चा सगळीकडे रंगली होती.

### आरोग्यमंत्र — मीठ जास्त खाता?

बदलत्या आणि तणावग्रस्त जीवनशैलीमुळे सध्या अनेकांना कमी वयापासूनच उच्च रक्तदाबाचा त्रास मागे लागतो. मग रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी दररोज औषधं घ्यावी लागतात. पण काही घरगुती उपायही याकामी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. आज असाच एक उपाय जाणून घेऊ या.



उच्चरक्तदाबाची समस्या असल्यास आहारात मिठाचा वापर मर्यादित ठेवणं गरजेचं असतं. खरंतर मीठ कमी झालं तर पदार्थाची सारी चवचं संपते. मीठ अन्नात खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतं हे अमान्य करुन चालणार नाही. मीठ ही अशी गोष्ट आहे जी अन्नाच्या सर्व चवींना बांधून ठेवते. मीठ सोडियमचा सर्वात सामान्य स्त्रोत आहे. सोड्यिम बायकार्बोनेट आणि मोनोसोड्यिम ग्लूटामेटमध्ये देखील सोड्यिम आढळतं. सोडियम शरीरातील रक्तदाब आणि रक्ताचं प्रमाण नियंत्रित करण्यास मदत करतं. याव्यतिरिक्त मसल्स आणि नर्वस फंक्शनमध्येही सोडियम महत्त्वाची भूमिका निभावतं. पण कोणत्याही गोष्टीचं अतिसेवन हानिकारक ठरू शकते, त्याचप्रमाणे सोडियमचं प्रमाणही शरीराला हानी पोहोचवू शकतं. जास्त प्रमाणात सोड्यिमचं सेवन केल्यानं मूत्रात कॅल्शियमचं प्रमाण वाढतं आणि किड्नीशी संबंधित समस्यांची शक्यता वाढते. खेरीज शरीरात सोड्यिमचं प्रमाण जास्त असल्यानं ऑस्टिओपोरोसिसचा धोकाही वाढतो. ऑस्टियोपोरोसिस हा हाडांचा आजार आहे ज्यामुळे फ्रॅक्चरचा धोका वाढतो. हे सगळं लक्षात घेता मिठाचं सेवन मर्यादित असायला हवं.

### पंचांग

**गुरूवार, २२ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ शु. ४ **(गणेश जयंती)**,
चंद्रराशी : कुंभ,
नक्षत्र : शततारका, योग : वरियान,
सूर्योदय ७.१७, सूर्यास्त ६.२४

### फॉरवर्डस

**इस क़दर बट ग़ये हैं ज़माने में सभी क़ि ग़र...**

**ख़ुदा ख़ुद भीं आकर कहें ,मैं ख़ुदा हूँ तो लोग़ पूछ लेंगें किसके ?....!**

### फिटनेस फंडा

✻ फॅड डाएटच्या मागे लागू नका. विशिष्ट घटक आहारातून वर्ज्य करू नका. कॅलरींवर नियंत्रण ठेवा. आवडीचे पदार्थ अधून मधून खा. प्रथिनयुक्त आहारावर भर द्या. फळं, भाज्या, सॅलाड असा पोषक आहार घ्या.

✻ वजन कमी करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्या. वेलनेस कोचच्या मदतीने डाएट आणि व्यायामाच्या योजना तयार करा. या प्रयत्नांद्वारे तुम्ही अपेक्षित परिणाम प्राप्त करू शकाल.

### फिटनेस फंडा — ...तर होईल वजन कमी

दोस्तांनो, सद्यस्थितीत आहाराच्या बदलत्या सवयी, सतत बैठे काम आणि व्यायामाचा अभाव यामुळे अनेकांना वजनवाढीची समस्या हैराण करत आहे. अशा वेळी वजन कमी करण्यासाठी विविध प्रकारची डाएट्स, व्यायामप्रकार, वजन कमी करणाऱ्या पावडर यापैकी नेमकं काय निवडायचं याबाबत गोंधळ उडलेला दिसतो. पण काही उपायांमुळे तुमचं वजन कमी होऊ शकतं.



✻ पाणी प्यायल्यानंतर पुढच्या एक ते सव्वा तासात चयापचय क्रियेचा वेग २४ ते ३० टक्क्यांनी वाढतो. यामुळे अधिक कॅलरी खर्च होतात. जेवणाच्या अर्धा तास आधी अर्धा लिटर पाणी प्यायल्यामुळे तुलनेने कमी अन्न खाल्लं जातं. या उपायाद्वारे वजन झपाट्याने कमी झाल्याचं दिसून आलं.

✻ ब्लॅक कॉफीतील कॅफेनमुळे चयापचय क्रियेचा वेग वाढत असल्याचं सिद्ध झालं आहे. यामुळे कॅलरी लवकर खर्च होतात. या कॉफीत साखर किंवा अधिक कॅलरीयुक्त घटक नसावेत.

✻ साखरेमुळे वजन वाढतं. त्यामुळे आहारातलं साखरेचं प्रमाण कमी करा. काही मसाल्यांमुळे चयापचय क्रियेला गती मिळते. त्यामुळे आहारात मसाल्यांचा समावेश करता येईल.

✻ न्याहरीला अंडी खाल्ल्यानंतर पुढचे ३६ तास कमी भूक लागते. यामुळे या काळात शरीरात जाणाऱ्या कॅलरींचं प्रमाण ३५ टक्क्यांनी घटतं.

### खेचाखेची — पत्राचं काय?

**मानसशास्त्रज्ञ:** हे बघा मॅडम, तुम्हाला तुमच्या नवऱ्याचा राग आला तर त्याला एक पत्र लिहा आणि नंतर जाळून टाका!

.

.

.

.

**लेडी:** ...आणि पत्राचं काय करायचं?

### वेगळं काही

अँड्रिया नावाच्या एका तरूणीने लिहिलेलं प्रेमपत्र व्हायरल झालं आहे. विमानप्रवासात तिने हे पत्र लिहिलं आणि ते ती तिथेच सोडून गेली. या मुलीने हे पत्र विमानातल्या सिकनेस बॅगवर लिहिलं होतं. विमान लागणाऱ्यांची सोय म्हणून ही बॅग ठेवलेली असते. हे पत्र एका सफाई कर्मचाऱ्याच्या हाती पडलं. त्याने ते व्हायरल केलं. तिचं तिच्या सर्वात प्रिय मित्रावर प्रेम बसलं होतं. अँड्रियाने प्रवासातला कंटाळा दूर करण्यासाठी हे पत्रं लिहिलं. त्याला एवढी प्रसिद्धी मिळेल असं तिला स्वप्नातही वाटलं नव्हतं. तिने या पत्रातून आपल्या भावना व्यक्त करण्याची हिंमतही या पत्रातून मागितली. तिचं प्रेमपत्र लिहिण्याची हीच पद्धत लोकांच्या मनाला स्पर्शून गेली.

### स्कील डेव्हलपमेंट — योगशिक्षक होण्यासाठी...

सध्याच्या धावपळीच्या आणि वाढत्या ताण–तणावाच्या जमान्यात फिटनेसला खूप महत्त्व आलं आहे. विविध व्यायामप्रकारांसोबत अनेकांचा योगासनांकडे कल असतो. तुम्हाला करीअरचा वेगळा मार्ग निवडायचा किंवा योगशिक्षक, मार्गदर्शक म्हणून काम करायचं तर योगविषयक अभ्यासक्रम पूर्ण करता येतील.



✻ बारावीनंतर योगाचा दीड महिन्याचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहे. यासाठी वयोमर्यादा नाही. त्यामुळे ब्रेकनंतर नव्याने करीअर सुरू करायचं असेल तर हा पर्याय चांगला आहे.

✻ 'बॅचलर इन आर्टस'(योगा फिलोसॉफी) हा तीन वर्षांचा अभ्यासक्रम असून बारावी उत्तीर्ण झालेलं कोणीही याला प्रवेश घेऊ शकतं.

✻ 'पीजी डिप्लोमा इन योगा थेरपी' हा वर्षभराचा अभ्यासक्रम पदवीधर महिला करू शकतात तर दोन वर्षांचा 'मास्टर्स ऑफ आर्टस इन योगा' हा अभ्यासक्रम करून तुम्ही स्वतःचा योगा क्लास सुरू करू शकता.

✻ योगामध्ये प्रमाणपत्र, डिप्लोमा किंवा पदवी मिळवलेल्या महिला 'ॲडव्हान्स योगा टीचर ट्रेनिंग कोर्स' करू शकतात. यासाठी योग शिक्षणाचा दोन वर्षांचा अनुभव बंधनकारक आहे.

दैनिक महाभूमि
गुरुवार । २२ जानेवारी २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# बुलढाणा भूमि

**सोने-चांदी**

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) १४१०००
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) १४२०००
चांदी (प्रति किलो) २७६०००

**दखल...**

**सिंहासन..!**

बाटली बदलली
मदीरा तीच आहे..
पक्ष बदलले
चेहरे तेच आहे..

शासक बदलेले
धोरण तेच आहे..
उदिष्ट सर्वांचे
खुर्ची हेच आहे..!

**प्रा. अशोक सारडा, मेहकर.**
**(९४२१३९४३३९)**

**न्यूज ब्रीफ**

### मारहाणीतील फरार आरोपींना अटक

**बुलढाणा :** कोलवड बस स्टॅन्ड चौकात सामाजिक कार्यकर्ते निलेश पाटील यांना लोखंडी फायटरने जबर मारहाण करून फरार झालेल्या दोन आरोपींना बुलढाणा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मागील दोन आठवड्यांपासून फरार असलेले आरोपी आदेश राठोड आणि सूरज पसरटे या दोघांना वाघोली, पुणे येथील त्यांच्या मित्राच्या फ्लॅटवरून अटक करण्यात करण्यात आली आहे. बुलढाणा तालुक्यात राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रीय असलेले निलेश संतोषराव पाटील वय ४५ वर्षे रा. कोलवड हे ६ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास एमएच-२८-बीव्ही-२४७५ क्रमांकाच्या स्कुटीने दैनंदिन कामे आटोपून घराकडे परत निघाले होते. कोलवड येथील बसस्टॅन्ड चौकात पोहोचल्यानंतर एका काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीने त्यांचा रस्ता अडवला. त्यामुळे निलेश पाटील यांनी गाडी बाजूला घेण्यास सांगितले. त्यावेळी आरोपी आदेश सुनिल राठोड (वय २२) क्रीडा संकुल रोड, आयटीआय कॉलनी आणि सुरज मोतीराम पसरटे (वय २३) रा. विजय नगर, सुंदरखेड यांनी त्यांना बेदम मारहाण केली होती.

**शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध..**

# पाच नवीन ग्रामपंचायतींची भर; आता जिल्ह्यात ८७५ ग्रामपंचायती

**बुलढाणा/प्रतिनिधी**




जिल्ह्यात नव्याने पाच ग्रामपंचायतींची स्थापना करण्याबाबत शासन राजपत्रात स्वतंत्र अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.या निर्णयामुळे बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची संख्या ८७० वरून ८७५ झाली आहे. नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर त्या नियमानुसार गठित होतील.

नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींपैकी संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत २ तर सर्वसाधारण निकषांतर्गत ३ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत चिखली तालुक्यातील ग्रामपंचायत अंचरवाडीचे विभाजन करून वसंतनगर, मेहकर तालुक्यातील ग्रामपंचायत विश्विचे विभाजन करून राजगड येथे नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत. तर सर्वसाधारण निकषांअंतर्गत लोणार तालुक्यातील ग्रामपंचायत पारडाचे विभाजन करून धायफळ, जळगाव जामोद तालुक्यातील ग्रामपंचायत रसूलपूरचे विभाजन करून वायाळ (निमखेडी), तसेच ग्रामपंचायत सुनगावचे विभाजन करून चालठाणा खुर्द येथे नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची संख्या ८७० वरून ८७५ झाली आहे. नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर त्या नियमानुसार गठित होतील. जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासी बहुल वायाळ (निमखेडी) व चालठाणा खुर्द, तसेच लोणार तालुक्यातील मूळ ग्रामपंचायत पारडापासून तब्बल २४ किलोमीटर अंतरावर असलेल्या धायफळ गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेच्या जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व सहअध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समितीचे अशासकीय सदस्य डॉ. प्रशांत गलसिंग राठोड(मेहकर) व दीपक शिवसिंग साबळे (तरोडा) यांच्या पाठपुराव्यामुळे बंजारा तांडा भागासाठी वसंतनगर व राजगड या नवीन ग्रामपंचायतींची निर्मिती सुलभ झाली.

**दैनंदिन कामकाजात येणार सुलभता**

जिल्ह्यात ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजात सुलभता यावी तसेच नागरिकांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनुसार व शासनाच्या निकषांची पूर्तता होत असलेले प्रस्ताव जिल्हा परिषद बुलढाणा यांच्यामार्फत शासनाकडे सादर करण्यात आले होते. त्यानुसार नवीन पाच ग्रामपंचायतींची निर्मिती करण्यात आली आहे.

**या अधिकाऱ्यांचे योगदान ठरले महत्वपूर्ण**

नवीन ग्रामपंचायतींच्या निर्मितीसाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करण्यामध्ये संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे. निकषांची पूर्तता होत असलेल्या ग्रामपंचायतींनी अधिक माहितीसाठी व प्रस्ताव सादर करण्यासाठी संबंधित पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) शिवशंकर भारसाकळे यांनी केले आहे.

## पत्नीऐवजी दुसरीला बँकेत नेऊन काढले लाडक्या बहिणीचे पैसे

**डोणगाव/प्रतिनिधी**



लाडक्या बहिणीचे पैसे खिशात घालण्यासाठी एका बहाद्दराने अजब शक्कल लढविल्याचे उघड झाले आहे. पत्नीऐवजी दुसऱ्याच एका महिलेला बँकेत नेऊन तिच्या बनावट सहीने लाडकी बहीण योजनेचे पैसे काढल्याचा प्रकार डोणगाव येथील महाराष्ट्र बँकेत उघडकीस आला. बनावट सहीने बँकेतून पैसे काढल्या प्रकरणी पतीसह बँक अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी पत्नीने केली आहे.

राजगड येथील नेहा विशाल चव्हाण या विवाहितेने लाडकी बहीण योजनेसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा डोणगाव येथे बचत खाते काढले होते. त्यानंतर या महिलेचे व पतीचे वाद झाले व ती माहेरी राहायला गेली. असता तिच्या पतीने तिच्या माघारी डोणगाव येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेमध्ये दुसरी महिला उभी करून बनावट सहीच्या साह्याने बँकेच्या बचत खात्यामधून ११ ऑगस्ट २०२५ ला २८०० रुपये व ३ नव्हेंबर २०२५ ला तीन हजार रुपये काढले. बँक कर्मचाऱ्यांनी याची शहनिशा केली नाही. त्यामुळे पती विशाल पांडुरंग चव्हाण रा. पांगरखेड व महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी तक्रार महिलेने डोणगाव पोलीस स्टेशनला दिली आहे.

**सीसी कॅमेऱ्याचे फुटेज तपासले जाणार**

*महिलेच्या खात्यामधून ज्या दोन तारखांना पैसे काढण्यात आले त्याची शहनिशा करण्यासाठी सीसी कॅमेऱ्यामधील फुटेज पाहावे लागणार आहेत. पैसे काढण्याची स्लिप आहे त्यावर असलेली सही महिलेच्या सहीशी जुळत असल्याने सीसी फुटेज पाहिल्यानंतरच या प्रकरणावर सांगता येईल.*

*- **सचिन गोडे,** शाखा अधिकारी महाराष्ट्र ग्रामीण बँक डोणगाव*

## रमाई जयंती उत्सवाचे आयोजन

**बुलढाणा/प्रतिनिधी**



त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने समस्त उपासिका संघ व दि बुद्धिस्ट ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट बुलढाण्याच्या वतीने विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने विद्यार्थ्यांसाठी व महिलांसाठी विविध क्रीडात्मक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. रविवार २५ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता लुंबिनी बुद्ध विहार चिखली रोड येथे गीत गायन,संगीत खुर्ची व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार २६ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता सावित्रीबाई फुले नगर येथील बुद्ध विहारांमध्ये चित्रकला, रांगोळी आणि वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता गोवर्धन सभागृह बुलढाणा अर्बन मुख्य शाखेसमोर नागरी सत्कार, जाहीर व्याख्यान व पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील भोन या गावांमध्ये प्राचीन मौर्यकालीन भोन स्तुपाचे उत्खनन करून शोध लावणारे डेक्कन कॉलेज पुण्याचे प्रा.डॉ.बी.सी.देवतारे यांचा जाहीर सत्कार होणार आहे. या कार्यक्रमात मौर्यकालीन भोन स्तुपावर प्रसिद्ध विचारवंत इतिहासकार व्याख्याते प्रा.डॉ. विलास खरात हे मार्गदर्शन करणार आहेत.

## महाभूमिच्या 'ब्रम्हास्त्र'कारांचा ज्येष्ठ पत्रकारांकडून गौरव

**ब्रम्हानंद जाधवांसह डॉ.राजेश राजोरे, राजेंद्र काळें, सिध्देश्वर पवार यांचाही सन्मान**

**मेहकर/प्रतिनिधी**






अत्यल्प कालावधीत बुलढाणा जिल्हयासह छत्रपती संभाजीनगर, अकोला, वाशिम व जालना जिल्ह्यात वाचकांची पसंती ठरलेल्या दैनिक महाभूमिमध्ये दर आठवड्याला प्रकाशित होणाऱ्या ब्रम्हास्त्र या सदराचे सलग १०० भाग यशस्वीरित्या पूर्ण झाले. अखंडितपणे या सदराच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विषयावर अभ्यासू भाष्य करणारे दै. महाभूमिचे कार्यकारी संपादक ब्रम्हानंद जाधव यांच्या लेखनीची दखल व्हाईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेने घेऊन त्यांना मेहकर येथे आयोजित पत्रकार सन्मान सोहळयात सन्मानित करण्यात आले.

के.व्ही.प्राइड सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे राज्य अध्यक्ष अनिल म्हस्के होते तर उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, मुख्याधिकारी रामराजे कापरे, पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार, व्हॉइस ऑफ मीडियाचे ज्येष्ठ पदाधिकारी सुधीर चेके पाटील, सिध्दार्थ आराख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रारंभी युगराज पठ्ठे, ज्ञानेश्वर इंगळे, भरत सारडा, विशू दळवी आदींनी पाहुण्यांचा सत्कार केला. जयचंद बाठिया , व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पवार यांनी प्रास्ताविकातून पत्रकार सन्मान सोहळ्याच्या आयोजना मागची भूमिका स्पष्ट केली. यावेळी राजेश राजोरे, सुधीर चेके, अनिल म्हस्के आदींची माहितीपूर्ण भाषणे झाली. सूत्रसंचालन अजीम नवाज राही यांनी केले.

**ज्येष्ठ पत्रकारांचाही सन्मान**

पत्रकारितेवर पीएचडी केलेले ज्येष्ठ पत्रकार राजेश राजोरे यांच्यासह आपल्या सदराचे १ हजार भाग पूर्ण केल्याबद्दल पत्रकार राजेंद्र काळे यांचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन विशेष सत्कार करण्यात आला. सोबतच ज्येष्ठ पत्रकार मुकुंद जोशी ,नागेश कांगणे, जमीर शाह, सय्यद महबूब, रफिक कुरेशी, भरत सारडा आदींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

**हृदय सत्कार**



**बुलढाणा :** येथील ए.एस.पी.एम.आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश्वर उबरहंडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला. यावेळी अदिती अर्बनचे संस्थापक अध्यक्ष तथा दैनिक महाभूमिचे मुख्य संपादक सुरेश देवकर, कार्यकारी संपादक ब्रम्हानंद जाधव, व्यवस्थापक प्रा.राजू वैद्य, पंकज शेजोळ, सागर काळवाघे, संदीप गावंडे, नीलेश हरकल.

## अवैधरित्या रेती वाहतूक करणारे तीन टिप्पर पकडले

**डोणगाव/प्रतिनिधी**




सध्या अवैध उत्खनन व रेती वाहतूक जोमात सुरू आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांनी एकाच रात्री दोन ठिकाणी कारवाई करत ३ टिप्परवर कारवाई करत ९१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मेहकर पोलीस स्टेशन अंतर्गत झालेल्या कारवाईमध्ये जानेफळ रोडवर फर्दापूर शिवारात २० जानेवारीच्या रात्री साडेअकरा वाजता हॉटेल रायबा जवळ नाकाबंदी करण्यात आली होती. यावेळी टाटा कंपनीचे टिप्पर एम एच २८ बी बी ९१०९ व एम एच २८ बीबी ९१८१ दोन्ही टिप्परमध्ये सहा सहा ब्रास रेती दोन्ही टिप्परची अंदाजे किंमत ५० लाख व रेती अंदाजे किंमत ८४ हजार रुपये व दोन्ही चालकाजवळी मोबाईल असा एकूण ५१ लाख ४ हजार रुपये चालक, वाहक व मालक यांच्याविरुद्ध मेहकर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवण्यात आला. जानेफळ पोलीस स्टेशन अंतर्गत गोमेधर शिवारात जानेफळ ते मेहकर रोडवर गौण खनिज चोरी करून वाहतूक करणारे टिप्पर क्रमांक एम एच २८ बी वाय ५९६९ ज्यामध्ये सहा ब्रास रेती होती त्याची किंमत ४२००० तसेच टिप्परची अंदाजे किंमत चाळीस लाख रुपये जप्त करण्यात आले. वाहन चालक-मालक यांच्याविरुद्ध जानेफळ पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला सदर कारवाई मध्ये एकूण ९१ लाख ४६००० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनामध्ये पोलिस पथकाने केली.

**'गावकरी ते राव ना करी' पांगरखेडवासीयांनी ठेवला आदर्श**

## लोकसहभागातून विकास कामे पाहता सिईओ भारावले !

**डोणगाव/प्रतिनिधी**



मेहकर तालुक्यातील पांगरखे या गावाने यापूर्वी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राज्य पातळीवर आपला ठसा उमटवलेला आहे. आता पुन्हा गावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत लोकसहभागातून विकास कामे करायला सुरुवात केली असून, गावातील ग्रामस्थांचा लोकसहभाग पाहून बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात भारावून गेले. गाव करी ते राव ना करी अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी २१ जानेवारी रोजी पांगरखेड येथे भेट देऊन गावाची पाहणी केली. ग्रामपंचायतने केलेल्या कामाचा आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. पांगरखेड गावाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत राज्य पातळीवर पुरस्कार मिळवून राज्यात नवलौकिक प्राप्त केला होताआता पुन्हा या गावाने विकासाची कास धरली व मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत स्वतःला सिद्ध करण्यासाठी लोकवर्गणीच्या माध्यमातून गावाचा विकास घडून आणला. त्यामुळे तालुक्यातीलच नव्हेतर जिल्हयातील इतर गावांनीही या गावाचा आदर्श घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्त केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर बारसाकडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राठोड, मेहकरचे गटविकास अधिकारी दिनकर खरात, संदीप मेटांगळे सहाय्यक गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी तेजस गवई, पंडागळे यांच्यासह पांगरखेड येथील ग्रामसेवक सागर काळे, सरपंच सुधाकर मधुकर धंदरे, उपसरपंच सिंधुताई नंदकिशोर सुर्वे, ग्रामपंचायत कर्मचारी व गावकरी उपस्थित होते.

**विकास कामांचे केले कौतूक**

पांगरखेड येथे लोकसहभागातून शेततळे, अटल घनवन योजना, सर्व सुविधायुक्त जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, सुसज्ज बाजार ओटे, गावाची साफसफाई, सांडपाण्यासाठी अंतर्गत गटार योजना, ग्रामपंचायत भवन अशी विकास कामे करण्यात आली आहेत. ही कामे पाहून सिईओ यांनी समाधान व्यक्त केले.

## सर्व विषय समित्यांचे सभापती अविरोध

**लोणार/प्रतिनिधी**



येथल नगर परिषदच्या विषय समितीची निवड मंगळवारी पार पडली. यामध्ये सर्व विषय समिती सभापतींची अविरोध निवड करण्यात आली. निवडणुकीचे पीठासीन अधिकारी म्हणून मेहकर उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांनी कामकाज पाहिले.

अविरोध निवड झालेल्यामध्ये शिक्षण सभापतीपदी नगरपरिषद उपाध्यक्ष आबेद खान मोमीन खान यांची निवड करण्यात आली तर सार्वजनिक बांधकाम समिती पदी अनिकेत राजेश मापारी यांची निवड करण्यात आली तर आरोग्य सभापतीपदी अब्दुल उबेद अब्दुल मुनाफ यांची निवड करण्यात आली. पाणीपुरवठा सभापतीपदी वंदना अरुण जावळे यांची निवड करण्यात आली तर महिला व बालकल्याण सभापतीपदी वर्षा संतोष मापारी नियोजन आणि विकास समितीपदी साहेबराव मारोती पवार यांचा समावेश आहे. सदर विषय समिती सभापतीसाठी प्रत्येकी एक अर्ज आल्याने ही निवडणूक अविरोध झाल्याचे पिठाचे अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी तथा प्रभारी मुख्याधिकारी अमोल लांडे यांनी जाहीर केले .

यावेळी नगराध्यक्ष मीरा भूषण मापारी, उपाध्यक्ष आबेद खान मोमीन खान, काँग्रेस गटनेत्या सीमा नितीन शिंदे, पाणीपुरवठा सभापती वंदना अरुण जावळे, महिला व बालकल्याण सभापती पदी वर्षा संतोष मापारी, आरोग्य सभापती अ. उबेद अ. मुनाफ, बांधकाम सभापती अनिकेत राजेश मापारी, नियोजन आणि विकास समिती सभापती साहेबराव मारोती पवार, नगरसेविका हुमेरा सदफ शेख जमील, शेख नगमा बी शेख जावेद, जुबेदा रमजान परसुवाले, पायल शुभम भगत, सुप्रिया गजानन मापारी, शोभा भागवत देसाई, संध्या शाम राऊत, संगीता गोविंद मापारी , नगरसेवक भूषण विश्वनाथ मापारी, गुलाबराव चंद्रभान सरदार, पंढरी पुंजाजी चाटे, शेख मकसूद शेख उस्मान, अक्षय नंदकुमार इंगळे , मयूर गोलेच्छा, गजानन शालिकराम मापारी आदी नगरसेवक उपस्थितीत होते.

## जेन झेडची ताकद!

नेपाळच्या राजकारणात सध्या अस्थिरता, असंतोष आणि अपेक्षा यांचा संगम दिसून येतो. जनरल झेडच्या आंदोलनाने सत्तास्थानांना हादरवून टाकल्यानंतर आता ५ मार्च रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका देशाच्या भवितव्याचा निर्णायक टप्पा ठरणार आहेत. विशेष म्हणजे या निवडणुकीत चार माजी पंतप्रधान थेट जनतेच्या कौलासाठी रिंगणात उतरले आहेत, ही बाब नेपाळच्या राजकीय संघर्षाचे गांभीर्य अधोरेखित करते. दरम्यान, नेपाळ कम्युनिस्ट पक्षाचे (माओवादी केंद्र) माजी पंतप्रधान पुष्प कमल दहल 'प्रचंड' रुकुम पूर्व येथून निवडणूक लढवत आहेत. नेपाळ कम्युनिस्ट पक्षाचे माधव कुमार नेपाळ आणि प्रोग्रेसिव्ह डेमोक्रॅटिक पक्षाचे बाबुराम भट्टराय यांनी अनुक्रमे रौतहट-१ आणि गोरखा-२ मतदारसंघातून आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तथापि, नेपाळी काँग्रेसचे नेते शेर बहादूर देउबा आणि नेपाळी कम्युनिस्ट पक्षाचे वरिष्ठ नेते झलानाथ खनाल हे या स्पर्धेत नाहीत. नेपाळमध्ये जनरल झेड तरुणांच्या नेतृत्वाखालील हिंसक निदर्शनांनंतर ओली यांनी ९ सप्टेंबर रोजी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला, ज्यामुळे सार्वत्रिक निवडणुकांची आवश्यकता निर्माण झाली. नवीन पिढी किंवा जनरेशन झेडमध्ये १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेल्या मुलांचा समावेश आहे. या १५ वर्षांच्या कालावधीत जन्मलेल्या मुलांना जनरल झेड म्हणतात. २०२५ पर्यंत, ही पिढी जागतिक कार्यबलाच्या अंदाजे ३० टक्के असेल आणि ती आपल्या अद्वितीय विचारसरणी आणि सवयींनी समाज आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम करत आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये 'जनरल झेड' बंडाचे एक मुख्य कारण म्हणजे गेल्या १५ वर्षांपासून तीन वरिष्ठ नेते - देउबा, प्रचंड आणि ओली पंतप्रधान होण्यासाठी एकमेकांशी खेळत होते. जनरल झेडमधील तरुणांना (१९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली मुले) बदल हवा होता आणि त्यांनी असेही सूचित केले की ते जुन्या नेतृत्वाला कंटाळले आहेत. असे असूनही, हे चार नेते आहेत जे ७० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत. ओली ७४ वर्षांचे आहेत, प्रचंड आणि भट्टराय दोघेही ७१ वर्षांचे आहेत. माधव कुमार नेपाळ ७२ वर्षांचे आहेत. या निवडणुकीत न लढणाऱ्या दोन माजी पंतप्रधानांपैकी खनाल यांनी स्वेच्छेने शर्यतीतून बाहेर पडण्याचा पर्याय निवडला आहे, तर देउबा यांना त्यांच्याच पक्षातील तरुण नेत्यांच्या विरोधामुळे शर्यतीतून बाहेर पडावे लागले आहे. देउबा हे त्यांच्या दादेलधुरा मतदारसंघातून आठव्यांदा निवडणूक लढवू इच्छित होते, परंतु पक्षाचे नवनिर्वाचित अध्यक्ष गगन थापा यांनी अखेर त्यांना 'जनरल झेड' यांच्या भावना लक्षात घेऊन दूर राहण्यास पटवून दिले. सोमवारी रात्री देउबा यांच्या वैयक्तिक सचिवालयाने एक निवेदन जारी केले की ते यावेळी निवडणूक लढवणार नाहीत, तर त्यांच्या पत्नी आणि माजी मंत्री आरजू राणा देउबा, ज्या पूर्वी कैलाली येथून निवडणूक लढवण्यास इच्छुक होत्या, त्या आता माघार घेतील. दरम्यान, माजी पंतप्रधान हे एकमेव उमेदवार नाहीत. देशभरातील तीन महापौरांनी त्यांच्या पदांचा राजीनामा दिला आहे आणि ते सार्वत्रिक निवडणूक लढवत आहेत. जनरल झेडचे आंदोलन केवळ सरकारविरोधी नव्हते, तर ते संपूर्ण राजकीय व्यवस्थेवरील अविश्वासाचे प्रतीक होते. आता या निवडणुकीत जेन झेडची ताकद बघायला मिळू शकते!

# महानगरपालिका निवडणुकीनंतर समीकरण बदलाची नांदी!

## बालेकिल्ल्यात पराभवाची सल : संघटन मजबूत करून पुनर्बांधणीची गरज

**राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांचे निकाल सत्ताधारी महायुतीसह महाविकास आघाडीमध्येही समीकरणे बदलाची नांदी ठरू शकतात. काही ठिकाणी अपेक्षित यश मिळाले असले तरी अनेक दिग्गज उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला पुण्यातील त्यांच्या बालेकिल्ल्यात दारुण पराभव पत्करावा लागला. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने मुंबई या त्यांच्या बालेकिल्ल्यात जोरदार लढत दिली, तर इतर शहरांमध्ये त्यांना चांगलाच धक्का बसला. तर काँग्रेसने काही शहरांमध्ये आपली पकड मजबूत केल्याचेही बघायला मिळाले. संघटन मजबूत करून पुनर्बांधणीची गरज याठिकाणी अधोरेखित होते.**

महा भूमिका



● ब्रम्हानंद जाधव
कार्यकारी संपादक
(मो.नं.९८३४४९०११७)



महानगर पालिकेच्या निवडणूक निकालानंतर राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघाले आहे. काही ठिकाणी अनपेक्षित निकाल समोर आल्याने भविष्यात मित्र पक्षांची साथही धोक्यात आली आहे. भाजपने २९ महानगरपालिकामध्ये एकूण २ हजार ८६९ जागांपैकी १ हजार ४२५ जागा जिंकल्या, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ३९९, काँग्रेसने ३२४, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने १६७, शिवसेना (उबाठा) १५५, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) ३६, महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) १३, बसपा सहा, राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पक्षांनी (एसईसी) १२९, मान्यता नसलेल्या पक्षांनी १९६ जागा आणि १९ अपक्ष उमेदवारांनी विजय मिळवला. या निवडणुकीत काँग्रेसने एकूण तिसऱ्या क्रमांकावर राहून आणि महाविकास आघाडी, शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) या मित्रपक्षांपेक्षा चांगली कामगिरी केल्याने, ही परिस्थिती २०२९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी समन्वय, जागावाटप आणि नेतृत्व यावर पुनर्विचार करण्यास भाग पाडेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शिवसेना (उबाठा) ने सत्ता गमावली आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसशी युती करूनही राष्ट्रवादी (शरद पवार गट) ने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील त्यांचे बालेकिल्ले गमावले आहेत. काँग्रेस आता कोल्हापूर, चंद्रपूर आणि भिवंडीमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आली. काँग्रेस पक्ष आता महाविकास आघाडीमध्ये आपला वाटा वाढवण्याचा प्रयत्न करेल, असा दावा करत ठाकरे आणि पवार यांचे प्रादेशिक अभिमानकार्ड भाजपची प्रगती रोखण्यात अपयशी ठरले आहे. ठाकरे यांचा पक्ष मुंबईत भाजपचा मुख्य प्रतिस्पर्धी राहिला आहे, परंतु राज्याच्या इतर भागांमध्ये त्यांचा प्रभाव कमी झाला आहे, ज्यामुळे महाविकास आघाडीमध्ये वरिष्ठ भागीदार असल्याचा त्यांचा दावा थेट प्रभावित होईल. शिवसेना (उबाठा) आणि शिवसेनेमधील मतांच्या विभाजनामुळे अनेक वॉर्डांमध्ये सत्ताधारी युतीला फायदा झाला आहे. पुणे जिल्ह्यात झालेल्या दारुण पराभवानंतर आणि बहुतेक शहरी भागात एक-अंकी जागांच्या संख्येनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट सर्वात जास्त प्रभावित झाला आहे, ज्यामुळे आता महाविकास आघाडीचा शिल्पकार असल्याच्या त्यांच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. जागांच्या संख्येवरून असे दिसून येते की काँग्रेस आता संपूर्ण महाराष्ट्रात अस्तित्व असलेला एकमेव विरोधी पक्ष आहे, ज्यामुळे त्यांना त्यांच्या राष्ट्रीय अजेंड्याला प्राधान्य देणारा किमान समान कार्यक्रम पुढे नेण्यास भाग पाडले जाईल. यामुळे शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांना एकतर समर्थनाच्या भूमिकेत राहावे लागेल किंवा विरोधी मतांमध्ये त्रिपक्षीय फूट पडण्याचा धोका पत्करावा लागेल. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीपासून दोन्ही पक्षांना काँग्रेससोबत एकत्र काम करावे लागेल. पराभूत पक्षांना आता रस्त्यावर उतरून त्यांच्या संघटनांची पुनर्बांधणी करण्याची आणि नवीन नेतृत्व स्थापन करण्याची वेळ आली आहे. काँग्रेससाठी पुढे जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्थानिक पातळीवर त्यांचे संघटन मजबूत करणे. भाजपशी लढण्यासाठी, पक्षाने एकत्र येऊन त्यांच्या युती धोरणाचा पुनर्विचार केला पाहिजे. हा पराभव अंतिम नसून, तो पुढील लढ्याची सुरुवात ठरू शकतो.

## कसे असेल नववर्षातले राजकीय चित्र ?

नोंद
- मंजिरी ढेरे

राजकीय पातळीवर शांतता बघायला मिळण्याची अपेक्षा आहे. काही अपवाद वगळता देशात निवडणुकांची रणधुमाळी नसल्याने सरकारला प्रचाराचा अजेंडा विकासकामांकडे वळवण्यास सवड मिळेल, हा विचार आपण आता व्यक्त करु शकतो. दुसरीकडे, एक तपापेक्षा अधिक काळ लोटल्यामुळे आता सरकारही पुरते स्थिरावले आहे. त्यामुळे समाजाची नस ओळखून ते उचित निर्णय घेतील, अशी आशा बाळगू या.

२०२५ निरोप देऊन आपण २०२६ मध्ये प्रवेश केला. २०२५ अनेक महत्त्वपूर्ण घडामोडींनी गजबजलेले राहिले. देश आणि जगाच्या पातळीवर अनेक घटना घडल्या. त्याचे काही परिणाम आपल्यालाही सोसावे लागले. मात्र एक नक्की, या सगळ्या काळात भारतामध्ये प्रस्थापित सरकार आता स्थिरावलेले दिसले. २०२६ मध्ये त्याचे प्रतिबब बघायला मिळणार आहे. सत्ताधारी अति न ताणता, जनविरोध लक्षात घेत आवश्यक तेथे माघार घेत पुढे जाण्याचे तंत्र अवगत करत आहे. म्हणूनच काही राज्य वगळता देशाच्या अनेक भागांमध्ये भाजपाचा वाढता प्रभाव अनुभवास येतो आहे. मात्र या सगळ्यात आपल्या पक्षाला इतरांपेक्षा वेगळे मानण्याचे वा तसे भासवण्याचे प्रयत्नही फसल्याचे चित्र नाकारुन चालणार नाही. अगदी काही दिवसांपूर्वीपर्यंत तीव्र विरोध नोंदवणाऱ्यांशी, त्यांच्यावर टिकेची झोड उठवणाऱ्यांशी, त्यांच्या भ्रष्टाचाराचे दाखले देत तुरुंगात धाडण्याची भाषा करणाऱ्यांशीच संगनमताने सरकार स्थापन करण्यापर्यंतचा व्यवहार सर्वसामान्यांच्या नजरेतून सुटलेला नाही. विरोधकही याचा नेमका अर्थ सांगत जनतेला सजग करण्याचा पुरेपूर प्रयत्न करताना दिसत आहेत. २०२६ निवांत असले आणि मोठ्या निवडणुका नसल्यामुळे सरकार विकासकामांवर लक्ष केंद्रीत करेल आणि जनतेचा विश्वास संपादन करुन भारताला दाखवलेले ‘अच्छे दिन’ दाखवेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. एक तपापेक्षा अधिक काळ सत्तेत असणाऱ्या या सरकारकडून सर्वसामान्यांना तसेच २०२६ लादेखील हीच अपेक्षा आहे. या वर्षी पंतप्रधान मोदी आणि विरोधी पक्षनेत्यामध्ये संघर्ष दिसून येण्याची दाट शक्यता आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांपासून सुरू झालेला संघर्ष आता भारतीय राजकारणात वारंवार घडणारा विषय बनत आहे. मोदी सरकार राजकीय, आर्थिक आणि सामाजिक आघाड्यांवर अग्निपरीक्षेला तोंड देत असून काँग्रेसचा आक्रमक पवित्रा त्यांच्या अडचणी वाढवू शकतो. याची सुरूवात सरत्या वर्षीच झाली असून ‘मनरेगा’च्या नाम बदलावरुन झालेला वाद येत्या काळात कोणते रुप धारण करतो, हे बघावे लागेल.

**(क्रमश:)**

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## श्रमप्रतिष्ठा रुजविण्यासाठी काय करावे ?



॥श्रम सिध्दी॥
डॉ. विकास बाहेकर
बुलढाणा
मो.नं ९४२२१८१३२५

श्रमप्रतिष्ठेचे वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात फार महत्त्वाचे स्थान असते. ज्या समाजात श्रमप्रतिष्ठेला महत्त्व दिले जात नाही, तो समाज अधोगतीच्या दिशेने वाटचाल करतो. आजच्या स्पर्धात्मक, गतिमान, चंगळवादी, सुखासीन काळात श्रमप्रतिष्ठेच्या उपयोजनाने मानसिक सुख आणि आत्मिक समाधान लाभू शकते. या श्रमप्रतिष्ठेच्या अभावी व्यसनाधीनता, वेगवेगळे मानसिक आजार, गुन्हेगारी वृत्ती, कौटुंबिक हिंसाचार, सामाजिक असहिष्णूता वाढीस लागते. त्यातूनच बेरोजगारी, नैराश्य, आत्महत्या, मादक पदार्थांचे सेवन, साथीचे आजार आणि राजकीय अराजकता निर्माण होऊ शकते. म्हणून श्रमप्रतिष्ठेसंबंधी प्रबोधन होणे गरजेचे आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे संपूर्ण जीवन कर्ममय आणि श्रमनिष्ठ होते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत श्रमाची उपासना करून स्वतःची वैचारिक आणि वाङ्मयीन जडणघडण केली. ते एक श्रमनिष्ठ लोककलावंत आणि जननायक होते. ग्रामोद्धार हे त्यांचे स्वप्न होते. राष्ट्रसंतांचा हा आदर्श त्यांच्या लिखाणातून, भजना-गाण्यांतून आणि चरित्रातून शालेय स्तरावर सर्व विद्यार्थ्यांच्या मनावर ठसला पाहिजे त्यासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्व जाणकारांनी (शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, अधिकारी आणि संस्थाचालक) आपापल्या स्तरावर वार्षिक कार्यक्रम-उपक्रमांचे नियोजन करून त्याची यथाशक्ती अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

कौटुंबिक पातळीवर स्त्री-पुरूषांनी स्वतः सगळ्या प्रकारचे श्रम करून त्याचे महत्त्व आणि आवश्यकता कुटुंबातील मुला-मुलींना पटवून द्यावी. त्यात मुलगा आणि मुलगी असा कोणत्याही प्रकारचा भेद करू नये. त्यामुळे पुरूषांची कामे वेगळी आणि स्त्रियांची कामे निराळी असा भेदभाव आधी कुटुंबात आणि मग समाजात निर्माण होणार नाही. समाजातील कोणतीही व्यक्ती कितीही श्रीमंत असली तरी तिला उपजीविकेसाठी श्रम करणे भाग पडले पाहिजे, त्यासाठी त्याला कायद्याच्या किंवा समाजनियंत्रकांच्या माध्यमातून तसे करणे बंधनकारक झाले पाहिजे. उदा. सेवाग्राम आश्रमात प्रत्येकाला जेवणाचा खर्च निघेल एवढे श्रम करणे अनिवार्य असते.

श्रमप्रतिष्ठेला पूरक उपकारक असलेल्या प्रचलित शासकीय योजनांचा गतिमान आणि प्रभावीपणे वापर करून वर्षातून वेळोवेळी प्रासंगिक स्वरूपात 'श्रमप्रतिष्ठा मोहीम' राबविली पाहिजे. श्रम करणे हा प्रत्येकाचा स्वभाव बनला पाहिजे, श्रमदानाची कोणलाही लाज वाटू नये; इतकेच नव्हे तर स्वतःच्या आरोग्यासाठी-स्वास्थ्यासाठी श्रमप्रतिष्ठेशिवाय पर्याय नाही ही खूणगाठ मनाशी बांधली पाहिजे. त्यासाठी लोकसंत आणि समाजसुधारक गाडगेबाबा यांचा आदर्श समाजासमोर ठेवला पाहिजे. तात्पर्य, श्रमप्रतिष्ठेचे उपयोजन ही संकल्पना केवळ टूम नव्हे तर सवयीचा भाग झाली पाहिजे. भारत हा कृषिप्रधान आणि खेड्यापाड्यांचा देश आहे. 'खेड्याकडे चला' हा गांधीजींचा नारा होता. 'ग्रामोद्धार' हे राष्ट्रसंतांचे स्वप्न होते. कोणत्याही गावाचा विकास श्रमसंस्कृती रूजविण्याशिवाय शक्य नाही, हे पक्के ठरवून शासन, सामाजिक संस्था, एन.जी.ओ., वाचनालये, शाळा यांच्या मार्फत गावागावात श्रमनिष्ठा रूजविण्याचे कार्यक्रम पार पाडले गेले पाहिजे. त्यासाठी स्थानिक स्तरावर, गावपातळीवर सर्व आघाड्यांवर कालबद्ध प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याशिवाय ही 'श्रमप्रतिष्ठा-लोक चळवळ' रूजू शकणार नाही.

श्रमप्रतिष्ठेचे मर्म उलगडून दाखविणारे पाठ शालेय अभ्यासक्रमात माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर आवर्जून समाविष्ट करावे. मूल्यशिक्षणात श्रमप्रतिष्ठेला अव्वल स्थान देण्यात यावे. महाविद्यालयीन तसेच विद्यापीठीय अभ्यासक्रमात तसेच विविध कार्यक्रम उपक्रमांत श्रमप्रतिष्ठेला सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक ह्या दोन्ही स्तरांवर श्रमप्रतिष्ठेच्या बाबतीत नियोजन करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. श्रम हे मुख्य जीवनसूत्र असून ऐदीपणा, आळशीपणा ह्या बाबी हरामाच्या, त्याज्य आणि निषेधार्ह मानाव्यात, तसेच या सूत्राचा विविध क्षेत्रातील प्रमुखांनी आग्रह धरावा आणि त्यादृष्टीने प्रयत्न करावेत. श्रमप्रतिष्ठा हे पुरोगामी महाराष्ट्राचे भूषण मानावे. शाहू-फुले-आंबेडकरांचा तो वारसा आहे असे समजून तो सर्वांनी कृतीत आणण्याचा यथाशक्ती प्रयत्न करावा.

शारीरिक कष्टाची कामे करणाऱ्यांना मिळणारी मजुरी आणि बौद्धिक श्रम करणाऱ्यांना मिळणारे वेतन किमान समान प्रमाणात असावे, त्यात फार मोठी तफावत नसावी. कष्ट करणाऱ्यांना कमी मोबदला मिळाला आणि पांढरपेशी मध्यमवर्गाला तसेच इतर सर्व प्रस्थापित असणाऱ्यांना जास्त आर्थिक लाभ झाला तर समाजाचे संतुलन बिघडते आणि समाज नैतिक अधःपतनाकडे वाटचाल करू लागतो. म्हणून मजुरी आणि वेतनातील ही तफावत दूर करण्यासाठी शासन-प्रशासन स्तरावर प्रयत्न झाले पाहिजेत. शहरी आणि ग्रामीण भागात वाढत जाणारी आर्थिक दरी ही शहरी जीवनाला आळशी आणि सुखासीन बनविणारी आहे. शहरी जीवनातील लहान मुलांवर बालपणापासून श्रमविन्मुखतेचे कळत नकळत संस्कार होत जातात. शहरातील सुबत्तेमुळे आलेली निष्क्रीयता आणि आळशीपणा, हा ग्रामीण भागातील लोकांचा पहिल्यांदा असुयेचा आणि नंतर अनुकरणाचा भाग बनतो. स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये सुद्धा आर्थिक दृष्टिकोनातून कोणताही भेदभाव करू नये. स्त्रियांच्या श्रमाची कदर करावी, त्याबद्दल पुरूषांनीही आदरभाव बाळगावा. गृहिणीचे श्रमही अत्यंत महत्त्वाचे आहेत, त्या वेठबिगार नाहीत. साफसफाई, पाकसिद्धी, गृहव्यवस्थापन आणि सण-उत्सव-स्वागत-सोहळे यांतील त्यांचे योगदान लक्षात घ्यावे. पर्यायाने मुलगा-मुलगी यांच्यावर बालपणापासूनच श्रमप्रतिष्ठेचे संस्कार होतील, ही श्रमप्रतिष्ठा त्यांना गृहसंस्कारातून मिळाली पाहिजे. त्यासाठी सर्वांनी श्रमप्रतिष्ठा हा आपला जीवनमार्ग आणि स्थायीभाव बनविला पाहिजे.

'सत्कर्माद्वारे ईश्वरपूजा' असा या मांडणीचा आध्यात्मिक अर्थ सांगता येईल. लोकांना कसल्याही कामाची लाज वाटू नये, म्हणून भगवंतांनी भक्ताची कामे केली, असे वारकरी संप्रदाय सांगतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' म्हणजे गावपातळीवर श्रमप्रतिष्ठेची संकल्पना राबवून गावाचा, समाजाचा आणि देशाचा सर्वांगीण विकास कसा होऊ शकतो, या विचाराचे केलेले सोदाहरण प्रकटीकरण आहे, यात शंका नाही.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## नेताजी सुभाषचंद्र बोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग



- डॉ. राजेंद्र बगाटे
(समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक)



भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता.

नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली.

आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.

भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला. आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली. सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती.

स्त्री-सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील ‘राणी झाशी रेजिमेंट’ ही भारतीय इतिहासातील स्त्री-मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता. नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोक कल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी ‘फोडा आणि राज्य करा’ या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन ‘जय हिंद’चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होते. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८
पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** **RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27**

छत्रपती
# संभाजीनगर भूमि
दैनिक महाभूमि
गुरुवार २२ जानेवारी २०२६
mahabhoomimarathwada@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### भरधाव ट्रॅक्टरची धडक; मजुराचा मृत्यू

**वाळूज महानगर :** भरधाव व निष्काळजीपणे चालविलेल्या ट्रॅक्टरने दिलेल्या धडकेत एका मजुराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवार, १८ जानवोरी घडली होती. याप्रकरणी सोमवार, १९ जानेवारी वाळूज पोलिस ठाण्यात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राधा शिवनाथ पवार (३८ वर्ष) यांच्या फिर्यादीनुसार, रविवारी सकाळी ११ वाजता त्यांचे पती शिवनाथ एकनाथ पवार (५१ वर्ष) हे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर मार्गावर जिल्हा परिषद शाळेजवळ, सहारा ज्यूस सेंटरसमोर उभे असताना ट्रॅक्टर क्रमांक (एमएच-२०-एफपी-२१९६) चालकाने भरधाव वाहन चालवून त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात शिवनाथ पवार गंभीर जखमी झाले असून, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. ट्रॅक्टर इतका वेगाने आला की धड़क दिल्यानंतर घटनास्थळीच शिवनाथ यांचा अंत झाला. या घटनेप्रकरणी आरोपी दिगंबर हरी मधे (रा. जहूर ठाकूरवाडी, ता. कन्नड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जॅकवेलची साफसफाई, भंगार साडेचार कोटींचे

**छत्रपती संभाजीनगर:** जायकवाडीतून पाणी उपसण्यासाठी भव्य जॅकवेलची उभारणी केली. एक महिन्यापासून जॅकवेलमधील साफसफाईचे काम सुरू करण्यात आले. यातील टाकाऊ साहित्य, स्टीलची भंगारात विक्री केली असता कंत्राटदाराला साडेचार कोटी रुपये मिळाले. नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरू आहे. जीव्हीपीआर कंपनीकडून योजनेचे काम सुरू आहे. मुख्य जलवाहिनीसह पाणी उपसा विहीर, जलशुद्धीकरण केंद्र, पाणी साठवण टाक्यांची कामे पूर्ण झालीत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात २०० एमएलडी पाणी शहरात आणण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे.

### खुलताबादच्या तीन गटांसाठी ३० अर्ज दाखल

**खुलताबाद :** तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या तीन गटात ३० उमेदवारांनी तर पंचायत समितीच्या ६ गणासाठी ६५ उमेदवारांनी बुधवार, २१ जानेवारी रोजी आपले उमेदवारी अर्ज दाख्ला केले. यामध्ये कुणाल शंकरराव दांडगे, भिमराव लक्ष्मण खंडागळे, रेखा प्रकाश चव्हाण, दिनेश आंनदा अंभोरे, सोनाली प्रवीण चव्हाण, ऋतुजा राजू गायकवाड, दीप्ती सतीश शुक्ला, शोभाबाई भिमराव नलावडे, रेखा सोमीनाथ गायकवाड, शोभाताई जगन्नाथ खोसरे, जगन्नाथ त्र्यंबक खोसरे, ज्ञानेश्वर दुधारे, कारभारी ढिवरे आदींनी उमेदवारी अर्ज दाखल केले. दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची गुरुवार, २२ जानेवारी रोजी छाणनी करण्यात येणार आहे.

## नवनियुक्त नगरसेवकांचा मनपा आयुक्तांकडे तकादा

# पाण्याची चिंता : वॉर्डात सुरळीत पाणीपुरवठा करा

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**




नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांनी आमच्या वॉर्डात सुरळीत आणि वेळेवर पाणी पुरवठा करा अशी मागणी मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांच्याकडे केली आहे. दरम्यान, नवीन जलवाहीनी टाकल्यानंतर त्या भागात चाचणी झाली असून त्या भागात पाणी पुरवठा करावा असा तकादा नगरसेवकांनी लावला आहे. परंतु, जोपर्यंत शहराला २०० एमएलडी (दशलक्ष लिटर रोज) रोज पाणी मिळेपर्यंत नो-नेटवर्क भागाला पाणीपुरवठा होणार नाही. तसचे मनपा कुणाच्या दबावाला बळी पडणार नाही असे मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले आहे.

महानगरपालिका निवडणूक पार पडल्यानंतर ११५ नगरसेवक निवडून आले आहेत. गुरुवार, २२ जानेवारी रोजी महापौर पदाची आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर येत्या ३१ जानेवारीपूर्वी मनपातील प्रशासक राज संपुष्ठात येणार आहे. महानगरपालिकेच्या सभागृहातील माइक, स्पीकर, टीव्ही स्क्रीनची चाचणी घेण्यासाठी मनपा आयुक्त श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या वेळी अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यासह सर्व अधिकारी उपस्थित होते. मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता किरण धांडे यांना शहरातील पाणी स्थितीबाबत विचारणा केली. धांडे यांनी २ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे सांगितले.

दरम्यान, शहरातील विविध वसाहतींना २९ जलकुभांवरून पाणीपुरवठा होता. त्या ठिकाणी काम करणाऱ्या ऑपरेटर, कनिष्ठ अभियंता, उपअभियंत्यांचे मोबाइल नंबर सर्व नगरसेवकांना द्यावेत, नगरसेवकांनी फोन केल्यास त्यांच्या समस्या शांतपणे ऐकून घ्याव्यात, तक्रारी वरिष्ठांकडे येऊ देऊ नयेत, अशा सूचनाही मनपा प्रशासकांनी दिल्या. पाणीपुरवठा योजनांची माहिती नगरसेवकांना द्यावी. सध्या मिळणारे पाणी, जलकुंभ, अडचणी, नवीन योजना याबाबत पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण करावे, असेही त्यांनी सांगितले.

### ११०० किलोमीटर काम पूर्ण

■ सातारा, देवळाई, हर्सूल, माईसाहेबनगर, छत्रपतीनगर, जटवाडा परिसरातील वसाहती, एकतानगरचा काही भाग, नारेगाव वसाहत, भीमनगर, भावसिंगपुऱ्यातील पेठेनगर, लालमाती, निसर्ग कॉलनी, चिकलठाण्यातील वसाहती आदी भागांत महापालिकेने जलवाहिनीचे काम केले आहे. शहरात पाणीपुरवठा योजनेसाठी पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. १ हजार ९०० किलोमीटर पाइपलाइनपैकी ११०० किलोमीटरपेक्षा जास्त काम पूर्ण झाले. यासाठी अनेक रस्ते फोडण्यात आले. महापालिकेची परवानगी घेऊनच रस्ते फोडले जातात. पाणी योजनेसाठी फोडलेल्या रस्त्यांचे काम निविदेनुसार केले जाते. मात्र, अनेक ठिकाणी सबकॉन्ट्रॅक्टरला काम देऊन त्यांच्याकडून ते करून घेतले जात आहे. त्यामुळे रस्ते पूर्ववत करण्यास वेळ लागतो. फोडलेल्या रस्त्यांमुळे नागरिक त्रस्त आहेत.

### ब्रेकर वापरणाऱ्यास दंड लावा

■ जलवाहिनीचे पाईप टाकण्यासाठी रस्ते फोडताना काही जण ब्रेकर वापरतात. त्यामुळे संपूर्ण रस्ता खराब होतो. यावर मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांनी ब्रेकर वापरण्यास बंदी घालण्याचे आदेश दिले. ब्रेकर वापरल्यास जबर दंड लावा. कटर मशीन नसलेल्या कंत्राटदाराला काम देऊ नका, असेही त्यांनी आपल्या आदेशात स्पष्ट केले.

## एसटी बसची दुचाकीला धडक; चालक गंभीर जखमी

### करमाड शिवारात भीषण अपघात




**करमाड / प्रतिनिधी**

जालना - छत्रपती संभाजीनगर करमाड शिवारातील शिव पेट्रोलियम पंपासमोर भरधाव एसटी बसने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने दुचाकी चालक गंभीर जखमी झाला. हा अपघात बुधवार, २१ जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास घडला. कारभारी शेख बाबाभाई शेख (५० वर्ष), रा. रोशनगाव, ता. बदनापूर, जि. जालना असे जखमीचे नाव आहे

अकोला ते छत्रपती संभाजीनगर ही एसटी बस क्रमांक (एमएच-१४-एलएक्स-८८३१) जालन्याहून छत्रपती संभाजीनगरकडे येत होती. करमाड शिवारातील शिव पेट्रोल पंपाजवळ दुचाकी क्रमांक (एमएच-२१-एजी-३७०७) चालकाने अचानक दुभाजकातून वळण घेत असताना पाठीमागून येणाऱ्या बसने जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात दुचाकीचालक कारभारी शेख उंच उडून रस्त्यावर फेकले गेले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून दुचाकीचा चक्काचूर झाला. धडकेनंतर बस दुभाजकावर जाऊन मधोमध अडकली होती, त्यामुळे काही काळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच सोनू उकर्डे यांनी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज ॲम्ब्युलन्सला कळविले. ॲम्ब्युलन्स चालक बाळू कातखडे यांनी जखमीला तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले.

## सोयगाव तीन जि.प. गट, सहा पं.स. गणासाठी ६५ अर्ज

### उमेदवारी अर्जांची आज होणार छाननी

**सोयगाव / प्रतिनिधी**

तालुक्यातील जिल्हा परिषदचे तीन गट व पंचायत समितीच्या सहा गणांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी बुधवार, २१ जानेवारी रोजी एकूण ६५ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले. ६५ उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जांची छानना गुरुवार, २२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या निवडणुकीत तालुक्यातील ८५ हजारांहून अधिक महिला-पुरुष मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्वात छोटा तालुका असलेल्या सोयगावमध्ये जिल्हा परिषदेचे आमखेडा, गोंदेगाव व फर्दापुर असे तीन गट आहेत. तर पंचायत समितीचे निबायती, आमखेडा, बनोटी, गोंदेगाव, फर्दापुर व सावळदबारा हे सहा गण आहेत. विविध राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांनी बुधवारी दिवसभरात मोठ्या प्रमाणावर उमेदवारी अर्ज दाखल केले. जिल्हा परिषदेच्या आमखेडा गटासाठी पुष्पाबाई काळे, मोनाली पवार (राठोड), उर्मिला इगळे, फर्दापूर गटासाठी सपना राठोड, प्रभावती राठोड, मोहिन इद्रीस मुलतानी, नोसीन सलीमखाँ मुलतानी, सीमा चव्हाण, देवकाबाई राठोड, उमा चव्हाण. गोंदेगाव गटासाठी पूजा वाघ, सुनिता चव्हाण, शमीना तडवी, सविता बागुल, मनीषा गायकवाड, संगीता नवाळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

पंचायत समितीच्या आमखेडा गणासाठी जयश्री पवार, मंगला निकम, सुरेखा तायडे, सविता मोरे, सुशिला इगळे, निबायती गणासाठी दशरथ झरवार, बंद्री राठोड, सविता गव्हाडे, छायाबाई पाटील, हरिभाऊ पाटील, नाना साबळे, संगीता पाटील, ज्योती गव्हाडे, सावळदबारा गणासाठी प्रदीप गबरु चव्हाण, राधेश्याम जाधव, दारासिंग राठोड, सुनील माकोडे, गणेश राठोड, आनंद जाधव, जयप्रकाश चव्हाण, विलास दरबार राठोड. फर्दापूर गणासाठी शेख मुन्सी, उत्तम चव्हाण, मकसुद मुलतानी, राहुल राठोड, प्रमोद खोडपे, भारती काकराज. गोंदेगाव गणासाठी गयाबाई घोडे, सुनिता गावडे, मीरा साबळे, मनीषा गायकवाड, रेणुका मवाळे. बनोटी गणासाठी काजल पाटील, रजना पाटील, वैभवी पाटील, नसरिम शेख, स्वाती बोरसे, कल्पना बोरसे, कल्पना जाधव. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रुपेश शिनगारे, सहाय्यक निवडणूक अधिकारी मनीषा मेणे-जोगदंड हे कामकाज बघत आहेत.

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या बुध्दिमत्तेला दिशा देण्याची गरज : सुमित कोल्हे

### संजीवनी ज्युनिअर महाविद्यालयात टॅलेंट सर्च स्पर्धा उत्साहात

**वैजापूर / प्रतिनिधी**




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये बुध्दिमत्ता असतेच, मात्र त्यांच्या बुध्दिमत्तेचे प्रगटीकरण करण्यासाठी स्पर्धेच्या माध्यमातुन व्यासपीठ निर्माण करून दिशा देण्याची गरज असते असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी केले. संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट संचलित वैजापूर येथील संजीवनी ज्युनिअर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय टॅलेंट सर्च स्पर्धेच्या बक्षिस वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

वैजापूर तालुक्यातील संजीवनी ज्युनिअर महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर संजीवनी अकॅडमीच्या संचालिका निकिता कोल्हे, नॉन अकॅडमिक डायरेक्टर डी. एन. सांगळे, संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचे परीक्षा विभागाचे डीन डॉ. ए.बी. पवार, संजीवनी युनिर्व्हसिटीच्या कॉमर्स विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. कविता दिवे, प्राचार्य प्रा. विनोद शेटे उपस्थित होते. इयत्ता १० वीच्या विज्ञान, गणित व इंग्रजी विषयांवर आधारीत या स्पर्धेत सुमारे २२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सुमित कोल्हे पुढे म्हणाले की, संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनीने समृध्द अशी शैक्षणिक परंपरा जपली आहे.

माजी विद्यार्थ्यांच्या मजबुत नेटवर्कमुळे सध्याच्या विद्यार्थ्यांना मेंटॉरशिप, उद्योग संपर्क, व जागतिक करिअरच्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. पवार, डॉ. दिवे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दरम्यान, संजीवनी ज्युनिअर टॅलेंट सर्च स्पर्धेत कै. भरत पाटील स्कूल चांडगावच्या भक्ती प्रदीप गायकवाड हीने प्रथम क्रमांक पटकाविला. तर याच शाळेतील राखी पवन गायकवाड ही दुसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली. सेंट मोनिका इंटरनॅशनल स्कूलच्या शिवप्रसाद गोकुळ निकम याने तिसरा क्रमांक मिळविला.

## वैजापुरात विविध राजकीय पक्षांना बंडखोरीची लागन

**वैजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आठ गट व पंचायत समितीच्या सोळा गणासाठी पाच फेब्रुवारीला होत असलेल्या सार्वत्रिक निवडणूकसाठी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटच्या दिवशी बुधवार, २१ जानेवारी रोजी इच्छुकांनी येथील पंचायत समिती कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या नाम निर्देशन कक्षात मोठी गर्दी केली होती. त्यामुळे शेवटच्या दिवशी गट ब गणांत मिळून तब्बल दिडशे जणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. परिणामी, उमेदवारी अर्जाची संख्या २४१ वर पोहचली आहे.

भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांच्यात युती झाली असून भाजपच्या वाट्याला शिऊर, महालगाव व वाकला हे जिल्हा परिषद गट असून उर्वरित पाच गट शिवसेनेच्या वाट्याला आले असल्याचे समोर आले आहे. मात्र ही युती मान्य नसल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत विरोध दर्शवाला. या पार्श्वभूमीवर, भाजप व शिवसेनेपुढे बंडखोरांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. नाराज झालेल्या इच्छुकांनी पक्षाने तिकीट नाकारल्याने व युतीमध्ये जागा न सुटल्याने दुसऱ्या पक्षाची वाट धरली आहे किंवा अपक्ष अर्ज भरला आहे. तर दुसरीकडे कॉंग्रेस, वंचित बहुजन आघाडी व शिवसेना (उबाठा) यांच्यात आघाडी झाल्याचे बोलले जात असले तरी नाराज कार्यकर्त्यांची काय भूमीका असणार आहे हे पाहणेही औत्सुक्याचे ठरणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी संवंदगाव गटातून माजी जिल्हा परिषद सदस्य दिवंगत नंदकुमार शिंदे यांच्या पत्नी पद्मावती शिंदे यांनी शिवसेना (उबाठा) पक्षाकडून अर्ज भरला. तर या गटातील जरूळ गणातून मनोज नळे यांनी उमेदवारी अर्ज भरला. याशिवाय संजय निकम, मनाजी मिसाळ, प्रशांत सदाफळ, सचिन वाणी, मनोज गायके, कल्याण दांगोडे, नबी पटेल, दिनकर पवार, एल. एम. पवार, रामहरी जाधव, पार्वती जाधव, संजय निकम, सुनील पैठणपगारे, वर्षा नंदकिशोर जाधव, संगिता सुभाष तांबे, कल्पना डिके, डॉ. कल्याणी मिसाळ, सिनाबाई मिसाळ, लहानुबाई डिके, श्रीराम गायकवाड, प्रशांत सदाफळ, सचिन वाणी, संकेत वाणी, बाबासाहेब जगताप, पंकज ठोंबरे, प्रभाकर बारसे, बाबासाहेब थेटे, प्रकाश शेळके, प्रताप निंबाळकर, अविनाश गलांडे यांच्यासह अनेकांनी अर्ज भरले आहेत.

## महापौर आरक्षण : ‘एसटी प्रवर्ग‘ निघाल्यास भाजप, शिंदेसेनेची होणार कोंडी

### शिवसेना (उबाठा), एमआयएमकडे एसटी प्रवर्गातील नगरसेवक

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत गुरुवार, २२ जानेवारी रोजी मुंबईत नगरविकास विभागात काढण्यात येणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरात भाजप-शिवसेनेतील (शिंदेगट) इच्छुक उमेदवारांच्या हृदयाचे ठोके वाढले आहेत. महापौरपदाचे आरक्षण एसटी प्रवर्गाला गेले तर काय करावे, अशी चिंता त्यांना आहे. या दोन्ही पक्षांकडे एसटी प्रवर्गातील उमेदवार नाही. बहुमत असूनही या दोन पक्षांना महापौरपदावर पाणी सोडावे लागणार आहे.

आरक्षण निघण्यापूर्वीच भाजपचे पदाधिकारी ओबीसी पुरुष, एससी प्रवर्गातील महिलेची वर्णी लागेल असे सांगत आहेत.भाजपला मनपा निवडणुकीत ५७ जागी यश मिळाले. शिंदेसेनेचे १३ उमेदवार निवडून आले. भाजपला बहुमतासाठी केवळ एका मताची गरज आहे. निवडणुकीत भाजप-शिंदेसेना या दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. सत्ता स्थापन करताना युती होण्याची दाट शक्यता आहे. गुरुवारी मुंबईत नगरविकास विभागाच्या राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सोडतीमध्ये छत्रपती संभाजीनगरचे महापौरपद एसटी (पुरुष-महिला) प्रवर्गासाठी राखीव ठरले, तर भाजप व शिंदेसेनेची कोंडी होईल. शिवसेना (उबाठा) पक्षाकडून प्रभाग क्रमांक ४ मध्ये अब्दुल रशीद खान ऊर्फ मामू एसटी प्रवर्गातून निवडून आले आहेत. महापौरपदाचे आरक्षण एसटी महिला प्रवर्गासाठी निघाल्यास या पदावर एमआयएमच्या तिकिटावर निवडून आलेल्या विजयश्री जाधव यांना महापौर पदाची संधी मिळू शकते.

### राजकीय पक्षांना गटाची नोंदणी करावी लागणार

**छत्रपती संभाजीनगर :** महापालिका निवडणुकीत विविध राजकीय पक्षांचे नगरसेवक निवडून आले. या पक्षांना आपल्या गटाची नोंदणी विभागीय आयुक्तांकडे करावी लागते. यासंदर्भात मंगळवार, २० जानेवारी रोजी विभागीय आयुक्तांनी पत्राद्वारे सर्व महापालिका आयुक्तांना सूचित केले की, राजकीय पक्षांनी गटनेता निवडीची नोंदणी करावी. यामध्ये गटनेता नोंदणीचे शिफारसपत्र, गटाची बैठक आयोजित केली, त्याचे पत्र सदस्यांना दिल्याबाबतची पोहोच, गटनेता निवडीबाबत केलेला ठराव, गटाचे नियम, घटनेची प्रत इत्यादी कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मनपातील ११५ सदस्य निवडून आल्यानंतर त्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.

## शेतकऱ्यांची चिंता पुन्हा वाढली

# ढगाळ वातावरण : रब्बी पिकांवर कीड, रोगांचा धोका

**दत्तात्रय काटोळे**

**सोयगाव :** मागील दोन ते तीन दिवसांपासून सोयगाव तालुका व परिसरात ढगाळ वातावरण कायम असून, त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव होण्याची व आंब्याचा मोहोर गळून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंब्याला मोहर चांगल्या प्रकारे लागले असून आंब्याचे उत्पन्न वाढणार आहे. शक्यता वाढली आहे. या बदलत्या हवामानामुळे शेतकरी वर्गात पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोयगाव तालुक्यात पहाटेपासून सकाळी नऊ वाजेपर्यंत दाट धुके व थंडी जाणवत असून, त्यानंतर दिवसभर ढगाळ वातावरण राहत आहे. परिणामी सूर्यप्रकाश जमिनीपर्यंत पोहोचत नसल्याने पिकांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. अचानक झालेल्या या हवामान बदलामुळे रब्बी पिकांवर संकट ओढवले असून बळीराजा पुन्हा अडचणीत सापडला आहे. सोयगाव तालुक्यात शेतकऱ्यांकडून मका, गहू, हरभरा, ज्वारी यासह भाजीपाला पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. सध्या शेतात लहान गहू, हरभरा, मका, भेंडी, गवार आदी पिके जोमात असतानाच ढगाळ वातावरणामुळे



त्यांच्यावर रोगांचा धोका वाढला आहे. ढगाळ हवामानामुळे दिवसाचे तापमान लक्षणीयरीत्या घटले असून थंडीची तीव्रता वाढली आहे. दिवसा ऊन न पडल्याने शेतात ओलावा साचून राहतो. हा ओलावा काही प्रमाणात फायदेशीर असला तरी दीर्घकाळ टिकून राहिल्यास बुरशीजन्य रोग पसरण्याची शक्यता अधिक असते. सोयगाव तालुक्यातील शेतकरी चिंतेने आभाळाकडे डोळे लावून बसला असून हवामान लवकर स्वच्छ व्हावे, अशी प्रार्थना करत आहे. अन्यथा रब्बी हंगामातील पिकांचे गणित पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### ढगाळ वातावरण पिकांसाठी घातक

■ दीर्घकाळ ढगाळ वातावरण व हवेमधील आद्रता कायम राहिल्यास तुडतुडे, मावा यांसारख्या शोषक किडींचा तसेच बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढू शकतो. विशेषतः हरभरा व भाजीपाला पिकांसाठी हे वातावरण अत्यंत घातक असल्याचे कृषी अधिकारी कासार यांनी सांगितले. तसेच सूर्यप्रकाशाअभावी प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया मंदावते व त्यामुळे पिकांची अपेक्षित वाढ होत नाही. याच काळात अवकाळी पाऊस झाल्यास नुकसान आणखी वाढू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### जळगाव रोडवर वाहतुकीचा खोळंबा

**छत्रपती संभाजीनगर:** सिडको एन-५ मधून जळगाव रोडच्या दिशेने वाहन चालविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्याचे बांधकाम सुरू असल्याने वन वे रस्ता केला आहे. त्यामुळे अनेकदा वाहतूककोंडी होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. येथे वाहतूक पोलिसांची नियुक्ती असावी. औद्योगिक क्षेत्रातून नागरिकांच आवक जावक सुरू असते. शिस्तीकरिता पोलिसाची मागणी नागरिकांनी केली.

दर रविवारी मोफत तपासणी
नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.
डॉ.ए.एच.शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बस स्टॅण्डसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)
9021111549 / 7020614645
www.drshaikhah.com

## न्यूज ब्रीफ

### जि. प. शाळेत बाल आनंद मेळावा

**गंगापूर :** तालुक्यातील जामगाव येथील जि.प. केंद्रीय उच्च प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा, माता पालकांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम नुकताच पार पडला. विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानाला प्रोत्साहन मिळावे, तसेच माता पालकांशी विद्यार्थी गुणवत्ताबाबत संवाद साधला जावा, या हेतूने हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन महिला शिक्षिकांनी केले होते. आनंद नगरीमध्ये २० हजारांची उलाढाल झाली. मुख्याध्यापक प्रसाद शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पदवीधर शिक्षक कडुबा हारदे, गीता भारती-गवळी, ज्योती दाते, प्राजक्ता तांबे, भापकर, गायकवाड, गाजुलवार आदींनी परिश्रम घेतले.

### विहिरीत मृतदेह आढळला

**वैजापूर :** विहिरीत एका ५५ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळल्याची खळबळजनक घटना सोमवार, १९ जानेवारी रोजी सकाळी सव्वासात वाजता नागपूर-मुंबई महामार्गावर वैजापूर शिवारात उघडकीस आली. सुरेश रखमाजी इंगळे (रा. वैजापूर) असे मयताचे नाव आहे. स्थानिक शेतकरी विहिरीजवळ गेले असता, ही घटना उघडकीस आली. वैजापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह बाहेर काढून वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केला. या प्रकरणी मंगळवार, २० जानेवारी रोजी वैजापूर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### बाप-लेकावर प्राणघातक हल्ला

**परभणी :** गंगाखेड तालुक्यातील सावंगी (भु) येथील रहिवासी बाप-लेकावर रविवार, १८ जानेवारी रोजी गावातील चार जणांनी पूर्ववैमनस्यातून चाकू व तलवारीने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. सावंगी (भु.) येथील बालासाहेब साबणे व गोविंद साबणे रविवारी सायंकाळी सातच्या दरम्यान कुटुंबासोबत घराच्या अंगणात बसले होते. गावातील प्रणीत भागवत मस्के, भागवत रंगनाथ मस्के, प्रीतम भागवत मस्के, बालाजी बाबूराव मस्के हे चाकू व तलवार घेऊन आले. अचानक त्यांनी डोक्यात तलवार व चाकूने जबर मारहाण केली. उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी परभणी सामान्य रुग्णालयात हलविले.

### निधन वार्ता

#### मच्छिंद्र उगले



**वैजापूर :** तहसिल कार्यालयातील सेवानिवृत्त अव्वल कारकून मच्छिंद्र सुर्यभान उगले (६७ वर्ष), रा. दहेगाव, ता. वैजापूर यांचे मंगळवार, २० जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली असा परिवार आहे.

---

**गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती**

# 'हिंद दी चादर' कार्यक्रमाची नांदेडमध्ये जय्यत तयारी : विभागीय आयुक्त पापळकर

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी



श्री गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त हिंद दी चादर हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सात राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिली

शीख धर्मीयांचे नववे गुरु श्री गुरू तेगबहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमासाठी शहरातील मोदी मैदानावर भव्य मंडप उभारणीचे काम सुरू आहे. शनिवार, २४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता अरदास गुरमति समागम कथा, कीर्तन दरबार, रात्री अकरा वाजता समागम समाप्तीची अरदास केली जाणार आहे. हिंद दी चादर सोहळ्यासाठी नांदेडातील मोदी मैदानावर मंडप उभारण्याचे काम सध्या सुरू आहे. या सोहळ्याला देश विदेशांतील भाविक उपस्थित राहणार आहेत. रविवार, २५ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता अरदास गुरमति समागम कथा, कीर्तन दरबार होणार आहे. कार्यक्रमाची प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली असून, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, हरियाणाचे नायबसिंग सेनी, पंजाबचे भगवंत मान, राजस्थानचे भजनलाल शर्मा, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन कल्याण, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांची उपस्थिती राहणार आहे.



### दहा लाख भाविक येणार

देश-विदेशातून या सोहळ्यासाठी तब्बल दहा लाख भाविक नांदेडात येण्याचा अंदाज असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले. त्यांच्यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. आठ ठिकाणी अखंडपणे लंगर सेवा चालणार आहे. त्याप्रमाणे आरोग्य शिबिरेही असणार आहेत. शासकीय योजनांची माहिती देणारे वेगवेगळे स्टॉल्सही या ठिकाणी असणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## एमआयटीमध्ये आजपासून राष्ट्रीय पातळीवरील जल अधिवेशन

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

पाणीप्रश्नावर वर्षानुवर्षे काम करणाऱ्या भारतीय जल कार्य संघटनेच्या मुंबई केंद्रातर्फे २२ ते २४ जानेवारी दरम्यान तीन दिवस ५८ वे वार्षिक जल अधिवेशन बीडबायपासवरील एमआयटी संस्थेच्या मंथन सभागृहात होणार असल्याची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी मंगळवार, २० जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयटी महाविद्यालयात होणाऱ्या या तीन दिवसीय जल अधिवेशनाला देशभरातील जलसंपदा, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, शाश्वत विकास व जलसंवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी, अभियंते, संशोधक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे मनीषा पलांडे यांनी सांगितले. अधिवेशनाचे उद्घाटन गुरुवारी सकाळी १० वाजता राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पालकमंत्री संजय शिरसाठ, राज्याचे इमाव कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आदींची उपस्थिती राहणार आहे. अधिवेशनाचे अध्यक्षपद पहिल्यांदाच महिला म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे भूषविणार आहेत. या पत्रकार परिषदेस एमआयटी संस्थेचे महासंचालक मुनीश शर्मा, संचालक डॉ. नीलेश पाटील, प्रमोद दळवी, स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. प्रशांत अवसरमल उपस्थित होते.

### हनुमंतगाव येथे शुक्रवारपासून सप्ताह

**गंगापूर :** हनुमंतगाव येथे शुक्रवार, २३ जानेवारी पासून त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होणार आहे. शुक्रवारी सकाळी ८ वाजता दत्त मूर्तीस मंगल स्नान व १० वाजता ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. यावेळी हभप. पुंडलिक महाराजांचे प्रवचन होणार असून रात्री ७ वाजता हभप. महंत बाबाजी महाराज यांचे कीर्तन होणार आहे. २४ डिसेंबर रोजी सायं ६ वाजता ॲड. नानासाहेब झिंजुर्डे पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. ७ वाजता स्वामी अभयानंदगिरी महाराजांचे कीर्तन होणार आहे. २५ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हभप. नंदू महाराज फांदाडे यांच्या काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने सांगता होणार आहे.

## नाटक कलावंताचा श्वास अन् ध्यास हवा : शंभु विश्वासू

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी



नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज अशी अनेक माध्यमे कलावंतासाठी उपलब्ध आहेत. मात्र ख-या कलावंताला कला जिवंत राहण्यासाठी नाटकाचा श्वास आणि ध्यास असला पाहिजे, असे प्रतिपादन रंगकर्मी शंभु विश्वासु यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कला सादरीकरण विभाग (डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्ट) ५० व्या एकांकिका महोत्सवाचे उद्घाटन महानगरपालिका सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू यांच्या हस्ते सोमवार, १९ जानेवारी रोजी करण्यात आले.एकांकिका महोत्सव विभागाच्या प्रांगणात म्हणजेच डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स, येथे संपन्न होत आहे. या महोत्सवात एकूण सात एकांकिकांचे सादरीकरण होईल. पहिल्या दिवशी बुजगावण ही लेखक गोपाळ वाघमारे लिखित एकांकिका महोत्सवाचा शुभारंभ म्हणून सादर झाला.यात प्रामुख्याने घर दोघांचं, ठंडा गोष्ट, प्लानचॅट, वाकड आणि प्रेम की यातना या एकांकिका प्रस्तुत होणार आहेत. डॉ. वैशाली बोदेले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

### अश्लील फोटो पाठवला; विनयभंगाचा गुन्हा दाखल

**वाळूज महानगर :** रांजणगाव शेणपुंजी येथील एका महिलेच्या मोबाईलवर अश्लील फोटो पाठवून विनयभंग केल्याची घटना रविवार, १८ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी आरोपीविरोधात एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी दहा रात्री वाजेच्या सुमारास दत्तनगर येथील हिरामण शेळके याने पीडित महिलेच्या मोबाईलवर अश्लील फोटो पाठवले. तसेच पीडितेची सहमती नसताना वारंवार मेसेज करून मोबाईलद्वारे सतत पिच्छा पुरवल्याचा आरोप पोलिसात दिलेल्या तक्रारीत करण्यात आला आहे.

## कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारी दोन वाहने पकडली

**साडे सात लाखांचा मुद्देमाल हस्तगत**

वैजापूर / प्रतिनिधी

कत्तलीसाठी गोवंश जनवरांना निर्दयीपणे वाहनामध्ये कोंबून घेऊन जाणाऱ्या दोन जणांविरुद्ध शिऊर पोलिसांनी मंगळवार, २० जानेवारी रोजी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी जनावरांची वाहतूक करणारी दोन वाहने, नऊ गायी, दोन बैल असा एकूण ७ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोन जणांविरुध्द शिवूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजहर जावेद कुरेशी (१९ वर्ष) व मोबीन खालिक कुरेशी (२८ वर्ष), दोघे रा. संजयनगर, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर अशी आरोपींची नावे आहेत. मंगळवारी पहाटे चार वाजेच्या सुमारास नांदगाव ते छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर करण्यात आलेल्या या कारवाईत तीन लाख रुपये किंमतीची एक पिक अप गाडी क्रमांक (एमएच-१५-ईजी-११६६), अडीच लाख रुपये किंमतीची टाटा इन्ट्रा गाडी क्रमांक (एमएच-१५-एचएच-२२८४) या दोन वाहनासह नऊ गायी व दोन बैल असा सात लाख ५५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार शिवशंकर नरोडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिऊर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस अंमलदार विजय भिल्ल हे करत आहेत.

## नॅशनल ज्युनिअर महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



लासूर स्टेशन / प्रतिनिधी

गंगापूर तालुक्यातील रांजणगाव पोळ येथील नॅशनल विद्यामंदिर ज्युनिअर महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन सोमवार, १९ जानेवारी रोजी उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांना जागेवरच ठेका धरायला लावला.

नॅशनल विद्यामंदिर ज्युनिअर महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन सोमवारी सायंकाळी उत्साहात पार पडले. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष दत्ता पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सपरंच सुनिता शेलार, विलास प्रधान, सुनिता पवार, महिला पोलिस अंमलदार जाकीया शेख, शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब कराळे, प्रिती सिरसाठ, निकीता म्हस्के, प्रदीप पठारे, प्रविण कुऱ्हाडे, सचिन जाधव, प्रितेश कुकलारे, मेराज खान, समाधान गुंजाळ, सुवर्णा बोडखे, सुरेखा पवार, प्रतीक्षा गोंताडे आदींची उपस्थिती होती. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर, भक्तीगीतांवर विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## फुलंब्री न्यायालयात 'बालविवाह मुक्त भारत' जनजागृती

खामगांव / प्रतिनिधी



बालविवाह ही समाजाला लागलेली गंभीर कीड असून ती समूळ नष्ट करण्यासाठी प्रत्येक घटकाने सजग राहणे गरजेचे आहे, असा ठाम संदेश फुलंब्री दिवाणी व फौजदारी न्यायालयातून देण्यात आला. केंद्र शासनाच्या 'बालविवाह मुक्त भारत अभियान२०२५' अंतर्गत १०० दिवसांच्या विशेष मोहिमेचा भाग म्हणून तालुका विधी सेवा समिती, पंचायत समिती फुलंब्री आणि गोरक्ष विद्यालय खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २० जानेवारी रोजी फुलंब्री न्यायालयात जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख दिवाणी न्यायाधीश डॉ. आर. एस. कुळकर्णी होते. यावेळी सह दिवाणी न्यायाधीश चंद्रकांत पाटील, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. समाधान जंगले, सचिव ॲड. सुभाष बोडखे, सरकारी वकील ॲड. सुधाकर रामेकर, पोलीस निरीक्षक संजय सहाने, सहायक गट विकास अधिकारी गायकवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्ना भाले, गोरक्ष विद्यालयाचे शिक्षक अजय देशमुख, डॉ. श्रुती भोजराज, आकाश लोंढे, नरसिंग डावरे, रोहित धोत्रे यांच्यासह गोरक्ष आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, खामगाव येथील शिक्षकांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला. दिवाणी न्यायाधीश डॉ. आर. एस. कुळकर्णी यांनी बालविवाहाचे कायदेशीर परिणाम, दंडात्मक तरतुदी, पालक व समाजाची जबाबदारी यावर माहिती दिली. बालविवाह रोखणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शाहबाज शेख यांनी केले, तर ॲड. राहुल गंगावणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी तालुका वकील संघाचे सदस्य ॲड. असिफ पटेल, ॲड. बाळासाहेब जाधव, ॲड. अमोल ढेपले, ॲड. एल. डी. पागुरे, ॲड. शैलेश आरक, ॲड. प्रकाश थोरात, न्यायालयीन कर्मचारी मुंढे मॅडम, संदीप साळुंके, ज्ञानेश्वर पारखे उपस्थित होते.

## राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धेत ज्ञानेश्वर झगरे यांची कथा अव्वल



टेंभुर्णी / प्रतिनिधी

गडचिरोली येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय अधिकारी, कर्मचारी कथाकथन स्पर्धेत नळविहिरा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक ज्ञानेश्वर झगरे यांचया कथेची पहिल्या १० कथांमध्ये निवड करण्यात आली.

मराठवाडा विभागीय स्पर्धेतून प्रथम पाच कथा राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवडण्यात आल्या होत्या. यामध्ये झगरे यांची कथा आईचे प्रेम ही कथा पात्र झाली होती. राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झालेल्या मराठवाडा विभागातील स्पर्धकातून झगरे यांची एकमेव कथा राज्यातील निवड झालेल्या १० कथापैकी एक आहे. झगरे यांच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सतीश शिंदे, विस्तार अधिकारी जिनेंद्र काळे, रामकुमार खराडे, सुधाकर चिंधोटे, नारायण पिंपळे, मुख्याध्यापक शिवहरी नागरे, दत्तू मुनेमाणिक, सुनिल अंभोरे, काशिनाथ उखर्डे, विनोद कळंबे, दिपक चव्हाण, ज्ञानेश्वर झगरे, मंजुषा बकतकार, पूजा गहेरवाल आदींनी कौतुक केले.

## भटक्या-विमुक्तांची सांकेतिक भाषा हा मराठी भाषेचा दुर्लक्षित ठेवा : डॉ. ललिता गोपाळ

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी



भटक्या विमुक्त समाजाची सांकेतिक भाषा हा मराठी भाषेचा दुर्लक्षित असा मौलिक ठेवा असल्याचे प्रतिपादन प्रा. ललिता गोपाळ यांनी येथे केले. महाराष्ट्र शासनाचा मराठी विभाग, भाषा संचालनालय आणि विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त बोलींचा जागर कार्यक्रमात प्रमुख व्याख्यात्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. समाधान इंगळे होते. यावेळी लोकवाङ्मयाचे अभ्यासात डॉ. शेषराव पठाडे यांची उपस्थिती होती.

या विशेष उपक्रमात गोपाळ समाजाच्या सांकेतिक भाषेवर सखोल, अभ्यासपूर्ण आणि विचारप्रवर्तक चर्चा करण्यात आली. डॉ. ललिता गोपाळ यांनी गोपाळ समाजाच्या सांकेतिक भाषेचा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून सविस्तर आढावा घेतला. पुढे गोपाळ म्हणाल्या की, बोली म्हणजे उपभाषा नव्हे, तर समाजाच्या अस्तित्वाची साक्ष असते. गोपाळ समाज हा परंपरागत भटक्या-विमुक्त समाजाच्या प्रवाहातील एक महत्त्वाचा घटक असून, सामाजिक असुरक्षितता, स्थलांतर आणि उपेक्षा यांमधून त्यांच्या सांकेतिक भाषांचा विकास झाला आहे. सांकेतिक भाषा ही संशयास्पद किंवा गुन्हेगारी स्वरूपाची नसून, ती समाजाच्या आत्मरक्षणाची आणि अंतर्गत संवादाची प्रभावी यंत्रणा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय डुंबरे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धनाचा खरा अर्थ केवळ प्रमाणभाषेचा आग्रह नसून, सर्व बोलींना मान्यता देणे होय, असे मत प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे यांनी यावेळी व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती विकसित होते आणि मराठी भाषेची समावेशक परंपरा अधिक दृढ होते, असे ते म्हणाले.

**उमेदवारांसह पक्षाची आता अस्तित्वाची लढाई**

# राजकीय पक्षात फाटाफूट : निवडणुकीत उमेदवार वाढले

परभणी / प्रतिनिधी



नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीने परभणी तालुक्यातील राजकारणाला नव्याने कलाटणी दिली आहे. भाजप, शिवसेना (उबाठा), शिंदेसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी (अजित पवार), राष्ट्रवादी (शरद पवार), यशवंत सेना यांसह अनेक पक्ष निवडणूक रिंगणात उतरले असून, प्रत्येक पक्षाकडे उमेदवारांची उदंड संख्या पाहायला मिळत आहे. परिणामी, ही निवडणूक बहुमतासाठी नव्हे, तर राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठीची लढाई ठरणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तब्बल नऊ वर्षानंतर होत असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमुळे मतदारांमध्ये उत्सुकता वाढली असून, सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. आजवर परभणी तालुक्यावर शिवसेनेचे वर्चस्व राहिले असून, त्यानंतर काँग्रेसनेही आपले बळ दाखवले होते. मात्र, २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी व भाजप या दोन्ही प्रमुख पक्षांना अपेक्षित यश मिळाले नव्हते. दरम्यान, २०२२ मध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादीत झालेल्या फुटीमुळे तालुक्यातील राजकीय गणिते पूर्णतः बदलली आहेत. भाजप व राष्ट्रवादी (अजित पवार) यांचे वजन वाढले असून, काँग्रेसलाही अंतर्गत फूट व नेतृत्व बदलामुळे मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. यंदाची निवडणूक मागील निवडणुकांपेक्षा पूर्णपणे वेगळी आणि अनिश्चित निकालाची ठरण्याची शक्यता आहे. युती व आघाड्यांऐवजी यंदा स्वतंत्रपणे लढणारे पक्ष आणि अपक्ष उमेदवारांची संख्या वाढल्याने मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन होणार आहे. त्यामुळे बहुमत मिळवण्यापेक्षा आपल्या पक्षाचे अस्तित्व, ताकद आणि प्रभाव इतर पक्षांपेक्षा कसा वाढवता येईल, याकडेच प्रमुख नेत्यांचे लक्ष केंद्रित झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत पोखर्णी गटातून काँग्रेसकडून निवडून आलेले अनेक जण भाजपमध्ये गेले आहेत. यंदा ते भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढत आहेत. परिणामी, काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटातील बहुसंख्य पदाधिकाऱ्यांनी राजीनामे देत शिवसेना (उबाठा) पक्षाची वाट धरल्याने जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अस्तित्व संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### यंदाची निवडणूक राजकीयदृष्ट्या निर्णायक ठरणार

या पार्श्वभूमीवर काँग्रेसला नव्या चेहऱ्यांवर विश्वास ठेवत मतदारांचा पाठिंबा मिळवावा लागणार असून, राष्ट्रवादी (शरद पवार) साठी ही निवडणूक अस्तित्वाची खरी कसोटी ठरणार आहे. बदलत्या राजकीय समीकरणांमुळे परभणी जिल्हा परिषद निवडणूक यंदा अत्यंत चुरशीची आणि राजकीयदृष्ट्या निर्णायक ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

दैनिक महाभूमि
# जालना भूमि
गुरुवार २२ जानेवारी २०२६
mahabhoomimarathwada@gmail.com

## हजारो महिला सेवेकऱ्यांनी बनवले तीन लाख बुंदीचे पॅकेट्स
# श्रीक्षेत्र राजुरेश्वर मंदिरात आज जन्मोत्सव सोहळा

राजुर/प्रतिनिधी

मराठवाडा-विदर्भच नाही, तर राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या तालुक्यातील श्रीक्षेत्र राजूर येथील राजुरेश्वर मंदिरात आज भक्तीमय व मोठ्या उत्साहाच्या वातावरणात जन्मोत्सव साजरा होणार आहे. या निमित्ताने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी मंदिर संस्थानच्यावतीने उपाययोजना करण्यात आली आहे. आजच्या या सोहळ्यासाठी तीन हजार महिला सेवेकऱ्यांच्या मदतीने मागील चार दिवसांपासून तीन लाख बुंदीचे पॅकेट्स तयार करण्यात आले आहे.



राजूर येथील राजूरेश्वर सप्ताहाला ५९ वर्षांची परंपरा आहे. मंदिर परिसरात अखंड हरीनाम सप्ताह सुरू आहे. जय हरी विठ्ठल, रामकृष्ण हरी च्या गजराने राजूरनगरी भक्तीमय झाली आहे. मंदिराच्या पायथ्याशी सुरू असलेल्या सप्ताहात दररोज कीर्तन, प्रवचन, ज्ञानेश्वरी पारायण, काकडा, हरीपाठ, शिवपुराण यांसारखे धार्मिक कार्यक्रम होत आहेत. जन्मोत्सवानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहमध्ये दररोज अडीचशे सेवेकरी व दोन हजार महिला दररोज मंदिर परिसरात स्वच्छता ठेवण्यासाठी श्रमदान करत आहे. जन्मोत्सवानिमित्त आयोजित या भागवत सप्ताहामध्ये हभप विजय महाराज गवळी हे शिवपुराण कथा, हभप बालुदेव महाराज चिखलीकर हे गणेश पुराण तर हभप गोरक्षनाथ महाराज सोनवणे यांच्या सुमधूर वाणीतून ज्ञानेश्वरी पारायण सुरू आहे. दररोज श्री राजुरेश्वराच्या दर्शनासाठी व या सोहळ्यासाठी हजारो भाविकांची उपस्थिती आहे. गुरुवार, २२ जानेवारी रोजी अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

दरम्यान, या जन्मोत्सवानिमित्त राजुरेश्वर मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भाविकांसाठी दानशूर व्यक्तींकडून सकाळ, दुपार, संध्याकाळ अन्नदान केले जात आहे. भाविकांच्या व्यवस्थेची जबाबदारी पारायण समितीकडे आहे. सकाळी नाश्ता, दुपारी व रात्री जेवणाची व्यवस्था करण्यात आली. आज मंदिर परिसरात भाविकांसाठी महाप्रसाद वाटप जन्मोत्सवानंतर होणार आहे. या उत्सवात परिसरातील गावे सहभागी झालेली आहेत. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊसाहेब भुजंग, भिकनराव पुंगळे, देवराव डवले, गजानन जामदार, विष्णू राज्यकर, गणेश साबळे, प्रशांत दानवे, प्रमोद पुंगळे, मोहनिराज मापारी, गणेश गिरी आदींसह भाविक या उत्सवासाठी परिश्रम घेत आहेत.

### सात हजारांवर सेवेकऱ्यांकडून सेवा

राजुरेश्वराच्या जन्मोत्सवानिमित्त शंभर गावातील महिला सेवेकरी या सप्ताहमध्ये परिश्रम घेत आहे. विविध गावातील सात हजार श्री चे सेवेकरी भाविकांच्या सेवेसाठी तैनात असून पाणी वाटप करणे, औषध उपचार करणे, भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे, मंदिर परिसरात स्वच्छता करणे, भाविकांना जेवण वाढणे या प्रकारच्या सेवा बजावत आहे. गुरुवारी जन्मोत्सव सोहळ्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होणार असून सेवेकऱ्यांकडून विशेष काळजी घेतली जाणार आहे.

–**उत्तम रावळकर**, व्यवस्थापक, मंदिर संस्थान



## आंतरराज्य वराह चोर टोळीचा पर्दाफाश !
पोलिसांकडून थरारक पाठलाग ; ६ आरोपी गजाआड



भोकरदन/प्रतिनिधी

शहरात पाळीव वराह (डुक्कर) चोरी करणाऱ्या एका सराईत आंतरराज्य टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. सिनेस्टाईल पाठलाग करून पोलिसांनी या टोळीतील ६ आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून चोरीसाठी वापरण्यात येणारे वाहन आणि घातक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

याबाबद पोलिसांनी सांगितले की, शहरातून वराह चोरी झाल्याबाबत १४ जानेवारी रोजी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत आणि त्यांच्या पथकाने शोधमोहीम सुरू केली होती. बुधवार, २१ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास जाफ्राबाद रोडने एक संशयास्पद पिकअप (एमएच ३७ टी ३५२०) जात असल्याची माहिती या पथकाला मिळाली. पोलिसांनी या पिकअपचा पाठलाग सुरू केला. संशयितांनी वाहन वेगाने माहोटा रोडकडे नेले. मात्र, पोलिसांनी माहोटा येथील चौकात ट्रॅक्टर आडवे लावून रस्ता अडवला. चालकाने तिथून वाहन वळवून विरेगावच्या दिशेने पळ काढला, पण तिथेही पोलिसांनी मोठ्या शिताफीने पिकअप अडवली. अंधाराचा फायदा घेऊन आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी नरेंद्रसिंग लोंढा, रा. अहमदाबाद, गुजरात याला ताब्यात घेतले. या झटापटीत पोलीस अंमलदार लक्ष्मण राणगोते हे जखमी झाले.

### बसमधून पळ काढण्याचा प्रयत्न फसला

चार आरोपी कुंभारी पाटीवरून जालनाकडे निघलेल्या एसटी बसमध्ये बसल्याचे समजले. पोलिसांनी तत्काळ केदारखेडा येथे बस थांबवून तपासणी केली असता, बसमधील अनिलसिंग अंद्रेले आणि गोलूसिंग अंद्रेले यांना ताब्यात घेतले. याचवेळी खिडकीतून उडी मारून शेतात पळणाऱ्या अशोक बोकडे आणि विजय जाधव दोघेही रा. गुजरात यांनाही पोलिसांनी पाठलाग करून मक्याच्या शेतातून पकडले. तसेच, छत्रपी संभाजीनगर येथे लावलेल्या सापळ्यात या टोळीचा आणखी एक सदस्य किरण बाबू बोकडे रा. गुजरात आणि महादु वसंत कवाडे रा. कारंजा लाड, वाशिम यांनाही अटक करण्यात आली आहे.

या कारवाई दरम्यान आरोपींनी पोलिसांच्या गाडीला चकवा देऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र आम्ही जिवाची पर्वा न करता त्यांचा पाठलाग केला. ही एक सराईत आंतरराज्य टोळी असून त्यांच्याकडून घातक शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत. नागरिकांनी अशा प्रकारच्या संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा.

–**पवन राजपूत**, पोलीस उपनिरीक्षक

### घातक शस्त्रे हस्तगत

आरोपींकडून जप्त केलेल्या पिकअपची तपासणी केली असता, त्यात वराह पकडण्यासाठी लागणारे दोर, जाळी तसेच स्वसंरक्षणासाठी आणि पाठलाग करणाऱ्यांवर हल्ला करण्यासाठी वापरण्यात येणारे दगड व दोन धारदार तलवारी मिळून आल्या आहेत. यावरून पोलिसांनी आर्म अॅक्टनुसारही गुन्हा दाखल केला आहे.

## न्यूज ब्रीफ

### विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

**पिंपळगाव रेणुकाई :** पारध येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात पार पडली. सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी बेंगळूरू, म्हैसूर आणि उटी या प्रसिद्ध ठिकाणांना भेट दिली. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी तीन राज्यांचा प्रवास करत विविध संस्कृती, इतिहास व निसर्गसंपदेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. ही सहल संस्थापक सचिव डॉ. सुगदेव मांटे व अध्यक्षा रेवती मांटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या सहलीसाठी प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे, अधीक्षक किशोर वाघ आणि मुख्याध्यापक विलास लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखली प्राचार्य अमोल बांडगे, प्रा. मंगेश लोखंडे, प्राचार्य अर्जुन राजबिंडे, प्रा. लक्ष्मण खरात, वैभव भोरकडे, सोनाली कोळसे, प्रा. दिनेश कापरे, प्रा. धनराज भोसले, प्रा. राजू धनवई, गजानन लोखंडे, तुकाराम लोखंडे, भागवत पानपाटील आदी शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### निधनवार्ता

**वसंत जाधव**



**मंठा :** येथील जिजामात अर्बन को ऑपरेटिव्ह पतसंस्थेचे अध्यक्ष तथा उमरखेड येथील माजी सरपंच वसंत जाधव यांचे मंगळवार, २० जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, दोन मुले, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उमरखेड या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. द वर्ल्ड इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष शिवाजी व विकास जाधव यांचे ते वडील होत.

## अंबड बसस्थानकावर ॲटो रिक्षा चालकांची मुजोरी

मंठा/प्रतिनिधी

शहरातील बसस्थानक परिसरात अनधिकृतरित्या ऑटो उभ्या करून प्रवाशांना व इतर वाहनधारकांना विनाकारण त्रास देण्याचा प्रकार रिक्षा चालकांकडून सुरू आहे. या संदर्भात स्थानिक न्यूज चॅनलवर बातमी प्रसिद्ध झाली होती. यावरून अनाधिकृत संघटन जमा करून पत्रकारावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी रिक्षा ऑटो युनियनकडून मंठा पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आली आहे. अशा प्रकारचे निवेदन देऊन दबाव टाकण्याचा प्रयत्न अवैद्य रिक्षा चालकाकडून होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शहरातील बस स्थानक व परिसरामध्ये ऑटो रिक्षा चालकांकडून मोटार वाहन कायद्याचे सर्रास उल्लंघन केले जात आहे, तसेच वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. कालबाह्य झालेले ऑटो रिक्षा चालवून प्रवाशांचा जीव धोक्यात घातला जात आहे. त्याचबरोबर प्रदूषण नियंत्रण विभागाचा कुठलाही परवाना न घेता रिक्षा चालवून प्रदूषण खराब केली जात आहे. याचबरोबर कुठल्याच ऑटो मध्ये मीटर बसवलेले नाही. त्यामुळे प्रवाशांकडून मनमानीपणे भाडे घेतले जात आहे. त्याचबरोबर अल्पवयीन विनापरवाना चालकाच्या ताब्यात रिक्षा असल्याने अपघाताच्या घटना घडण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. वाहतूक नियमाचे उल्लंघन करून ऑटो रिक्षा चालत असल्याचे प्रकार दिसून येत आहे. कोणत्याही ठिकाणी संघटनाच्या नावाखाली ऑटो उभा करायचा आणि दादागिरी करायची हे काम सध्या सुरू आहे. तसेच वाटेल त्याठिकाणी रिक्षा उभ्या करून वाहतुकीला अडथळा निर्माण केला जात आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी देखील होत आहे. या सर्व बाबीकडे परिवहन मंडळासह, प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देऊन ऑटो रिक्षा चालकांवर कार्यवाही करावी, अशी मागणी नागरीकातून जोर धरत आहे.

## प्रकाश टोम्पे यांची बिएसएफमध्ये निवड

**पिंपळगाव रेणुकाई :** भोकरदन तालुक्यातील सुरंगळी येथील प्रकाश सांडू टोम्पे यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढत, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती जेमतेम असताना चिकाटी व जिद्दीने बीएसएफमध्ये निवड निश्चित केली. प्रकाश टोम्पे याची सिमा सुरक्षा दलात निवड झाल्याने गावात ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतिषबाजीत मिरवणूक काढण्यात आली.

## रोटरीच्या मोफत सर्जरीसाठी १३० रुग्णांची निवड
प्राथमिक तपासणी शिबिराला प्रतिसाद




जालना/प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ जालना आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात २२ फेब्रुवारी ते ४ मार्चदरम्यान होणाऱ्या ११ दिवसीय मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिरासाठी १८ जानेवारी रोजी आयोजित प्राथमिक तपासणी शिबिराला प्रतिसाद मिळाला. यावेळी जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भातील १३० रुग्णांची प्लास्टिक सर्जरीसाठी निवड करण्यात आली आहे.

मिशन हॉस्पिटलमध्ये सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत प्राथमिक तपासणी करण्यात आली. याप्रसंगी जालना जिल्हासह मराठवाडा आणि जिल्ह्यातून फाटलेले ओठ, तोंड व चेहऱ्याची विकृती, जळीत जखमा, चिकटलेली बोटे, अपघातात झालेल्या जखमा तसेच अन्य जन्मजात विकृती असलेल्या रुग्णांची या शिबिरात सहभाग नोंदविला. वाशिम येथे सुमारे ५५ जणांची तर जालना येथे १६० अशा एकूण २१५ जणांची तपासणी करण्यात आली. पात्रता निश्चितीनंतर जालन्यात २२ फेब्रुवारी ते ४ मार्चदरम्यान होणाऱ्या दहा दिवशीय मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिरासाठी १३० रुग्णांची निवड करण्यात आली. त्यांना शस्त्रक्रियेची तारीख कळविली जाणार आहे.

गेल्या २१ वर्षापासून मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. दरवर्षी जर्मन येथील बारा डॉक्टरांची तज्ञ टीम व मुंबईतील नामांकित प्लास्टिक सर्जन डॉ. अनिल टिबरेवाल आणि त्यांचे सहकारी तज्ज्ञ सर्जन या शिबिरात सेवा देत आहेत. प्राथमिक तपासणी शिबिराच्या यशस्वीतेसाठी मिशन हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. क्रिस्टोफर मोजेस, रोटरी क्लबच्या अध्यक्ष वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख अभय नानावटी, शिवपाल शर्मा, रोटरी पदाधिकारी आणि सदस्यासह हॉस्पिटलच्या स्टाफने परिश्रम घेतले.

## दिपभारती विद्यालयात आनंद नगरी उत्साहात

**धावडा :** भोकरदन तालुक्यातील वडोद तांगडा येथील दिपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आनंदनगरी बाल मेळावा उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवसायाचे धडे गिरवता आले. पालकांनी या मेळाव्याला मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच वर्धमान वास्कर व डॉ.सी.आर. तांदुळजे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व फीत कापून करण्यात आले. प्राचार्य एस.टी.कर्वे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या आनंद नगरीमध्ये विद्यार्थ्यांनी ३५ स्टॉलवर स्वतः बनवलेले विविध खाद्य पदार्थांची विक्री केली.

## मंठा येथे माध्यम प्रतिनिधींचा सत्कार

मंठा/प्रतिनिधी



येथील माऊली अर्बन परिवाराच्यावतीने दर्पण दिनाचे औचित्य साधून मंठा तालुक्यातील पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला दर्पणकार बाळ शास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला आयोजक सतीश निर्वळ, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे, ज्येष्ठ पत्रकार पंडित बोराडे, दिनेश जोशी, पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी कुलकर्णी, नागेश कुलकर्णी, भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड, अजय अवचार, एन.डी. दवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करत असताना पत्रकारांनी सहकार्य केले, त्यांच्या सकारात्मक लिखाणामुळे माझी जडणघडण झाली. स्वातंत्र्यानंतर देशाच्या जडणघडणीमध्ये पत्रकारांचे मोठे योगदान आहे. पत्रकारांनी बातमीची सत्यता पडताळणी करून बातमी प्रसिद्ध करावी असे सांगितले. पत्रकार दिनेश जोशी, रमेश देशपांडे, प्रदीप देशमुख, संतोष दायमा, अरुण राठोड यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी आपल्या प्रास्ताविकात सतीश निर्वळ यांनी पत्रकार आपल्या लिखाणाच्या माध्यमातून समाज हिताचे काम करतात, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सत्काराचा कार्यक्रम आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैजनाथ निर्वळ, दत्तात्रय निर्वळ, गजानन निर्वळ, कालिदास निर्वळ, प्रभाकर कदम, दिलीप केकान, दिगंबर बादाडे, हनुमान बोने यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा टाके यांनी केले.

## जि.प. उर्दु शाळेत कॅन्टीन डे उत्साहात

सावंगी अवघडराव/प्रतिनिधी

भोकरदन तालुकयातील सावंगी अवघडराव येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दु शाळेत कॅन्टीन डे उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, व्यवहारज्ञान, स्वच्छता व सहकाऱ्यांची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमास खालेद खान, जाहेद खान, जिउल्लहखान खान, अकरम खान, नोमान खान, शेख कलीम, शेख जफर, सय्यद सलीम, सलमान शहा, संदीप देशमुख, शाहेद फराज, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कॅन्टीन डे उपक्रमातून विद्यार्थ्यांनी ३१ हजार रुपयांचा व्यवसाय केला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून व्यवहार कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अब्दुल वाजीद, अब्दुल मुनाफ, मोहम्मद बिलाल, सय्यद मुजाविजुद्दीन, आफरीन पटेल, आयशा सिद्दीका, ऐजाज खान, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सदस्य आदींनी परिश्रम घेतले.

### बाजारात नवीन लसणाची प्रतीक्षा
# आवक घटल्याने लसणाची फोडणी पुन्हा महागली

गणेश खिस्ते

**पिंपळगाव रेणुकाई :** भोकरदन तालुक्यातील घावुक बाजारात आवक घटल्याने लसणाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात एक किलो लसणाचा दर १६० ते २०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. वाढलेल्या दरामुळे सर्वसामान्यांच्या घरांतून लसूण गायब झाला असून, लसणाची फोडणी महाग झाली आहे. पुढील महिनाभर हा दर टिकून राहणार असल्याचा अंदाज विक्रेत्यांनी वर्तविला आहे.



मागील वर्षी लसणाचे उत्पादन कमी असल्याने काही दिवसांपासून घाऊक बाजारात लसणाचा तुटवडा जाणवत आहे. बाजारात मागणीच्या तुलनेत लसणाची आवक कमी होत असल्याने दरात वाढ होत आहे. दोन वर्षांपूर्वी लसणाला कमी दर मिळाला. त्यामुळे लसूण उत्पादकांनी लसणाऐवजी इतर पीक घेण्यावर भर दिला. यंदा भोकरदन तालुक्यासह पिंपळगाव रेणुकाई परिसरातील बाजारात आवक अपुरी आहे. दरवर्षी बाजारात बाहेरील राज्यातून लसणाची आवक होत असते. साधारणत: जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात नवीन लसणाची आवक सुरू होते, मात्र अद्यापही आवक सुरू झालेली नाहीत. यावर्षी बऱ्याच ठिकाणी लसून लागवड उशीरा झालेली असल्याने फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात आवक वाढण्याची शक्यता आहे. साधारणतः १५ दिवसांपूर्वी किरकोळ बाजारात चांगल्या दर्जाच्या लसणाचे दर ८० ते १०० रुपये प्रतिकिलोपर्यंत होते. मात्र आता आवक कमी झाली असताना मागणीतही वाढ झाल्याने लसणाचे दर थेट १६० ते २०० रुपये प्रतिकिलोवर पोहोचले आहेत.

### बाजारात आवक घटली

मागील दोन वर्षे लसणाला दर न मिळाल्याने लसूण लागवडीत मोठी घट झाली होती. शेतकऱ्यांनी लसणाऐवजी इतर पिकाला प्राधान्य दिले होते. इतर राज्यांतही काही प्रमाणात उत्पादन घटले असल्याने, आता यंदाच्या लागवडीतील लसूण अद्याप दाखल न झाल्याने बाजारात आवक घटली आहे. नव्या लसणाची आवक अद्याप सुरू झाली नाही. मागील वर्षी उत्पादन कमी असल्याने आता आवकही कमी झाली. त्यामुळे दरात वाढ झाली आहे. चांगल्या दर्जाचा लसूण १६० ते २०० रुपये किलो या भावाने विकला जात आहे.

– **शिवाजी जामुंदे**, विक्रेता

## गावकऱ्यांनी उभारले मंगल कार्यालय

बदनापूर/प्रतिनिधी

तालुक्यातील वरुडी गावातील ग्रामस्थांनी एकत्रीत येत तब्बल ३० लाख रुपये खर्च करून गावात मंगल कार्यालय उभारले आहे. या मंगल कार्यालयाचे काम जवळपास पूर्णत्वास आले असून ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे.

वरुडी गावात सर्वांना नळ योजनेद्वारे पाणी, भूमीगत गटार योजना, स्टील लाईट, संपूर्ण गावात सीसीटीव्ही कॅमेरे, गावात दररोज कचरा उचलण्यासाठी घरोघरी घंटागाडी द्वारे कचरा संकलन करून गावात स्वच्छता राखली जाते. आता लोकसहभागातून मंगल कार्यालयाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तालुक्यातील वरुडी ग्रामपंचायत अव्वल ठरली आहे. यासाठी येथील ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन गावातील मंगल कार्यालय आपल्या गावातच होण्यासाठी भूमिका मांडली होती. गावात मंगल कार्यालयाची गरज ओळखून सढळ हाताने मदत करून मंगल कार्यालयासाठी गावकऱ्यांनी देणगी दिली. यासाठी सरपंच राधाकिसन शिंदे, विष्णु शिंदे, ज्येष्ठ नागरिक हरिश्चंद्र शिंदे, विठ्ठल शिंदे, पुरुषोत्तम जोशी तसेच इतर गावकऱ्यांनी पुढाकार घेतला होता. या मंगल कार्यालयाचे उद्घाटन गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले आहे.

## न्यूज ब्रीफ

### जागतिक बौद्ध धम्म परिषदेसाठी प्रदीप बिल्होरे यांना निमंत्रण

**सिंदखेडराजा :** छत्रपती संभाजीनगर येथे २६ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत आयोजित जागतिक बौद्ध धम्म परिषदेसाठी सामाजिक कार्यकर्ते व संभाजी ब्रिगेडचे संस्थापक प्रदीप बिल्होरे यांना निमंत्रण प्राप्त झाले आहे. हे निमंत्रण प्रा. धम्म देशना महाथेरी आणि संघशीला थेरी यांच्या हस्ते देण्यात आले असून, प्रदीप बिल्होरे यांनी ते स्वीकारले आहे. प्रदीप बिल्होरे हे गेल्या २५ वर्षांपासून सामाजिक चळवळीत सक्रिय असून, विविध सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे. समाजात समता, न्याय आणि मानवतेचे मूल्य रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केल्याचे नमूद करण्यात आले. या परिषदेत ३० देशांतील भिक्खू संघ, लेखक, साहित्यिक, विचारवंत, प्रबोधनकार व उद्योजक सहभागी होणार आहेत.

### २६ वर्षांची समाजप्रबोधनाची परंपरा अखंड..

# राजमाता जिजाऊ राजवाड्यात महात्मा फुले दिनदर्शिकेचे प्रकाशन

सिंदखेडराजा/प्रतिनिधी



महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समता, शिक्षण व सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविणाऱ्या महात्मा फुले दिनदर्शिकेचे प्रकाशन येथील ऐतिहासिक राजमाता जिजाऊ राजवाड्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. २० जानेवारी रोजी सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज कायंदे यांच्या हस्ते या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार कायंदे व ॲड नाझेर काझी यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित केले. समाजात परिवर्तन घडविण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असून, महात्मा फुले दिनदर्शिकेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच या दिनदर्शिकेचे संपादक भगवानराव सातपुते यांच्या २६ वर्षांच्या अखंड कार्याचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे, शिवाजी राजे जाधव, संतोष खांडेभराड, निलेश ठाकरे, दिलीप आढावा, श्याम मेहेत्रे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### गत २६ वर्षापासून अखंड परंपरा

■ गेल्या २६ वर्षांपासून सातत्याने प्रकाशित होत असलेली ही दिनदर्शिका महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रांतिकारी विचारांचे दर्शन घडवित असून, समाजासाठी दिशादर्शक ठरत आहे. ही परंपरा म्हणजे सामाजिक जागृतीचा एक प्रभावी माध्यम असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# बाळसमुद्र येथे आश्रुबाबा जन्मोत्सव; हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद

सिंदखेड राजा/प्रतिनिधी



तालुक्यातील बाळसमुद्र येथे श्री आश्रुबाबा यांच्या जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत भक्तिभाव व उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित महाप्रसाद वितरण कार्यक्रमाला परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावत प्रसादाचा लाभ घेतला.

बाळसमुद्र येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही आश्रुबाबा जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने पार पडला. या सोहळ्यास माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, श्रीनिवास खेडेकर,योगेश जाधव, युवा नेत्या भाग्यश्री खेडेकर, माजी कृषी सभापती दिनकरराव देशमुख, माजी समाजकल्याण सभापती बाबूराव मोरे, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष रामभाऊ जाधव तसेच भाजपाचे नेते शंकरराव उगलमुगले आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांना संबोधित करताना माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर म्हणाले की, आश्रुबाबा यांच्या पवित्र पावलांनी बाळसमुद्र गाव धार्मिक व सामाजिक कार्याकडे प्रवृत्त झाले आहे. ज्या ज्या गावात अशा थोर विभूतींचे वास्तव्य राहिले, त्या भागातील समाजाला त्यांनी सदमार्गाचा उपदेश दिला. या पावन जन्मोत्सव सोहळ्याला उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले, सामाजिक कार्यासाठी जे काही योगदान लागेल, ते मी सदैव करण्यास तत्पर राहील, असेही ते म्हणाले. या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त बाळसमुद्र, शेंदुर्जन, गोरेगाव, साखरखेर्डा व दरेगाव परिसरातून हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर सर्व भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

# तीन दिवसीय नामजप शिबिराचे आयोजन

बुलढाणा/प्रतिनिधी

रामनामाचा प्रसार आणि प्रचारासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालत असलेले समर्थ सद्गुरु श्री श्रीहरी महाराज (श्रीक्षेत्र माकोडी) यांच्या कृपाशीर्वादाने बुलढाणेकर भाविकांनी तीन दिवसीय नामजप शिबिराचे आयोजन केले आहे.

प.पू. ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने २८ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान विघ्नहर्ता गणेश मंदिर पाळणाघराजवळ रामनगर बुलढाणा येथे हे शिबिर पार पडणार आहे. राम नामाचा महिमा अगाध आहे. संतांनी स्वअनुभवातून नाम चिंतनाचे महत्त्व कथन केले आहे. ''श्रीराम जयराम जय जय राम'' या त्रयोदशाक्षरी नामजप शिबिराचा संकल्प बुलढाणेकर राम उपासक मंडळाने केला होता. त्यानुसार २८ जानेवारीला पहाटे ५ वाजता काकडा आरतीने या सोहळ्याचा श्री गणेशा होईल. सकाळी ७ वाजता ''रघुपती राघव राजाराम पतित पावन सिताराम'' या अखंड पहाऱ्याला तर ''श्रीराम जय राम जय जय राम ''नामस्मरणाला देखील प्रारंभ करण्यात येणार आहे. सकाळी साडेअकरा वाजता रामपाठ त्यानंतर नैवेद्य आरती, सायंकाळी सहा वाजता उपासना व प्रसाद झाल्यानंतर रात्री साडेसात वाजता सौ. राजश्री देशपांडे (चिखली) यांचे प्रवचन होणार आहे.

## सिंदखेड राजा नगरपरिषदेत विविध समित्यांच्या सभापतींची निवड

सिंदखेड राजा/प्रतिनिधी



सिंदखेड राजा नगरपरिषदेची स्थायी समिती निवडणूक नुकतीच पार पडली. या अनुषंगाने नगरपरिषदेतील विविध विषय समित्यांच्या सभापती व उपसभापती पदांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. ही निवड प्रक्रिया उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांच्या पिठासीनतेखाली झालेल्या विशेष बैठकीत बिनविरोध पार पडली.

नगरपरिषदेतील संघटनात्मक समन्वयासाठी माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला असून विजय तायडे यांच्या सहकार्याने ही निवड प्रक्रिया शांततेत व सुव्यवस्थितरीत्या पार पडल्याचे सांगण्यात आले. या निवडीत बांधकाम सभापतीपदी पूजा मंगेश खुरपे, पाणीपुरवठा सभापतीपदी कृष्णा माणिकराव मेहेत्रे, स्वच्छता व आरोग्य सभापतीपदी दिपाली योगेश म्हस्के, तर महिला व बालकल्याण सभापतीपदी अंबिका कैलास कोरडे यांची निवड करण्यात आली. तसेच उपसभापतीपदी सोनाली गजानन मेहेत्रे यांची नियुक्ती करण्यात आली.या बैठकीस नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, स्थायी समिती सदस्यांसह नवनिर्वाचित नगरसेवक निलेश ठाकरे, नरहरी तायडे, संदीप मेहेत्रे, आवेज खान व म्हस्के उपस्थित होते. तसेच गटनेते संदीप मेहेत्रे व गटनेते दिलीप आढाव यांचीही उपस्थिती होती. याशिवाय इतर नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुरूम उत्खनन पकडूनही कारवाई शून्य; महसूल अधिकाऱ्यांवर संशयाचे सावट

सिंदखेड राजा/प्रतिनिधी



तालुक्यातील सावखेड तेजन (माळ परिसर) येथे १९ जानेवारी रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास सुरू असलेले अवैध मुरूम उत्खनन महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी रंगेहाथ पकडले असतानाही, पुढील कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आडगाव राजा-सावखेड तेजन माळ परिसरात सुरू असलेल्या या अवैध उत्खननात दोन ट्रॅक्टर व एक जेसीबी मशीनचा वापर सुरू होता. विशेष म्हणजे, सदर वाहने अडविण्यात आली असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी पाहिले असूनही पंचनामा, जप्ती किंवा कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही.

२० जानेवारी रोजी महसूल विभागाकडे विचारपूस केली असता, कोणतीही अधिकृत नोंद किंवा कारवाई झाल्याचे आढळून आले नाही. तहसीलदार कार्यालयाकडून उडवा-उडवीची, समाधानकारक नसलेली उत्तरे देण्यात आल्याने संशय अधिक बळावला आहे.या संपूर्ण प्रकारात आर्थिक देवाण-घेवाण करून प्रकरण दाबले गेल्याचा गंभीर आरोप करण्यात येत असून, शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडविण्यात आल्याचा दावा केला जात आहे. कर्तव्य बजावण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे बेकायदेशीर उत्खननाला अप्रत्यक्ष पाठबळ मिळत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.

#### प्रकरणाच्या चौकशीची मागणी

■ या पार्श्वभूमीवर श्रीमंत राजे लखुजीराव जाधवराव गड किल्ले ऐतिहासिक वास्तू संवर्धन प्रतिष्ठान, आडगाव राजा यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांच्याकडे लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे. तक्रारीत सदर प्रकरणाची स्वतंत्र व सखोल चौकशी, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई, तसेच शासनाचा बुडालेला महसूल वसूल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### उज्ज्वला समिती स्थापन करण्यास मान्यता

**बुलढाणा :** अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या ९ ऑक्टोबर रोजीच्या पत्रानुसार केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत देशभरात २५ लाख अतिरिक्त एलपीजी गॅस जोडण्या मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा उज्ज्वला समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी महिलांकडे अद्याप गॅस जोडणी नाही, त्यांनी नजीकच्या एजन्सीकडे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज तात्काळ सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजना समिती अध्यक्ष डॉ.पाटील यांनी केले आहे.

## डाक जीवन विमा पॉलिसी पुनर्जीवित करण्यासाठी विशेष मोहिम

अंढेरा/प्रतिनिधी




भारतीय डाक विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या डाक जीवन विमा आणि ग्रामीण डाक जीवन विमा या योजनांमधील बंद पडलेल्या विमा पॉलिसी पुन्हा सुरू करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

डाक संचालनालय, पोस्टल जीवन विमा, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये ही विशेष मोहीम १४ जानेवारी ते १४ एप्रिल या कालावधीत राबविण्यात येत आहे. नियमित हप्ता न भरल्यामुळे बंद पडलेल्या पॉलिसी या कालावधीत पुनर्जीवित करता येणार असून, पुनर्जीवन करताना लागणाऱ्या दंडावर सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेचा लाभ घेऊन नागरिकांनी आपली बंद पडलेली विमा पॉलिसी पुन्हा सुरू करून स्वतःच्या व कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेची खात्री करून घ्यावी, असे आवाहन श्री. गणेश आंभोरे, अधीक्षक डाकघर, बुलढाणा विभाग यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 863



-: आडवी विधाने:-

1) तालुका, जिल्ह्याचा एक भाग, वसुली
3) पुरातन काळातील एक श्रेष्ठ कवी, यांनी रचलेल्या आर्या प्रसिद्ध आहेत.
6) मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेतील प्राणी
11) मनाची अस्थिरता
12) स्वदेशाबद्दल अभिमान बाळगणारा
14) दर दहा वर्षांनी होणारी माणसांची मोजदाद
18) मत्सर, व्देष
19) स्वर, नाद
20) फोडातून निघणारा घाणेरडा द्रव्यांश
21) सर्वांना कसोटीला लावणारा
23) मर्कट, माकड
25) याप्रमाणे, असे
26) दीपक
27) क्रिकेटमध्ये सहा धावांचा टोला
29) मनातल्या मनात केलेले चिंतन
30) दुःख, कांटा, बोंच
31) स्वतःचा मतलब
32) कुष्ठरोग
33) ज्याच्या डोक्यावर कर्ज किंवा उपकार आहेत असा
34) धरा, जमीन, पृथ्वी
35) बहीण
36) हुशार, गुणी
38) त्वेष, जोम
40) अति त्वरेने उंच किंवा दूर जाणे
42) कोणत्याही पक्षाची बाजू न घेणारा
44) दुधावरची मलाई
45) दिवस
46) लहान व चापट तुकडा
47) दक्षता, सावध राहणे
50) अंगात चपळता येण्यासाठी तालिमीत पुरलेला वाटोळा खांब
52) जिने गुणावयाची ती संख्या
53) हिमालयातील एक प्रसिद्ध शिखर
54) दरवाजाची फळी
55) इतर, श्रेष्ठ
56) वेदना, चंद्राचा सोळावा अंश
57) तलवार, खड्‌ग
59) दूध, साखर, लोणी इ. घालून केलेले पक्वान्न, तिंबलेली कणिक
61) मास, महिना
62) वायुपुत्र, हनुमान
63) नवीन
65) सरदार वल्लभाई पटेल यांना मिळालेली उपाधी
67) एक खनिज द्रव्य
70) नारळाचा खरवडून काढलेला कीस
72) एक लाख ही संख्या
73) राजघराण्यातील मुलगी
75) महामार्गावरुन मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांवर लावलेला कर
76) उरलेले, शिल्लक, शेष
77) मुसलमानी धर्मशास्त्र जाणणारा पंडित
78) उपस्थिती, प्रत्यक्षता
79) मोठा हातोडा 80) मोठे
81) राजवाडयातील व्दारपाल
82) काही विशिष्ट अटींवर शत्रुत्व संपविणे

-: उभी विधाने :-

1) सर्व तपशीलासहीत, बारीकसारीक गोष्टींसह, संपूर्ण
2) मीठ
3) आपला राष्ट्रीय पक्षी
4) पाच, भांडण सोडविण्यासाठी उभय पक्षांनी मान्य केलेले लोक
5) प्रबळ इच्छा (अरबी)
6) देवपूजेच्या वेळी पळीभर पाणी प्राशन करणे
7) मन, अंतःकरण
8) देवाच्या कार्यासाठी नाही आणि धर्माच्याही कार्यासाठी नाही असा अनाठायी निष्कारण झालेला खर्च
9) अधीन, ताब्यातला
10) भक्तांवर अतिशय प्रेम करणारा
13) उणीव भरुन काढणारी वस्तु, भरती
15) द्रव, रुची, आवड
16) एक संख्या
17) कसोटी, पारख
22) सहा कोनांचा
23) कापड मोजण्याचे एक माप
24) सुंदर, संमोहक
26) क्षमा मागणे, खेद
28) काडीभोवती कापूस गुंडाळून केलेली वात
30) एकदा करीन म्हटल्यावर केल्यावाचून सुटका नाही असे काम (एक शब्दप्रयोग)
35) मुलीचा श्रावण महिन्यातील गौरीचा उत्सव
36) चुपचाप, मुकाटयाने
37) संगीतातील एक राग
39) केवळ उपचारादाखल केलेले, वरकांती
40) संसार, उत्पत्ती
41) तेजोहीनता 43) स्थान, ठिकाण
44) महात्मा गांधीचा एक आश्रम
47) शंकायुक्त
48) हत्याराची कापण्याची बाजू
49) व्यायाम, अभ्यास
51) स्कंध
52) इतरांच्या न कळत दिलेले दान
55) पृथ्वीशिवाय इतर लोक
57) सहन करणारा, सोशिक
58) शेतीबद्दल सरकारात दरसाल भरावयाची रक्कम
60) आपलेपणा, प्रेम, जिव्हाळा, ममता
62) प्रतिस्पर्धी, मारणारा
64) धाक, दरारा 66) शुष्क, कोरडे
68) हत्तीप्रमाणे मंदगती चाल
69) उलटे, विरुद्ध
71) लग्नसमयी नवरदेवाला आणण्यास जाणारा वधुचा भाऊ
74) सकाळचा फराळ
76) शर, तीर
77) न बोलणे (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दव्यूहचे उत्तर



uday munde - 8446302691

## दिव्यांग बांधवांची इन कॅमेरा तपासणी करण्याची मागणी



बुलढाणा/प्रतिनिधी

जिल्हा सामान्य रूग्णालयात जिल्हाभरातील दिव्यांग बांधव तपासणीसाठी येत असतात. मात्र जिल्हा रूग्णालयात कार्यरत काही एजंट व डॉक्टरांच्या संगनमताने खऱ्या दिव्यांगांना डावलून बोगस दिव्यांगांची तपासणी करून त्यांच्याकडून आर्थिक लाभ घेवून दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात येते त्यामुळे खऱ्या दिव्यांगांचा हक्क हिरावला जात आहे. त्यामुळे दिव्यांगांची इन कॅमेरा तपासणी करावी या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी प्रहार अपंग क्रांती संस्थेच्यावतीने करण्यात आली आहे.

जिल्हा रूग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ.बिराजदार यांना या संदर्भात दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, बुलढाणा जिल्हा रूग्णालयात प्रत्येक आठवडयात अपंग तपासणी बोर्डचे आयोजन केले जाते. मात्र याचा लाभ मोठया प्रमाणात बोगस दिव्यांग घेत आहेत. त्यामुळे हा प्रकार रोखण्यात यावे तसेच ज्या दिव्यांगांना चालता येत नाही त्यांच्यासाठी व्हिलचेअरची सुविधा करण्यात यावी, दिव्यांग बोर्डमध्ये गेल्या अनेक वर्षापासून कार्यत क्लर्कची तात्काळ बदली करण्यात यावी, दिव्यांग प्रमाणपत्राला आधार लिंक करून दयावे यासह आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदनावर राजेश पुरी, मुकेश राजपूत, अजित फुंदे, राजेश दांदळे यांच्या सहया आहेत.

दैनिक महाभूमि

गुरुवार, २२ जानेवारी २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

# अकोला भूमि

प्रशिक्षण आपत्ती व्यवस्थापनाचे...







**अकोला :** डॉ. पंदेकृवित सुरू असलेल्या आव्हान २०२५–२६ प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत आपत्ती व्यवस्थापन पूर्वतयारीचा भाग म्हणून एनडीआरएफच्या जवानांनी २० जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थ्यांना पूर परिस्थितीत करावयाच्या आपत्कालीन योजनांचे कृतीयुक्त प्रात्यक्षिके विद्यापीठाच्या बाबुळगाव ब्लॉकवर करुन दाखविले. या साहसी आणि महत्त्वपूर्ण प्रशिक्षणात विद्यार्थ्यांसह इतरांनी महत्वपूर्ण बाबी शिकल्या.

## न्यूज ब्रीफ

### नरेंद्राचार्य महाराजांचे २५ जानेवारीला प्रवचन

**अकोला :** नरेंद्राचार्य महाराज, रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणिजधाम यांचा पादुका दर्शन सोहळा व प्रवचनाचे आयोजन रविवार २५ जानेवारी रोजी येथे सकाळी ९ वाजता, मराठा मंगल कार्यालयामध्ये करण्यात आले आहे. या सोहळ्याप्रसंगी महासंतसंग सोहळा, गुरूपूजन, उपासक दीक्षा, आरती सोहळा, जगदुरूंचे प्रवचन, दर्शन सोहळा असे कार्यक्रम होणार आहेत. अशी माहिती कुंडलिकराव वायभासे, संजय खंडागळे, सुरेश मोरे यांनी दिली. या कार्यक्रमानिमित्त अकोला शहरातून जगदुरूंच्या पादुकांची शोभायात्रा संतोषी माता मंदिर, ते मराठा मंगल कार्यालया दरम्यान काढण्यात येणार आहे. यामध्ये विविध देखावे यांचे सादरीकरण होणार आहे. सामाजिक उपक्रम हा कार्यक्रम संपन्न होणार आहेत. तसेच उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते सामाजिक उपक्रमांतर्गत समाजातील गरजवंतांना १० मोफत शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे.

भाजप- उद्धवसेनेच्या बैठकांनी वेधले लक्ष : मोठ्या राजकीय हालचालींना वेग

# विकासाच्या मुद्द्यावर अकोला महापालिकेत सत्ता स्थापनेची तयारी

**अकोला/प्रतिनिधी**

महापालिकेच्या सत्तेसाठी आवश्यक असलेला ४१ चा मॅजिक फिगर गाठण्यासाठी शहरात मोठ्या घडामोडी घडत आहेत. अशातच भाजपाकडून ठाकरे गटाच्या शिवसेनेला थेट ऑफर दिल्याच्या चर्चा सुरू झाल्या अन् आमदार नितीन देशमुख यांनी या चर्चांवर शिक्कामोर्तब केला. तेव्हा विकासाच्या मुद्द्यावर महापालिकेत भाजप- शिवसेना (ठाकरे गट) एकत्र येणार का याकडे अकोलेकरांचे लक्ष लागून आहे.

महापालिकेच्या एकूण ८० पैकी ३८ नगरसेवकांसह सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपचे संख्याबळ



बहुमताच्या आकड्याच्या अगदी जवळ असल्याने त्या पक्षासोबत जाण्यास उद्धवसेनेच्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे अकोल्यात भाजप आणि उद्धवसेनेचे मनोमिलन होण्याचे संकेत आहेत.

उद्धवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांची आमदार नितीन देशमुख व जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत नागरिकांची विकासकामे मार्गी लावण्यासाठी सत्तेत सहभागी होण्यास नगरसेवकांनी पसंती दर्शविली. मतदारांनी उद्धवसेनेला चांगला कौल दिला असून, त्या विश्वासाला न्याय देण्यासाठी

भाजपसोबत जाण्याबाबत प्राथमिक स्तरावर चर्चाही झाल्याचे उध्दवसेनेतील सूत्रांनी सांगितले. उद्धवसेनेच्या नगरसेवकांनी विकास व एकाच विचारसरणीच्या मुद्द्यावर भाजपसोबत जाणेच योग्य असल्याचे मत व्यक्त केल्याची चर्चा असतानाच भाजप व उद्धवसेना एकत्र आल्यास त्यांना सत्तेसाठी इतर पक्षाची गरज भासणार नाही दोन्ही पक्षांची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती असून, यासंदर्भात प्राथमिक चर्चा व बैठका झाल्याची पुष्टी शिवसेनेचे (ठाकरे गट) आमदार नितीन देशमुख यांनी केली.

### दोन्ही राष्ट्रवादीसह, 'मविस'ही भाजपसोबत

■ भाजप उद्धवसेनेच्या साथीने सत्ता स्थापनेच्या तयारीत असतानाच राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या तीनही नगरसेवकांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. निवडणूक भाजपसोबतच्या युतीत लढलेल्या राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाची एक नगरसेविकादेखील भाजपसोबतच आहे. सोबतच महानगर विकास समितीचा एक नगरसेवकही भाजपसोबतच असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### तर महापौर कोणाचा ?

■ विकास व एकाच विचारसरणीच्या मुद्द्यावर भाजप आणि शिवसेना (ठाकरे गट) दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याची शक्यता वाढली आहे. तेव्हा, महापौर भाजप की शिवसेनेचा की यामध्ये आणखी वेगळा ट्विस्ट येणार याकडे अकोलेकरांचे लक्ष लागून आहे.

# 'आरटीई' प्रवेश शाळा नोंदणीला मुदतवाढ

२७ जानेवारीपर्यंत नोंदणी व व्हेरिफिकेशन पूर्ण करण्याचे निर्देश

**अकोला/प्रतिनिधी**




शालेय शिक्षण विभागातर्फे शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत २५ टक्के आरक्षित जागांवरील प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत असून, सन २०२६ २७ या शैक्षणिक वर्षासाठी सुरू असलेल्या शाळा नोंदणी व व्हेरिफिकेशन प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. ठरवून दिलेल्या कालावधीत शाळांची १०० टक्के नोंदणी पूर्ण न झाल्याने आता २० ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत.

यापूर्वी आरटीई प्रवेशप्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात ९ ते १९ जानेवारी या कालावधीत विनाअनुदानित व स्वयं अर्थसाहाय्यित शाळांची नोंदणी व शाळा व्हेरिफिकेशनची कार्यवाही पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र अनेक ठिकाणी शाळा नोंदणी अपेक्षित प्रमाणात न झाल्याने तसेच काही शाळांकडून तांत्रिक व कागदपत्रांबाबत अडचणी व्यक्त करण्यात आल्याने शासनाने ही मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे संबंधित शाळांना दिलासा मिळाला आहे. आरटीई प्रवेशप्रक्रियेअंतर्गत दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील हजारो विद्यार्थ्यांना नामांकित खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची संधी मिळते. शिक्षण हक्क कायद्यानुसार खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये इयत्त पहिली किंवा पूर्वप्राथमिक स्तरावर २५ टक्के जागा आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे.

# हुंडीवाले हत्याकांडात दहा आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

**अकोला/प्रतिनिधी**

महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा प्रॉपर्टी ब्रोकर, व्यावसायिक किसनराव हुंडीवाले यांच्या खळबळजनक हत्याकांड प्रकरणाचा अंतिम निकाल बुधवार २१ जानेवारी रोजी जाहीर झाला. या प्रकरणात श्रीराम गावंडे यांच्यासह १० जणांना जन्मठेपेची शिक्षणा जिल्हा व सत्र न्यायालयाने ठोठावली आहे. या बहुचर्चित खटल्याच्या निकालामध्ये विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी बाजू मांडली.



किसनराव हुंडीवाले हे एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी ६ मे २०१९ रोजी धर्मदाय आयुक्त कार्यालयात आले होते. दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास त्यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात एकूण १५ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास प्रथम तत्कालीन पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे यांनी केला. त्यानंतर बालापूर येथील सोहेल शेख, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश माने पाटील तसेच पोलीस निरीक्षक रायटर उमेश पाटील यांनी पुढील तपास करत एक हजारांहून अधिक कागदपत्रांची आरोपपत्र (चार्जशीट) न्यायालयात दाखल केली होती. सुनावणीदरम्यान काही आरोपींच्या सहभागाबाबत कोणतेही ठोस व विश्वासार्ह पुरावे उपलब्ध नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांच्या विरोधातील आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत. या पार्श्वभूमीवर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी संबंधित आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती न्यायालयाकडे केली होती.

### रादेगो महाविद्यालयात आज 'बोलींचा जागर'

**अकोला :** स्थानिक श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयात गुरूवारी 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठी भाषेच्या विविध बोलींचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने तथा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाराष्ट्रातील विविध ३६ जिल्ह्यांमध्ये विद्यापीठस्तर आणि महाविद्यालयस्तरावर 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, जि. अमरावती आणि श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने 'बोलींचा जागर' या कार्यक्रमाचे आयोजन गुरूवार २२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या दरम्यान करण्यात आले आहे. 'बोलींचा जागर' या कार्यक्रमांतर्गत सकाळी ९ ते १० शोभायात्रा/ ग्रंथदिंडी आणि सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मुख्य कार्यक्रम अशा दोन सत्रात करण्यात आले आहे.

# आयुक्तांनी घेतला स्वच्छता विभागाचा आढावा

**अकोला/प्रतिनिधी**

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी अकोला महानगरपाकेच्या डॉ. बाबासाहेब मुख्य सभागृह येथे अकोला महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन होणाऱ्या स्वच्छतेच्या कामाचा आढावा १९ जानेवारी रोजी घेतला.

यावेळी मनपा आयुक्तांनी कचरा घंटा गाडी बाबत नाराजी व्यक्त केली, तसेच सर्व स्वच्छता निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरापर्यंत कचरा घंटा गाडी गेलीच पाहिजे याकडे विशेष लक्ष घालून नियोजनपूर्ण काम करणे, शहरातील कचरा संकलनाबाबत लावण्यात आलेले क्यू आर कोड स्कॅनिंग करणे, शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढण्यासाठी नाल्यांचे साचलेले पणीही जबाबदार असल्याने शहरातील सर्व नालींचे सांडपाणी वाहते करणे, कचरा घंटा गाडी व्यतिरिक्तखुली जागा, नाली, नाले, व वस्तीच्या परिसरात कचरा टाकणा-यांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. नागरिकांनी ओला व सुका कचरा वेग-वेगळा गोळा करून फक्त कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकण्याचे आवाहनही त्यांनी केले.

ज्या विभागातील जो अधिकारी वा कर्मचारी कामचुकारपणा करेल तर अशा संबंधित स्वच्छता निरीक्षकांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याबाबत यावेळी सांगितले. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजूरकर यांचेसह सर्व स्वच्छता निरीक्षकांची उपस्थिती होती.

# जिल्हा नियोजन समितीची उद्या सभा

पालकमंत्री फुंडकर घेणार विकासकामांचा आढावा

**अकोला/प्रतिनिधी**




गत अनेक दिवसांपासून रखडलेली जिल्हा नियोजन समितीची सभा शुक्रवार, २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील श्री छत्रपती सभागृह, नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेत समितीचे अध्यक्ष तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर उपस्थित सूचित या विषयांचा समावेश राहतील.

जिल्ह्यात विविध प्रकारची विकास कामे करण्यासाठी शासन जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देत असते. या निधीचे नियोजन, खर्च व वाटपाची जबाबदारी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती काम करते. नियोजन समितीची गत अनेक दिवसांपासून बैठक रखडली होती. त्यामुळे जिल्ह्यातील विकास कामांसाठी झालेला खर्च, वाटप व प्रशासकीय मान्यता देण्याची गती संथ होती.

दरम्यान जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवार, २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आयोजित करण्यात आली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, समितीचे सचिव तथा जिल्हाधिकारी वर्षा मीणा, सर्व आमदार, सर्व शासकीय यंत्रणांचे विभाग प्रमुख, वरिष्ठ अधिकारी व जिल्हा नियोजन अधिकारी राजेंद्र सोनखासकर व सहायक जिल्हा नियोजन अधिकारी कैलाश देशमुख उपस्थित राहतील. याबाबतची नोटीस सर्व शासकीय यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना जारी करण्यात आली आहे.

अखेर पूर्णविराम ; वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू

# तब्बल ८ वर्षांनी सापडला हरवलेला लेक

**अकोला/प्रतिनिधी**

पोलिस स्टेशन खदान, अकोला येथे दाखल असलेल्या बेपत्ता मुलाचा तब्बल ८ वर्षांनंतर शोध घेऊन त्यास वडिलांच्या ताब्यात देण्यात पोलिस प्रशासनाला यश आले आहे. लेक सापडल्याने वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू झळकत होते.

६ जानेवारी २०१८ रोजी फिर्यादी सुधाकर रामकृष्ण बोदडे (वय ४०), रा. तुळजाभवानी कटलरीचे वर, बुद्ध विहाराजवळ, खडकी, अकोला यांनी पोलिस स्टेशन खदान येथे तक्रार दिली होती. त्यांच्या पत्नी सौ. वैशाली सुधाकर बोदडे (वय ३०) या दोन मुले यश सुधाकर बोदडे (वय १४)




व जय सुधाकर बोदडे (वय १२) यांच्यासह घरातून निघून गेल्याची नोंद करण्यात आली होती. या तक्रारीवरून पोलीस स्टेशन खदान येथे मिसिंग क्रमांक ६४ / २०१८ अन्वये बेपत्ता नोंद करण्यात आली होती. पोलीस अधीक्षक अकोला यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन मुस्कान अंतर्गत पोलीस स्टेशन खदान येथील मिसिंग व डी. बी. पथकाला बेपत्ता इसमांचा शोध घेण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. अखेर पोलिसांना यश आले अन् हरवलेल्या मुलाचा शोध घेत त्याला सुरक्षितपणे त्याचे वडील सुधाकर रामकृष्ण बोदडे, रा. अकोला यांच्या ताब्यात देण्यात आले. आठ वर्षांनंतर मुलगा मिळाल्याने कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानले.

### हिमाचल प्रदेशात सापडला बेपत्ता मुलगा

■ तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे हिमाचल प्रदेश राज्यातील जिल्हा शिमला अंतर्गत रामपूर बुशहर (ज्युरी) येथील स्थानिक पोलिसांच्या मदतीने बेपत्ता मुलगा जय सुधाकर बोदडे (वय १९) याचा शोध घेण्यात आला.

# सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीवर जि.प.निवडणुकीचे भवितव्य

**अकोला/प्रतिनिधी**

राज्यातील २२ जिल्हा परिषदांचे राजकीय आरक्षण ५० टक्क्यांवर गेले आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने संबंधित २२ जिल्हा परिषदांना वगळून इतर १२ जिल्हा परिषदांसह १२५ पंचायत समितींसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. दरम्यान आरक्षणाच्या मुद्यावर बुधवार, २१ रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणीकडे इच्छुकांच्या नजरा लागल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेविषयी निर्माण झालेल्या गोंधळामुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला विलंब झाला. ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे आरक्षणाची ५० टक्क्यांची कमाल मर्यादा ओलांडली गेल्याचा आरोप करीत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या प्रकरणी पार पडलेल्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला कोणत्याही स्थितीत आरक्षणाची कमाल मर्यादा पाळण्याचे निर्देश दिले होते. दरम्यान अकोला जिल्हा परिषद आरक्षणाची टक्केवारी ५९ वर पोहोचल्याने इच्छुकांच्या नजरा पुढील प्रक्रियेकडे लागल्या होत्या. परंतु निवडणूक आयोगाकडून ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या १२ जिल्हा परिषदेची निवडणूक जाहीर करण्यात आली. निवडणूक जाहीर करण्यात आलेल्या जि. प.त अकोला जि.प.चा समावेश नसल्याने इच्छुकांचा हिरमोड झाला आहे. दरम्यान आरक्षणाच्या मुद्यावर निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालय काय भूमिका घेते याकडे आता इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

### असे आहे वाटलेले राजकीय आरक्षण

■ जिल्हा परिषदेत ५२ सर्कल आहेत. त्यापैकी १२ एससी, ५ एसटी, १४ ओबीसींसाठी राखीव आहेत. उर्वरित जागा या सर्वसाधारणसाठी आहेत. पंचायत समिती अकोला, अकोट व मूर्तिजापूरमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० टक्के पेक्षा जास्त आहे. अकोला पं. स. मध्ये एकूण २० जागांपैकी एससी- ५, एसटी- २ व ओबीसींसाठी ५ जागा राखीव आहेत. आकोटमधील १६ जागांपैकी एससी-३, एसटी-२ व ओबीसीसाठी ३ जागा राखीव आहेत. मूर्तिजापूरमध्ये १४ जागा असून, यापैकी एससी-५, एसटी- १ आणि तीन जागा ओबीसीसाठी आरक्षित आहेत. संबंधित तिन्ही पंचायत समितीचे आरक्षण अनुक्रमे ६०, ६४.२८ व ५६.२५ टक्के अधिक झाले आहे.

## न्यूज ब्रीफ

### नगरसेविकेच्या पुत्राची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत झेप

**खामगाव :** नगरसेविका रूपाली मुळीक यांचे पुत्र वैभव (साहिल) यांनी राज्यस्तरीय शालेय क्रीडा लाठीकाठी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले आहे. भंडारा येथे आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत वैभव (साहिल) यांनी आपल्या कौशल्यपूर्ण खेळाचे दर्शन घडवत परीक्षक व प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेदरम्यान वैभव (साहिल) यांनी शिस्तबद्ध सराव, वेगवान हालचाली व अचूक तंत्राचा उत्तम समन्वय साधत प्रभावी कामगिरी केली. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची राज्यस्तरीय संघात निवड करण्यात आली आहे. ही निवड त्यांच्या मेहनतीचे, सातत्याचे आणि क्रीडाप्रती असलेल्या निष्ठेचे फलित असल्याचे क्रीडाप्रेमींनी मत व्यक्त केले. यशामुळे शहराच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात गौरवाची भर पडली आहे.

### नाकाबंदीत साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त

**खामगाव :** ग्रामीण पोलिसांनी अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध ठोस कारवाई करत पारखेड फाटा येथे २० जानेवारी रोजी बेकायदेशीररीत्या वाहतूक होणाऱ्या ७,३४,०८० रुपयांचा पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला. गुप्त माहितीच्या आधारे २० जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता पोलिसांनी पारखेड फाटा येथे नाकाबंदी केली. पोलिसांनी संशयास्पद कार क्र.एमएच-२८-बीजी-६५७० थांबवली. तपासणी दरम्यान कारमधून हजारो पॅकिंगमधील केसरयुक्त पान मसाला व मोठ्या प्रमाणात सुगंधित तंबाखू आढळून आले. वाहतूक बेकायदेशीर असल्याचे निष्पन्न झाल्याने खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. या कारवाईत दिनेश नथ्थाणी (४२), रा. सिंधी कॉलनी, खामगाव व तेजस झांबड (४३) रा. अनिकट रोड, खामगाव हे दोघे सध्या पोलीस कोठडीत आहेत. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ७,३४,०८० रुपये आहे.

## सभापती व उपसभापती पदांवर युतीच्या उमेदवारांची निवड

# नगरपरिषद विषय समित्यांवर भाजप- शिंदे शिवसेनेचे वर्चस्व

शेगावप्रतिनिधी

नगरपरिषद विषय समित्यांची निवडणुका २० जानेवारी रोजी शांततेत पार पडली. सभापती व उपसभापती पदांवर युतीच्या उमेदवारांची निवड झाली असून विषय समित्यांवर भाजप- शिंदे शिवसेनेचे वर्चस्व राहिले. बांधकाम समितीच्या सभापतीपदी अंकुश देशमुख यांची निवड करण्यात आली. शहरातील रस्ते, गटारी, इमारती तसेच मूलभूत पायाभूत सुविधा विकासाच्या दृष्टीने बांधकाम समिती महत्त्वाची मानली जाते.

पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी पवन महाराज शर्मा यांची निवड झाली असून शहरातील पाणीटंचाई पाणी वितरण व्यवस्था व भविष्यातील जलनियोजन यासंदर्भातील जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. शिक्षण समितीच्या सभापतीपदी सोनू उर्फ रमेश मोहोड यांची निवड करण्यात आली. नगरपरिषद शाळांची शैक्षणिक



गुणवत्ता विद्यार्थ्यांच्या सुविधा तसेच शालेय विकासाच्या दृष्टीने शिक्षण समितीची भूमिका महत्त्वाची असते.

आरोग्य समितीच्या सभापतीपदी आकाश नावकार यांची निवड झाली असून शहरातील स्वच्छता आरोग्य सेवा, प्रतिबंधात्मक उपाययोजना याकडे विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी सुचिता संदीप काळे यांची निवड झाली. महिलांचे प्रश्न, बालकल्याण योजना तसेच सामाजिक उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी ही समिती महत्त्वाची आहे. या समितीच्या उपसभापतीपदी पूजा सचिन खानापुरे यांची निवड करण्यात आली. नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी वैशाली प्रमोद सूळ यांची निवड झाली असून त्या नगरपरिषद उपाध्यक्ष असल्याने त्या पदसिद्ध सभापती म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. शहराच्या दीर्घकालीन विकास आराखड्याच्यादृष्टीने नियोजन व विकास समिती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. स्थायी समितीच्या सभापतीपदी नगराध्यक्ष प्रकाश एकनाथ शेगोकार हे पदसिद्ध सभापती म्हणून कार्यरत राहणार आहेत. नगरपरिषदेतील आर्थिक निर्णय, विकासकामांना मंजुरी व धोरणात्मक निर्णयांमध्ये स्थायी समितीची भूमिका केंद्रस्थानी असते. या निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शेगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी जयश्री काटकर यांनी निवडणुकीचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक त्या प्रशासकीय उपाययोजना केल्या. विषय समित्यांच्या निवडणुकीनंतर आता शेगाव शहराच्या विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून सत्ताधारी भाजपासेना युतीकडून समन्वयाने कारभार केला जाईल असा विश्वास नगरसेवकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### नांदुरा विषय समिती सभापतींची निवड

**नांदुरा :** नवनिर्वाचित नगरसेवकांची विशेष बैठक २० जानेवारी रोजी नगर परिषदेच्या सभागृहात उत्साहात पार पडली. विविध विषय समित्यांची स्थापना करून सभापतींची निवड करण्यात आली. नगराध्यक्ष मंगला मुरेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी रामसिंग रमेशसिंग ठाकुर यांची निवड करण्यात आली. पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापतीपदी विमलबाई राजाराम वानखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्वच्छता व आरोग्य समितीच्या सभापतीपदी निखात कौसर शेख अनवर यांची निवड करण्यात आली.
महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी नगर परिषदेच्या उपाध्यक्ष माधुरी प्रमोद खोंड यांची तर उपसभापतीपदी अर्चना संदीप तळोले यांची निवड करण्यात आली. शिक्षण समितीच्या सभापतीपदी श्रद्धा पवन खैरे तर नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी भावना उमेश इंगळे यांची निवड करण्यात आली. नवनियुक्त सभापतींकडून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक व लोकाभिमुख काम होईल, अशी अपेक्षा यावेळी नगरसेवकांसह नागरिकांनी व्यक्त केली.

# पूर्णा नदीत पंपिंग मशीनद्वारे वाळूचा उपसा

## समाजवादी पार्टीचे तहसिलसमोर 'डफडे बजाव'



नांदुरा/प्रतिनिधी

पूर्णा नदीत पंपिंग मशिनद्वारे सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाविरोधात समाजवादी पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. समाजवादी पार्टीचे नेते आझाद खान यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, २० जानेवारी रोजी तहसील कार्यालयासमोर डफडे बजाव आंदोलन करून प्रशासनाचा निषेध करण्यात आला.

तालुक्यातील पलसोडा, बेलाड आणि रोटी येथील रेती घाटांवर नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचा आरोप आझाद खान यांनी केला. या घाटांवर अवैधरीत्या वाळू उपसा सुरू असून यामुळे नदीपात्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. आंदोलनानंतर तहसीलदारांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

आझाद खान यांनी सांगितले की, पूर्णा नदीत मोठ्या प्रमाणात अवैध वाळू तस्करी सुरू आहे. जिल्ह्यातील जवळपास सर्वच रेती घाटांचे लिलाव झालेले असले तरी शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार लिलावधारकांना वाळू घाटात पंपिंग मशीनचा वापर करण्यास मनाई आहे. असे असतानाही काही लिलावधारकांनी प्रशासनाच्या आदेशांना न जुमानता थेट नदीपात्रात पंपिंग मशीन बसवून सर्रास वाळू उपसा सुरू केला आहे. याबाबत समाजवादी पार्टीच्या वतीने यापूर्वी अनेक वेळा प्रशासनाला निवेदने देण्यात आली. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर डफडे बजाव आंदोलन केले.

# शिक्षक शेखर खोमने यांचा मुंबईत सन्मान

## जिल्हा परिषद हायस्कूलच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर

पिंपळगाव राजा/प्रतिनिधी

येथील पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक शेखर खोमने यांचा मुंबईमधील 'बी द चेंज' फाउंडेशनच्यावतीने १८ जानेवारी रोजी विशेष सन्मान करण्यात आला.

पनवेल येथे झालेल्या बूट कॅम्प प्रशिक्षणात इंग्रजी विषयातील प्रभावी सादरीकरण तसेच सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका खामगाव येथे आयोजित एक हजार नाणी व नोटांचे भव्य प्रदर्शन या दोन अभिनव उपक्रमांमुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात



आली. नाशिक येथील सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष अरुण भंडारे आणि अभिनेत्री निवेदिता पगारे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील १०० उपक्रमशील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानामुळे शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेतील नाविन्यपूर्ण उपक्रमांना मिळालेली ही पावती शैक्षणिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे. शेखर खोमने यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शाळेतून आदर्श विद्यार्थी घडावेत या उद्देशाने सातत्याने कार्य केले. शाळेला पीएम श्री दर्जा मिळवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचेच हे फलित असून या यशात विद्यार्थी व शिक्षक वर्गाचा मोठा वाटा आहे.

### चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

**नांदुरा :** महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबईच्यावतीने घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत निमगाव येथील शेवंताबाई काशीराम कळसकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. एलिमेंटरी चित्रकला परीक्षेत शाळेच्या एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून यश मिळविले. तर इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत तृप्ती नारायण आवारकर व ज्ञानेश्वरी श्रीकृष्ण काटे या विद्यार्थिनींनी बी ग्रेड मिळवून उत्तीर्ण होत कला क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली. या यशामुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडली आहे.या यशाबद्दल मुख्याध्यापिका उषा बेंडे, कलाशिक्षक सचिन भोपळे, गोपाल ढगे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# युवा सप्ताहात व्यक्तिमत्व विकासावर भर

## धामणगाव बढे येथील राजे छत्रपती कला महाविद्यालयात रासेयोचा उपक्रम

मोताळा/प्रतिनिधी

धामणगाव बढे येथील छत्रपती कला महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे १२ ते १९ जानेवारी दरम्यान युवा सप्ताह साजरा करण्यात आला. युवक प्रबोधन व व्यक्तिमत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. भगवान गरुडे व प्रा. शशिकांत शिरसाट यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे महत्त्व पटवून दिले. प्राचार्य डॉ. अविनाश मेश्राम यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. संचालन महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा.डॉ. शहादा नसरीन यांनी केले. या सप्ताहामध्ये



महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. १७ जानेवारी रोजी तत्त्वज्ञान विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये 'ध्यानाचे महत्त्व 'या विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. महादेव रिठे यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. याप्रसंगी तत्त्वज्ञान विभागप्रमुख तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. विजय मोरे यांनी सुद्धा योगाचे महत्त्व व आवश्यकता विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्राचार्य डॉ. अविनाश मेश्राम यांनी योग व आरोग्य यावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये रासेयो महिला अधिकारी कामिनी मामर्डे कार्यक्रमाधिकारी डॉ. स्वप्नील दांदडे व प्राध्यापकांनी सहकार्य केले. या याप्रसंगी स्वयंसेवक उपस्थित होते.

# मराठा पाटील सेवा समितीच्या सोयरीक पुस्तिकेचे विमोचन

जळगांव जामोद/प्रतिनिधी

मराठा पाटील सेवा समितीच्यावतीने समाजातील विवाह योग्य वधू-वरांची माहिती एकत्रित करणाऱ्या 'लगीनगाठ' वधू-वर परिचय पुस्तिकेचा विमोचन सोहळा १९ जानेवारी रोजी पार पडला. हभप तुकाराम महाराज सखारामपूरकर यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

यावेळी आशीर्वादपर भाषणात तुकाराम महाराज यांनी 'लगीनगाठ' ही सोयरीक पुस्तिका समाजासाठी अत्यंत उपयुक्त असून विवाह जुळविताना येणाऱ्या अनेक अडचणी दूर करण्यास मदत करणारी असल्याचे प्रतिपादन केले. समाजातील



विवाहयोग्य वधू-वरांची माहिती एका ठिकाणी उपलब्ध होत असल्याने वेळ खर्च व गैरसमज टळतात. त्यामुळे समाजातील प्रत्येकाने या सोयरीक पुस्तिकेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. मंचावर माजी जि.प अध्यक्ष प्रकाश पाटील, माजी जि.प.उपाध्यक्ष संगीतराव भोंगळ, शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता पाटील, अभय मारोडे, भीमराव पाटील यांच्यासह मराठा पाटील सेवा समितीचे अध्यक्ष ॲड. भाऊराव भालेराव, कार्याध्यक्ष कैलाश कडाळे, उपाध्यक्ष नाना पाटील, सचिव श्रीकृष्ण काळे, संग्रामपूर तालुकाध्यक्ष संजय खोंड, शेगाव तालुकाध्यक्ष वैभव दाभाडे, जळगाव तालुकाध्यक्ष रवी पाचपोर उपस्थित होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत महिला ठार

## उड्डाण पुलावरील घटना; अपघातानंतर चालक फरार

शेगाव/प्रतिनिधी

येथील उड्डाण पुलावर अज्ञात वाहनाच्या धडकेत ५८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी सकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास घडली. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

बाळापूर (जि. अकोला) येथील ताईबाई सुरेश कळसकार (वय ५८) या खलवाडी परिसरात वास्तव्यास असलेल्या आपल्या मुलीस भेटण्यासाठी आल्या होत्या. भेटीनंतर आज सकाळी त्या परत बाळापूरकडे जाण्यासाठी बसस्थानकाच्या दिशेने पायी निघाल्या होत्या. उड्डाण पुलावरून जात असताना मागून आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. या धडकेत त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर वाहनचालकाने कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पळ काढल्याने नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी मृत महिलेचे जावई श्रीकृष्ण वानखेडे यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रामदास गट्टे करीत आहेत. फरार वाहनचालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, या अपघाती मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून शेगाव उड्डाण पुलावरील वाहतूक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. उड्डाण पुलावर वेग मर्यादा, पादचारी सुरक्षेसाठी उपाययोजना तसेच नियमित पोलीस बंदोबस्ताची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ट्रकची कारला धडक; एक ठार

## ट्रक चालकाविरुध्द गुन्हा दाखल

खामगाव/प्रतिनिधी

भरधाव ट्रकने कारला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना १९ जानेवारी रोजी बाळापूर रोडवर घडली. अपघातानंतर मदत न करता ट्रक चालकाने घटनास्थळावरून पळ काढल्याने संताप व्यक्त होत आहे.

येथील अब्दुल करीम अब्दुल रज्जाक (५२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १९ जानेवारी रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास बाळापुर रोडवरील सुदर्शन धाब्याजवळ हा अपघात घडला.

फिर्यादी मित्रांसह एमएच०४-केडब्ल्यु-७५५२ क्रमांकाच्या कारने जेवणासाठी जात होते. ट्रक क्रमांक जीजे-१३-एटी-८७७७ च्या चालकाने बेदरकारपणे वाहन चालवत कारला धडक दिली. या भीषण धडकेत एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातात कारचे नुकसान झाले. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्री संत गजानन महाराज इंग्लिश स्कूलमध्ये सेमिनार

# संतनगरीत विद्यार्थ्यांना कायदा अन् सामाजिक जागृतीचे धडे

शेगाव/प्रतिनिधी

शहरातील श्री संत गजानन महाराज इंग्लिश स्कूलमध्ये 'कायदे आणि सामाजिक जागृती' या विषयावर सेमिनार घेण्यात आला. सेमिनारमध्ये ६०० विद्यार्थी सहभागी झाले.

आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांना आधुनिक समाजातील कायदे, अधिकार आणि सामाजिक जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन मिळाले. ठाणेदार निमिष मेहेत्रे प्रमुख वक्ते होते. न्यायिक प्रशिक्षणार्थी विद्यार्थी सुदर्शन धोंगडे, धवल जोशी, कुणाल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एक मैलाचा दगड ठरला. शाळेच्या



मुख्याध्यापिका अंजली पाटील आणि इतर मान्यवर यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून वातावरण उत्साही बनवले.

निमिष मेहेत्रे यांनी 'कायदेशीर अधिकार आणि कर्तव्ये' या विषयावर बोलताना भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, बालकांचे अधिकार, शिक्षणाचा हक्क आणि प्रत्येक नागरिकाची जबाबदारी यावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करताना सांगितले, 'तुमचे अधिकार जाणून घ्या, पण कर्तव्येही पार पाडा. आज तुम्ही जागरूक झालात, तर उद्या तुम्ही समाजाचे जबाबदार नागरिक बनाल.' त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि भविष्यासाठी नवीन दृष्टीकोन मिळाला. धवल जोशी यांनी 'लिंग समानता, बालकांचे कायदेशीर अधिकार आणि संरक्षण' या विषयावर भाष्य केले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यासाठी प्रेरित करताना लिंग समानता ही केवळ संकल्पना नाही तर प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील वर्तन आहे. कुणाल जाधव यांनी सामाजिक जागृती, नार्कोटिक्स आणि ड्रग्स या विषयावर सेमिनार घेतला.

### मानधनासाठी कोद्री ग्रामपंचायतीची टाळाटाळ

**संग्रामपूर :** तालुक्यातील कोद्री ग्रामपंचायतीत पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याच्या निधनानंतर त्याच्या जागी प्रत्यक्ष काम पाहणाऱ्या वडिलांना तसेच मयत कर्मचाऱ्याचे थकीत मानधन देण्यास ग्रामपंचायतीकडून टाळाटाळ होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मानधन न दिल्यास २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी ग्रामपंचायत कार्यालयात झेंडावंदनावेळी आत्मदहन करण्याचा इशारा संबंधितांनी निवेदनातून दिला आहे. याबाबत महादेव मोतीराम खोंड यांनी २० जानेवारी रोजी गटविकास अधिकारी संग्रामपूर यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे त्यांचा मुलगा योगेश महादेव खोंड याची सन २०२० मध्ये कोद्री ग्रामपंचायतीत पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून मासिक ७ हजार ५०० रुपये मानधनावर नेमणूक करण्यात आली होती.

# क्रुझरची ऑटोरिक्षाला धडक; सात मजूर महिला गंभीर

## नांदुरा- मोताळा मार्गावरील घटना, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

नांदुरा/प्रतिनिधी

भरधाव क्रूझरने धडक दिल्याने ऑटोरिक्षातील सात मजूर महिला गंभीर जखमी झाल्याची घटना २० जानेवारी रोजी नांदुरा- मोताळा मार्गावर घडली. अपघातात ऑटोरिक्षाचेही नुकसान झाले.

मजूर महिलांना घेऊन जाणारा ऑटो राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील पुलाखालून नांदुरा- मोताळा मार्गाने जात होता. समोरून भरधाव वेगात येणाऱ्या क्रुझर क्रमांक एमएच-२०-सीएच-५४०३ ने ऑटोला जोरदार धडक दिली. धडक लागताच ऑटोरिक्षा रस्त्यावरच पलटी झाला. या अपघातामुळे ऑटोमध्ये बसलेल्या सातही महिला मजूर गंभीर जखमी झाल्या. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ




उडाल्याने स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी महिलांना रिक्षाबाहेर काढून उपचारासाठी दाखल करण्यात आले.

तसेच ऑटोरिक्षाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नांदुरा- मोताळा मार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या रस्त्यावरून जाणारे येणारे अनेक वाहनचालक वेगाच्या मर्यादेचे उल्लंघन करतात. त्यामुळे सातत्याने या रस्त्यावर अपघात घडतात. आजच्या अपघातात जखमी झालेल्या महिला मजूर असून कष्टकरी कुटुंबातील असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. संबंधितावर कठोर कारवाईची मागणी होत आहे. या प्रकरणी ऑटोचालक प्रताप कावरे यांनी नांदुरा पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी क्रुझर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार सोळंके करत आहेत.

दैनिक महाभूमि

# वाशिम भूमि

गुरुवार,२२ जानेवारी २०२६

dainikmahabhoomi@gmail.com


## न्यूज ब्रीफ

### संजय भुजाडे यांना समाज भूषण पुरस्कार



**मानोरा :** तालुक्यातील शिवाजीनगर धामणी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सहारा मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय भुजाडे यांना वैदर्भीय चॅरिटेबल ट्रस्ट, कारंजा यांच्या वतीने देण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार १८ जानेवारी रोजी कारंजा येथील महेश भवन येथे आयोजित समारंभात आमदार सई डहाके, ट्रस्टच्या अध्यक्षा पूनम पवार, सचिव एकनाथ पवार आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्याच्या माध्यमातून गरजू घटकांसाठी सातत्याने केलेल्या योगदानाची दखल घेत संजय भुजाडे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या सन्मानामुळे मानोरा तालुक्यासह परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### राष्ट्रीय मतदार दिनी सायकल रॅली

**वाशिम :** मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार १६ वा राष्ट्रीय मतदार दिन २५ जानेवारी २०२६ रोजी साजरा करण्यात येणार आहे. यावर्षीच्या राष्ट्रीय मतदार दिनासाठी निवडणूक आयोगाने माय इंडिया माय वोट ही संकल्पना निश्चित केली आहे. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या वतीने वाशिम येथे विशेष सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली सकाळी ९.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून सुरू होणार आहे. या सायकल रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदार नोंदणी, मतदानाचा हक्क व लोकशाहीतील सहभागाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील नागरिक, अधिकारी व कर्मचारी यांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी धनाजी तोरसकर यांनी केले आहे.

स्मार्ट मीटरमुळे अचूक बिलिंग, तक्रारमुक्त सेवा आणि वीज बचतीचा लाभ

# अकोला परिमंडळात २.५८ लाख स्मार्ट मीटर कार्यान्वित

**वाशिम / प्रतिनिधी**

अकोला महावितरण परिमंडळात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित २ लाख ५८ हजार ७५ स्मार्ट (टिओडी) मीटर यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात आले असून, त्यामुळे वीज बिलिंग अधिक अचूक, पारदर्शक आणि तक्रारमुक्त होत आहे.

स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना दर तासाला वापराची माहिती मोबाईलवर उपलब्ध होत असल्याने वीज वापरावर थेट नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. महावितरणकडून 'डिजिटल इंडिया' व 'ईज ऑफ लिव्हिंग' संकल्पनेनुसार वीज ग्राहकांना अचूक व वेळेत बिल देण्यासाठी स्मार्ट (टिओडी) मीटर बसविण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. या मीटरद्वारे स्वयंचलित पद्धतीने मीटर वाचन होत असल्याने सरासरी वीज बिल, मीटर रिडिंग न झाल्याच्या तक्रारी तसेच चुकीच्या बिलिंगच्या समस्या पूर्णतः बंद होणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. अकोला परिमंडळातील अकोला, बुलढाणा व वाशिम या तीन जिल्ह्यांत (कृषी ग्राहक वगळून) सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट (टिओडी) मीटर बसविण्यात येत आहेत. ही कामगिरी जीनस कंपनीच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आली असून, पुढील कालावधीत उर्वरित ग्राहकांनाही स्मार्ट मीटर बसविण्यात येणार असल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली आहे.दरम्यान, स्मार्ट (टिओडी) मीटरमुळे वीज ग्राहकांना तासागणिक वीज वापराची अचूक माहिती उपलब्ध होत असल्याने अनावश्यक वीज वापर टाळणे शक्य होत आहे. यामुळे वीज बचतीला चालना मिळून ग्राहकांच्या मासिक वीज बिलातही घट होण्यास मदत होत आहे. विशेष म्हणजे, स्मार्ट मीटरच्या माध्यमातून मीटर रिडिंगसाठी कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत नसल्याने मानवी त्रुटीला पूर्णविराम मिळणार आहे. महावितरणकडून घरगुती वीज ग्राहकांना स्मार्ट (टिओडी) मीटरच्या आधारे दिवसा वीज वापरावर ठराविक सवलत देण्यात येत असून, मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी स्मार्ट (टिओडी) मीटर असणे आवश्यक असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.



### कोणत्या जिल्ह्यात किती स्मार्ट मीटर

| | |
|---|---|
| अकोला जिल्हा | ८०,६७१ मीटर |
| बुलढाणा जिल्हा | १,३०,४२५ मीटर |
| वाशिम जिल्हा | ४६,९७९ मीटर |

### स्मार्ट मीटरमुळे दिवसा वीज वापरावर सवलत

■ महावितरणकडून राज्यातील घरगुती वीज ग्राहकांना स्मार्ट (टिओडी) मीटरच्या माध्यमातून दिवसाच्या वीज वापरावर प्रतियुनिट ८० पैसे ते १ रुपयापर्यंत सवलत देण्यात येत आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पुढील पाच वर्षांसाठी निश्चित केलेल्या वीज दरानुसार १ जुलै २०२५ पासून टिओडी सवलतीचे दर लागू करण्यात आले आहेत. ही सवलत मिळविण्यासाठी स्मार्ट (टिओडी) मीटर असणे अनिवार्य असून, त्यामुळे वीज ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण अकोला परिमंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर ठरताहेत फायदेशीर

■ स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना तासागणिक वीज वापराची माहिती, अचूक आणि वेळेत वीजबिल चुकीच्या बिलिंगच्या तक्रारींपासून मुक्ती,दिवसा वीज वापरात आर्थिक बचत, असे अनेक फायदे मिळत असून, एकूणच वीज सेवा अधिक विश्वासार्ह आणि ग्राहकाभिमुख होत असल्याचे महावितरणने नमूद केले आहे.

## दुग्धविकास प्रकल्पातून अनुदानावर जनावरे व यंत्रसामग्री

वाशिम जिल्ह्यात दुग्धविकास प्रकल्प टप्पा२ लागू



**वाशिम / प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील पशुपालकांचे उत्पन्न वाढवून त्यांची आर्थिक उन्नती साधण्यासाठी पशुसंवर्धन विभाग, वाशिम अंतर्गत दुग्धविकास प्रकल्प टप्पा२ राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा प्रकल्प सन २०२४२५ ते २०२६२७ या कालावधीत राबविण्यात येणार असून, यामध्ये वाशिम जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे.

या प्रकल्पांतर्गत दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी पशुपालकांना विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. पात्र पशुपालकांना अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येणार असून, दुग्ध उत्पादन वाढीसह पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. जिल्हा उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय) डॉ. तुषार बावणे यांनी जिल्ह्यातील पशुपालक व शेतकऱ्यांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

योजनेच्या अटी व शर्ती तसेच सविस्तर माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून, इच्छुक पशुपालकांनी वेळेत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### दुग्धविकास प्रकल्प : काय काय मिळणार ?

| प्रमुख घटक | अनुदान |
|---|---|
| गाय/म्हैस | ५० टक्के |
| गाभण कालवड | ७५ टक्के |
| प्रजनन खाद्य | २५ टक्के |
| फॅट एसएनएफ खाद्य | २५ टक्के |
| कडबा कुट्टी यंत्र | ५० टक्के |
| चार पिकांचे ठोंबे | १०० टक्के |
| मुरघास | २५ टक्के |

## अश्रुविरहित कांदा कापणारे यंत्र ठरले आकर्षण

विज्ञान प्रदर्शनीसाठी कृष्णाई गाढवेची निवड

**कारंजा/ प्रतिनिधी**



कांदा कापताना डोळ्यांतून पाणी येण्यामागे थायोप्रोपेनल सल्फऑक्साईड हा वायू कारणीभूत असतो. हा वायू डोळ्यांतील पाण्याशी संपर्कात आल्यावर जळजळ होऊन अश्रू निर्माण होतात. याच वैज्ञानिक तत्त्वावर आधारित उपाय मांडणारा टीयरलेस ओनियन चॉपर (अश्रुविरहित कांदा कापणारे यंत्र) हा अभिनव विज्ञान प्रकल्प वाशिम जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत विशेष आकर्षण ठरला असून, या प्रकल्पाची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीसाठी निवड झाली आहे.

१५ व १६ जानेवारी रोजी श्री ज्ञानेश्वर माऊली विद्यालय व श्री मनोहरराव नाईक विज्ञान महाविद्यालय कोंडाळा महाली येथे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी पार पडली. या प्रदर्शनीत पी.एम. श्री जिल्हा परिषद विद्यालय, कामरगाव येथील इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी कृष्णाई गाढवे हिने सादर केलेल्या प्रकल्पाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्वयंपाकघरातील रोजची पण गंभीर समस्या असलेल्या कांदा कापताना होणाऱ्या डोळ्यांची जळजळ, चुरचुर व पाणी येणे विशेषतः मोठ्या प्रमाणावर कांदे कापताना माता-भगिनींना होणारा त्रास यावर या प्रकल्पात प्रभावी उपाय सुचवण्यात आला आहे. कांदा कापताना बाहेर पडणारा थायोप्रोपेनल सल्फऑक्साईड वायू डोळ्यांपर्यंत पोहोचू नये, यासाठी या चॉपरमध्ये दोन लहान विद्युत पंख्यांचा वापर करण्यात आला आहे. पंखे सुरू होताच तयार होणारा वायू त्वरित बाहेर खेचला जातो, त्यामुळे डोळ्यांत पाणी येत नाही. साधी रचना, कमी खर्चिक साहित्य आणि प्रभावी कार्यक्षमता ही या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. प्रदर्शनीदरम्यान शिक्षणाधिकारी संजय ससाने यांनी मॉडेलला भेट देऊन कृष्णाई गाढवेच्या कल्पकतेचे, वैज्ञानिक समजुतीचे व सादरीकरण कौशल्याचे कौतुक केले.

**किन्हीराजा येथील यात्रा उत्सवात गर्दी**



**मालेगाव :** किन्हीराजा येथील श्री संत सखुमाता देवी संस्थान येथे २० जानेवारी रोजी यात्रा महोत्सवास प्रारंभ झाला. देवीच्या दर्शनासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यात्रेनिमित्त शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच विविध खरेदीसाठी उभारण्यात आलेल्या स्टॉल्स व दुकानदारांकडे नागरिकांची झुंबड उडाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

## १६ वर्षीय बालिकेचा बालविवाह वेळेत रोखला

**रिसोड/ प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्राम हराळ येथे होऊ घातलेला १६ वर्षीय बालिकेचा बालविवाह चाईल्ड लाईन १०९८च्या सतर्कतेमुळे वेळेत रोखण्यात आला. बालविवाहाबाबत चाईल्ड लाईनच्या टोल फ्री क्रमांकावर गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर संबंधित बालिकेच्या वयाची तात्काळ खातरजमा करण्यात आली.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथकाची स्थापना करण्यात आली. चाईल्ड लाईन प्रकल्प समन्वयक अविनाश सोनुने यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने घटनास्थळी भेट देऊन बालिका व तिच्या पालकांचे समुपदेशन केले. बालविवाहाचे कायदेशीर परिणाम, आरोग्यविषयक धोके तसेच मुलीच्या भवितव्यावर होणारे दुष्परिणाम यांची सविस्तर माहिती देण्यात आली. समुपदेशनानंतर बालिकेचे वय १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत विवाह करणार नाही, असे पालकांकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले.

### वाशिमने सलग तिसऱ्यांदा पटकावला क्रीडा चषक

**वाशिम :** जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवात सरस कामगिरी करत वाशिम पंचायत समितीने सलग तिसऱ्यांदा क्रीडा चषक (जनरल चॅम्पियन) पटकावला. या यशामुळे वाशिम पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासन आधार देणार : ॲड. हेलोंडे

**मानोरा/ प्रतिनिधी**

तालुक्यातील इंझोरी येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तातडीने व वेळेत मिळवून देण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश पाटील हेलोंडे यांनी दिले. सोमवारी त्यांनी संबंधित कुटुंबांना प्रत्यक्ष भेट देऊन सांत्वन केले.

इंझोरी येथील डिगांबर गजानन इंगळे व शाम तुळशीराम शिंदे या शेतकऱ्यांनी काही वर्षांपूर्वी नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली होती. या पार्श्वभूमीवर ॲड. हेलोंडे यांनी त्यांच्या कुटुंबीयांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी घरी जाऊन भेट दिली. यावेळी स्व. शाम शिंदे यांच्या पत्नी संगीता शिंदे व त्यांची मुले, तसेच स्व. डिगांबर इंगळे यांच्या पत्नी शितल इंगळे व त्यांच्या मुलांशी त्यांनी सविस्तर संवाद साधला. कुटुंबाचा उदरनिर्वाह, आर्थिक परिस्थिती व मुलांच्या शिक्षणाबाबत त्यांनी विचारपूस केली. या दौऱ्याप्रसंगी प्रभारी तहसीलदार उमेश बनसोड, गटविकास अधिकारी सुधाकर जाधव, तालुका महिला व बालकल्याण अधिकारी अनुप कदम, तालुका कृषी अधिकारी उमेश राठोड, ग्रामविकास अधिकारी सुरेश चव्हाण, सरपंच मनीषा दिघडे, हिम्मत राऊत उपस्थित होते.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर : जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाची पाहणी

## आरोग्य सेवेत तडजोड नाही ; रुग्णांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

**वाशिम / प्रतिनिधी**



जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित व वेळेत आरोग्य सेवा मिळणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून, रुग्णालयांतील पायाभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था व स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी २० जानेवारी रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या दौऱ्यात जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा तसेच सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपकार्यकारी अभियंता अजीम शेख, आकाश कोळकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, विद्युत उपअभियंता स्वरूप सरोदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत महाविद्यालयाच्या सध्याच्या गरजा, उपलब्ध मनुष्यबळ, विद्यार्थ्यांची संख्या, भविष्यातील विस्तार तसेच वस्तीगृह उभारणीमुळे होणारे शैक्षणिक व प्रशासकीय लाभ याबाबत सविस्तर चर्चा झाली. यासंदर्भात डॉ. अनिल कावरखे व डॉ. सतीन मेश्राम यांनी सखोल माहितीचे सादरीकरण केले. दरम्यान, कुतूहल विज्ञान प्रदर्शन समितीचे सदस्य व पत्रकार निलेश सोमाणी यांनी प्रदर्शनीचे नियोजन, मांडणी व अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा केली.

### फायर ऑडिट व कामांच्या गुणवत्तेवर भर

■ जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व विभागांची पाहणी करताना जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्ण व कर्मचारी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने फायर ऑडिट करून घेण्याचे निर्देश दिले. तसेच क्रीटीकल केअर ब्लॉक व सेवरेज ट्रीटमेंट प्लॅन्टच्या सुरू असलेल्या बांधकामांची पाहणी करून ही कामे ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावीत व गुणवत्तेवर विशेष लक्ष ठेवावे, असे स्पष्ट आदेश दिले.

### परिचर्या महाविद्यालयासाठी पदनिर्मिती व वस्तीगृहाचा प्रस्ताव

■ शासकीय परिचर्या महाविद्यालयासाठी आवश्यक पदनिर्मिती तसेच विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीगृह उभारणीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. हा प्रस्ताव शासनस्तरावर प्रभावीपणे पाठपुरावा करता यावा, यासाठी सर्व माहिती परिपूर्ण असावी, असेही त्यांनी सांगितले.

### कुतूहल प्रदर्शनीसाठी काटेकोर नियोजन

■ कुतूहल प्रदर्शनीच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेताना जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून नियोजन करण्याचे निर्देश दिले. पोलीस, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, आरोग्य व शिक्षण विभागांनी सुरक्षा, वाहतूक, स्वच्छता व सुविधा व्यवस्थापन प्रत्येक बाब काटेकोरपणे अंमलात आणावी, असे त्यांनी नमूद केले.

## 'सडक सुरक्षा, जीवन रक्षा'चा वाशिममध्ये जागर

**वाशिम :** पतंजली फूड्स लिमिटेड व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा सप्ताह२०२६ अंतर्गत १९ जानेवारी रोजी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. 'सडक सुरक्षा, जीवन रक्षा' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात वाहनचालक, दुचाकी स्वार तसेच पादचारी यांच्यात वाहतूक नियम, सुरक्षित वाहन चालवण्याच्या सवयी व जबाबदार वर्तनाबाबत जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमास सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक मोहिनी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट व चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करणाऱ्या वाहनचालकांना प्रेरणादायी व सुरक्षा जागरूकता बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. प्रत्येक वाहनचालकाने हेल्मेट व सीट बेल्टचा नियमित वापर करणे किती आवश्यक आहे, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. रस्ते अपघात टाळण्यासाठी सुरक्षित वाहन चालवणे, वाहतूक नियमांचे पालन करणे, तसेच हेल्मेट व सीट बेल्ट वापरण्याचे महत्त्व याविषयी मोटार वाहन निरीक्षक मोहिनी मोरे व पतंजली फूड्स लिमिटेडच्या टीमने सविस्तर माहिती दिली. यासोबतच शालेय विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा नियमांची माहिती देणाऱ्या पुस्तकाचे वितरणही करण्यात आले.



## आयसीसीचा बांगलादेशला अल्टिमेटम

# 'भारतात खेळा किंवा स्पर्धेतून बाहेर व्हा!'

**दुबई, वृत्तसंस्था :**

२०२६ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी बांगलादेश क्रिकेट बोर्ड आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद यांच्यातील वाद आता विकोपाला गेला आहे. २१ जानेवारी रोजी झालेल्या आयसीसी बोर्डाच्या बैठकीत बांगलादेशला कडक शब्दांत अल्टिमेटम देण्यात आला असून, 'भारतात येऊन खेळा अन्यथा स्पर्धेतून बाहेर व्हा', असा पवित्रा आयसीसीने घेतला आहे. या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी बांगलादेशला २४ तासांचा अवधी देण्यात आला आहे.

बांगलादेश मधील अल्पसंख्याक हिंदू नागरिकांवरील अत्याचाराविरोधात भारतात संतापाची लाट उसळी. यातूनच आयपीएलमधील केकेआर संघाने बांगलादेशचा स्टार वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला 'रिलीज' केले. यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने सुरक्षेचे कारण पुढे करत भारतात खेळण्यास असमर्थता दर्शवली आहे. बांगलादेशने आपला संघ 'ग्रुप सी' मधून 'ग्रुप बी' मध्ये हलवण्याची मागणी केली होती, जेणेकरून त्यांचे सामने श्रीलंकेत होतील. सध्याच्या वेळापत्रकानुसार, बांगलादेशचे सामने कोलकाता आणि मुंबईत होणार आहेत. बांगलादेशचे क्रीडा सल्लागार आसिफ नझरुल यांनी आयसीसीवर दबावतंत्राचा आरोप केला आहे. ''आम्ही कोणत्याही अवाजवी अटी मान्य करणार नाही. भारताने जेव्हा पाकिस्तानला जाण्यास नकार दिला होता, तेव्हा आयसीसीने ठिकाण बदलले होते. मग आमच्या मागणीचा विचार का केला जात नाही?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. नझरुल यांच्या वादग्रस्त विधानांमुळे बांगलादेशच्या खेळाडूंमध्येही नाराजीचे वातावरण असून बोर्डात बंडाची स्थिती निर्माण झाली होती.



### स्कॉटलंडला संधी मिळणार?

■ बांगलादेशने माघार घेतली, तर रँकिंगनुसार स्कॉटलंडला विश्वचषकात स्थान मिळू शकते. २००९ मध्ये झिम्बाब्वेने माघार घेतली असताना स्कॉटलंडलाच संधी देण्यात आली होती. मात्र, अद्याप स्कॉटलंड क्रिकेट बोर्डाशी आयसीसीने कोणतीही अधिकृत चर्चा केलेली नाही.

### भारतात सुरक्षा व्यवस्था भक्कम : आयसीसीची स्पष्टोक्ती

■ बांगलादेशच्या सुरक्षा चिंतेवर उत्तर देताना आयसीसीने स्पष्ट केले की, एका स्वतंत्र सुरक्षा संस्थेच्या अहवालानुसार भारतात खेळाडूंना कोणताही धोका नाही. ''भारतातील सुरक्षा व्यवस्था उच्च दर्जाची असून कोणत्याही विशिष्ट संघाला धोका असल्याची माहिती नाही,'' असे आयसीसीने नमूद केले आहे.

# सिंधू व श्रीकांत इंडोनेशिया मास्टर्सच्या पहिल्या फेरीत जिंकले

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

डबल ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधू आणि माजी वर्ल्ड नंबर-१ किदांबी श्रीकांत यांनी इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत बुधवारी आपआपले सामने जिंकून दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले.

महिला एकेरीत पाचव्या मानांकित पीव्ही सिंधूने जपानच्या मनामी सुइजुला अटीतटीच्या लढतीत २२-२०, २१-१८ असे हरवले. हा सामना ५३ मिनिटे चालला, ज्यात सिंधूने महत्वाच्या क्षणी संयम दाखवत विजय निश्चित केला.

पुरुष एकेरीत जागतिक क्रमवारीत ३३ व्या स्थानावर असलेल्या किदांबी श्रीकांतने जगातील २२ व्या क्रमांकाच्या खेळाडू कोकी वतनाबेला १ तास १२ मिनिटे चाललेल्या रोमांचक सामन्यात २१-१५, २१-२३, २४-२२ असे हरवले. श्रीकांतचा पुढील सामना स्पर्धेतील चौथ्या मानांकित चाउ टिएन चेनशी होईल, चाउने आयर्लंडच्या न्हात गुयेनला २१-१४, २१-१५ असे हरवले.



### किरण जॉर्ज आणि आकर्षी कश्यप पहिल्या फेरीत बाहेर

■ भारतीय खेळाडूंसाठी बुधवारचा दिवस निराशाजनक ठरला. किरण जॉर्ज पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत इंडोनेशियाच्या मोह जकी उबैदिल्लाहकडून १७-२१, १४-२१ अशा फरकाने पराभूत होऊन बाहेर पडला. महिला एकेरीत आकर्षी कश्यप देखील सुरुवातीच्या फेरीत डेन्मार्कच्या जुली डावाल जेकबसेनकडून २१-८, २०-२२, १७-२१ अशा फरकाने पराभूत झाली.
मिश्र दुहेरीमध्ये भारताची मोहीम पहिल्याच फेरीत संपुष्टात आली. रोहन कपूर आणि रुथविका गड्डे या जोडीला फ्रान्सच्या चौथ्या मानांकित थॉम गिक्वेल आणि डेल्फिन डेलरू यांनी ९-२१, २०-२२ अशा फरकाने हरवले. तर ध्रुव कपिला आणि तनिष क्रास्टो यांना फ्रान्सच्या ज्युलियन मायो आणि लिया पालेर्मो या जोडीविरुद्ध २३-२१, २०-२२, ६-२१ अशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले.

## वर्ल्डकपपूर्वी दक्षिण आफ्रिकेत टी-२० खेळणार भारतीय महिला संघ

**नवी दिल्ली:** महिला टी-२० विश्वचषक २०२६ पूर्वी टीम इंडिया आता दक्षिण आफ्रिकेत ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळेल. १७ ते २७ एप्रिल दरम्यान डर्बन, जोहान्सबर्ग आणि बेनोनी येथे पाचही सामने होतील. आयसीसी स्पर्धा १२ जूनपासून इंग्लंडमध्ये खेळली जाईल.

टीम इंडियाने नोव्हेंबर २०२५ मध्ये एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर डिसेंबरमध्ये श्रीलंकेविरुद्ध टी-२० मालिका खेळली. भारताने ही मालिका ५-० ने जिंकली. संघ आता फेब्रुवारी-मार्चमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळेल. त्यानंतर एप्रिलमध्ये दक्षिण आफ्रिकेशी खेळल्यानंतर, विश्वचषकापूर्वी संघ इंग्लंडमध्येच यजमान संघाविरुद्धही टी-२० मालिका खेळेल. दक्षिण आफ्रिकेला फेब्रुवारी-मार्चमध्ये पाकिस्तानविरुद्ध टी-२० आणि एकदिवसीय मालिका खेळायची आहे. संघ मार्च-एप्रिलमध्ये न्यूझीलंडचा दौरा करेल, त्यानंतर मायदेशी परतल्यावर भारतासोबत ५ टी-२० सामने खेळेल. १७ आणि १९ एप्रिल रोजी डर्बनमध्ये २ सामने होतील. २२ आणि २५ एप्रिल रोजी जोहान्सबर्गमध्ये २ सामने खेळले जातील. तर २७ एप्रिल रोजी बेनोनीमध्ये शेवटचा टी-२० सामना होईल.

## सिनर २००० नंतर मेलबर्नमध्ये सलग १५ सामने जिंकणारा चौथा खेळाडू

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये दोन वेळा डिफेंडिंग चॅम्पियन जॅनिक सिनरने नवा विक्रम केला आहे. तो २००० सालानंतर मेलबर्नमध्ये सलग १५ सामने जिंकणारा चौथा खेळाडू बनला आहे.



या खास क्लबमध्ये त्याच्या आधी रॉजर फेडरर, नोव्हाक जोकोविच आणि आंद्रे आगासी यांचा समावेश आहे. तर महिला एकेरीत वर्ल्ड नंबर-१ आर्यना सबालेंका देखील दुसऱ्या फेरीत पोहोचली आहे. महिला एकेरीत बेलारूसच्या आर्यना सबालेंकाने चीनच्या क्वालिफायर झुओशुआन बाईला सरळ सेटमध्ये ६-३, ६-१ असे हरवून दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले. बाईची जागतिक रँकिंग ७०२ आहे. पहिल्या सेटमध्ये सबालेंकाने सुरुवातीच्या १५ मिनिटांत ५ गेम जिंकले, पण शेवटचा गेम जिंकण्यासाठी तिला २० मिनिटे लागली. सात सेट पॉइंट गमावल्यानंतर तिने पहिला सेट ६-३ ने जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये बाईने सबालेंकाची सर्व्हिस ब्रेक करून सुरुवात केली खरी, पण सबालेंकाने लवकरच नियंत्रण परत मिळवत सेट ६-१ ने आपल्या नावावर केला.




## अंकिता लोखंडेनेही २०१६ च्या ट्रेंडला केले फॉलो

### पोस्टमध्ये कठीण काळाची आठवण करत लिहिले, आतून पूर्णपणे खचले होते

सोशल मीडियावर सध्या २०१६ नॉस्टेल्जिया म्हणजेच २०१६ च्या जुन्या आठवणींचा ट्रेंड सुरू आहे. लोक त्या वर्षाशी संबंधित आठवणी शेअर करत आहेत. याच ट्रेंडमध्ये टीव्ही अभिनेत्री अंकिता लोखंडेनेही २०१६ च्या तिच्या जुन्या आठवणी शेअर केल्या.

अंकिताने २०१६ चे काही जुने फोटो शेअर केले. तिने सांगितले की ते वर्ष तिच्या आयुष्यातील सर्वात कठीण टप्प्यांपैकी एक होते. पोस्टमध्ये तिने लिहिले की २०१६ ने तिला खूप काही शिकवले आणि आतून तोडले व बदलले. त्या वर्षी तिने तिच्या पाळीव कुत्र्यांना गमावले होते, ज्याचे दुःख तिला आजही आठवते.

अंकिताने लिहिले की, २०१६ साली तिने इंस्टाग्रामवर पहिली पोस्ट केली होती. त्याच वेळी तिला जाणवले की ती नेहमीच एक 'फॅमिली गर्ल' राहिली आहे. तिने तिचा कुत्रा स्कॉचला आठवून लिहिले की, तोच त्या वर्षी तिचा सर्वात मोठा आधार होता. त्याने प्रत्येक कठीण प्रसंगात तिची साथ दिली. अंकिता म्हणाली की, ती आजही त्याला खूप मिस करते.



अंकिताने तिच्या आजोबांनाही आठवले. तिने त्या काळातील फोटोंचा उल्लेख केला, जेव्हा ती फोटोशूट आणि छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधायची. तिने लिहिले की साडी नेसण्याचे तिचे प्रेम आजही तसेच आहे. पोस्टच्या शेवटी अंकिताने लिहिले की २०१६ च्या या आठवणी तिला स्वतःला समजून घेण्याची आणि पुढे जाण्याची ताकद देतात. तिने स्वतःला आठवण करून दिली की तिने कठीण काळ पार केला आणि पुढे गेली.



## 'कुंग फू हसल' चित्रपटातील अभिनेता ब्रूस लिउंग यांचे निधन

'कुंग फू हसल' चित्रपटात दिसलेले प्रसिद्ध मार्शल आर्टिस्ट आणि अभिनेते ब्रूस लिउंग यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांना लिउंग सिउ-लुंग या नावानेही ओळखले जात असे.

त्यांचे निधन १४ जानेवारी २०२६ रोजी झाले. मात्र, त्यांच्या मृत्यूचे कारण अद्याप समोर आलेले नाही. कुटुंब अंत्यसंस्काराच्या तयारीमध्ये व्यस्त आहे आणि २६ जानेवारी रोजी चीनमधील शेनझेन शहरातील लोंगगांग जिल्ह्यात अंतिम निरोपाचा कार्यक्रम होणार आहे. ब्रूस लिउंग यांच्या डॉयिन अकाउंटवर एक भावनिक संदेशही पोस्ट करण्यात आला आहे, जो त्यांच्या नावाने लिहिला गेल्याचे सांगितले जात आहे. त्यात म्हटले आहे, ''मी खूप दूर एक चित्रपट बनवण्यासाठी गेलो आहे. निरोप न घेता निघून गेल्याबद्दल मला माफ करा. फक्त एवढे समजून घ्या की मी खूप दूरच्या ठिकाणी शूटिंगसाठी गेलो आहे. मला हे एक रहस्यच ठेवायचे होते, त्यामुळे माझे जवळचे शिष्य नेहमीप्रमाणे व्हिडिओ पोस्ट करत राहिले. मला थोडे रहस्य आवडते. माझ्या वतीने चांगले आयुष्य जगा. प्रेम नेहमी इथेच राहील. लक्षात ठेवा, मी तुमच्या सर्वांवर खूप प्रेम करतो. '' त्यांच्या निधनाची बातमी येताच चाहते आणि चित्रपट कलाकारांसह अनेकांनी दुःख व्यक्त केले. कुंग फू हसल चित्रपटाचे दिग्दर्शक स्टीफन चाऊ यांनी लिहिले, ''लिउंग सिउ-लुंग नेहमी आठवणीत राहतील.''



## 'मला भाषा बोलण्यासाठी भाग पाडू नका'

बॉलिवूड अभिनेता सुनील शेट्टीने नुकतेच सांगितले की, कोणालाही जबरदस्तीने कोणतीही भाषा बोलण्यास भाग पाडू नये. तो म्हणाला की, जर कोणी त्याला मराठी बोलणे अनिवार्य आहे असे सांगितले, तर तो स्पष्टपणे सांगतो की, तसे आवश्यक नाही. तो मराठी त्याच्या इच्छेने बोलेल, कोणत्याही दबावाखाली नाही.

एका कार्यक्रमात सुनील शेट्टी म्हणाला की, जेव्हा तो लहान वयात आपल्या घरातून बाहेर पडला, तेव्हा याचा अर्थ असा नव्हता की तो आपली ओळख सोडून देत होता.तो म्हणाला, ''मी खूप लहान वयात येथून (कर्नाटक) बाहेर पडलो होतो, कोणासारखे बनण्यासाठी किंवा दुसरे कोणी बनण्यासाठी नाही.'' त्याच्यासाठी बाहेर जाणे हे केवळ चांगल्या संधी शोधण्याचे साधन होते, आपल्या मुळांना विसरण्याचे नाही. मुंबईत करिअर केल्यानंतरही त्याची ओळख तीच राहिली.तो म्हणाला, ''मी जे काही करतो, त्यात मंगळूरू उपस्थित आहे.'' यावरून त्याने सांगितले की, त्याचे शहर आजही त्याच्या कामात, विचारांत आणि मूल्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येतेयाचबरोबर, मराठी भाषेबद्दल शेट्टी म्हणाला की, जेव्हा त्याला विचारले जाते की मराठीचे काय, तेव्हा तो म्हणतो, ''मराठीचे काय?'' त्याने पुढे म्हटले, ''जर कोणी मला म्हणाले की तुला मराठी बोलावीच लागेल, तर मी म्हणतो की हे आवश्यक नाही. मला जेव्हा हवे असेल, तेव्हा मी बोलेन. मला जबरदस्ती करू नका.''मात्र, त्याने हे देखील स्पष्ट केले की, ही गोष्ट कोणाचा अपमान करण्यासाठी नाही.

## आरोग्याच्या कारणामुळे 3-५ वर्षांचा ब्रेक झाकीर खानची दीर्घ ब्रेक घेण्याची घोषणा

स्टँड-अप कॉमेडियन झाकीर खानने स्टेज शोमधून दीर्घकाळ ब्रेक घेण्याची घोषणा केली आहे. तो सध्या त्याच्या 'स्पेशल पापा यार' या स्टँड-अप शोसह देशातील विविध शहरांमध्ये कार्यक्रम करत आहे. याच टूरमधील त्याचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये झाकीर हैदराबादमध्ये स्टेजवरून प्रेक्षकांशी बोलताना दिसत आहे. त्याने सांगितले की तो दीर्घकाळ ब्रेकवर जात आहे, त्यामुळे हैदराबादमधील हा त्याचा शेवटचा शो असेल.

झाकीरने पुढे सांगितले की तो २०२८-२९ किंवा २०३० मध्ये स्टेज शोमध्ये परत येऊ शकतो. त्याने सांगितले की त्याने हा ब्रेक त्याच्या आरोग्यामुळे आणि इतर वैयक्तिक कारणांमुळे घेतला आहे. स्टेजवरून लोकांचे आभार मानताना तो म्हणाला की, यावेळी तिथे उपस्थित असलेला प्रत्येकजण त्याच्या हृदयाच्या खूप जवळ आहे. त्याने प्रेक्षकांचे आभार मानले आणि सांगितले की त्याला जेवढे प्रेम मिळाले आहे, त्यासाठी तो नेहमीच कृतज्ञ राहील. व्हायरल व्हिडिओंच्या दरम्यान झाकीरने सोशल मीडियावरही याचा इशारा दिला. मंगळवारी दुपारी त्याने आपल्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली.

ही पोस्ट दुबईत पोहोचल्यानंतरची असल्याचे सांगितले जात आहे. यात त्याने लिहिले की, २० जूनपर्यंत प्रत्येक शो एका सेलिब्रेशनसारखा असेल. त्याने असेही म्हटले की, यावेळी तो अनेक शहरांमध्ये येऊ शकणार नाही. त्यामुळे प्रेक्षकांनी थोडे जास्त प्रयत्न करून शोमध्ये नक्की यावे.






### बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**धुरंधर :** दुपारी १.३०, रात्री ८.३०
**राजासाहब :** दुपारी १.४५ सायं. ५.४५, रात्री ८.४५
**क्रांतीज्योती विद्यालय :** सायं. ५.३०

### खामगाव

**श्री गजानन टॉकिज**

**राजासाहब :** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**राजासाहब:** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

### वाशिम

**एचटूएम मुव्हीप्लेक्स**

**क्रांतिज्योती विद्यालय :** दु. १२:२० सायंकाळी ०६:४०
**धुरंधर :** दु. ०३:०५ रात्री ०९:३०
**द राजासाब :** सकाळी ०८:४५, दु. १२:००, ०३:१५, सायंकाळी ०६:३५, रात्री ०९:५०

### छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**लालो :** कृष्णा सदा सहाय्यते - सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**अवतार :** फायर ॲण्ड ॲश (हिंदी) - दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०,
**क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम -** दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०,
**धुरंधर -** दुपारी ४: ३५, दुपारी १२:३०, २:३०, सायंकाळी ७:२५,
**द राजा साब -** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**उत्तर -** दुपारी १२:३०

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**लालो :** कृष्णा सदा सहाय्यते : सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००,
**धुरंदर :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम :** सकाळी ११ : ३०, सायंकाळी ६:३०, रात्री १०:००
**इक्कीस :** दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०
**द राजा साब :** दुपारी १२:३०,
**आशा :** दुपारी ३ : ००, सायंकाळी ६:३०,

### अकोला

**मिराज सिनेमा**

**अवतार : फायर ॲन्ड ॲश (हिंदी)** - स. ९.१० , दु. ३.५५, रात्री १०.४५ **धुरंधर** - स. ९.१५, स. १०.१५, दु. १.३०, दु. २.३०, दु. ५.४५, सायं. ६.४५, रात्री १०.०० , रात्री ११.०० **इक्कीस** - स. १०.३०, दु. १.३०, दु. ४.३०, सायं. ७.३०, रात्री १०.३०
**तु मेरी मैं तेरा, मैं तेरा तु मेरी** - दु. १.३०
**क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम** - सायं. ७.४५